चाळीस पैसे
१ ऑक्टोबर १९६६

सा प्ता हि क

# माणूस

बोले तैसा चाले

गांधीजींची जन्मशताब्दी साजरी करताना
त्यांच्या या व्यक्तिवैशिष्टचाचे स्मरण राहो !



□

गांधी

शताब्दी

समिती

**नवी दिल्ली, दि. २ —** विहिरीची गरज असलेल्या प्रत्येक खेड्याला विहीर पुरवणे हेच महात्माजींचे खरेखुरे स्मारक होय. गांधी शताब्दी महोत्सव राष्ट्रीय समितीच्या मूलभूत सुखसोयीविषयक उपसमितीच्या परवा येथे भरलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. श्री. जगजीवन राम यांच्या निवासस्थानी त्यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक भरली होती. स्वयंस्फूर्त संघटनांखेरीज आणखी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनीही खेडी वाटून घेऊन तेथे विहिरी खोदाव्यात, असे त्यांना समितीने आवाहनही केले आहे.

या समितीचे अध्यक्ष श्री. बी. एस्. मूर्ती यांनी या प्रसंगी केलेल्या भाषणात असे सांगितले की, पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या खेड्यांची आकडेवारी संपूर्णपणे उपलब्ध नसली तरी अशी सुमारे एक लाख खेडी असावीत असा अंदाज आहे. गांधी शताब्दी महोत्सवाच्या कालावधीत या खेड्यांची अडचण दूर करण्याकडे समितीने लक्ष पुरवावे, असे त्यांनी आवाहन केले. यासाठी सुमारे ६ अब्ज रु. लागतील असा अंदाज आहे.



पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने आखलेल्या कार्यक्रमाला पूरक कार्यक्रम म्हणून एक लाख विहिरी खोदण्याचे लक्ष समितीने आपल्यापुढे ठेवावे असे, डॉ. के. एल्. राव यांनी सुचविले. [ '**महाराष्ट्र टाइम्स**' **३ सप्टेंबर १९६६** ]

माणूस

प्रतिष्ठान

□

*महाराष्ट्रातला एखादा दुष्काळी वा मागासलेला भाग निवडून, तेथे पाणी-पुरवठ्याच्या काही योजना प्रत्यक्ष अंमलात आणणे, त्यासाठी आवश्यक ते द्रव्यसाहाय्य व मनुष्यबळ उभे करणे हे 'माणूस प्रतिष्ठान'चे पहिले कार्य राहील. एखाद्या तलावाचे किंवा तळ्याचे काम, काही विहिरी असे हे स्वप्न आहे.*

*स्वप्न थोडे अधिक उघडायचे तर—*

- □ *आगामी शिवजयंतीपासून प्रत्यक्ष कार्याला सुरुवात व्हावी.*
- □ *आगामी गांधी शताब्दीला कामाचा योजलेला टप्पा पूर्ण व्हावा.*
- □ *म्हणजे अडीच वर्षांचा कालावधी. सरकारची पंचवार्षिक योजना, आपली छोटी अडीच वर्षांची.*
- □ *या अडीच वर्षांत किमान सव्वा लाख रुपयांचा निधी यासाठी 'माणूस'कडे जमा व्हावा ...* [ '**माणूस**' **दि. १ जुलै १९६६** ]




## एक समग्र साप्ताहिक


वर्ष – सहावे

अंक : तेरावा

किंमत : चाळीस पैसे

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**

श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**

अ. मा. साधू

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**

अ. वा. गंधे

अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४१९ नारायण, पुणे २.

दूरध्वनी – ५७३५९


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## पत्रमैत्री

स. न. दि. १६।९।६६

आपल्या 'माणूस'चा मी प्रथमपासून एक फुकटा वाचक. 'माणूस' मासिकातील 'नाझी भस्मासुराचा उदयास्त' ही लेखमाला मी फार औत्सुक्याने वाचीत असे. आता साप्ताहिकातील 'ड्रॅगन जागा झाला' ही तितक्याच औत्सुक्याने वाचीत असतो. 'माणूस' ने ललित आणि वैचारिक अशा दोन्ही आघाड्या चांगल्या सांभाळल्या आहेत. मला विशेष आवडणारी सदरे म्हणजे नाटकांची व चित्रपटांची परीक्षणे. तळवलकरांचा 'आस्वाद'ही आस्वाद्य असतो. १७ सप्टेंबरच्या अंकात 'इंधन'चे परीक्षण आले आहे त्याबाबत मात्र माझे मतभेद आहेत. 'माणूस'ने मिळविलेल्या यशाबद्दल अभिनंदन करतो.

– म. श्री. दीक्षित

स. न. १९।९।६६

दि. १५ ऑगस्टपासून 'माणूस' मध्ये झालेला बदल स्वागतार्हच आहे. 'माणूस'च्या प्रत्येक अंकांत प्रकाशित होणारें साहित्य, वाचनीय, बोधप्रद असेच असल्याने अंक पूर्ण वाचून होतो न होतों, तोंच पुढील अंक वाचण्यास माझे मन अधिक उत्सुक होते. आपण आकाशवाणी 'मुंबई' व 'पुणे' केंद्रावरून ध्वनिक्षेपित होणारे आठवड्याचे महत्त्वाचे कार्यक्रम 'माणूस' साप्ताहिकांतून प्रसिद्ध केल्यास आकाशवाणी रसिक श्रोत्यांना ते सोयीस्कर वाटेल. माणूसच्या यशाचे अभिनंदन.

– शरद मिरवणकर, मुंबई.

# ठुसकाफळे...



## ☐ मोर्चा आणि मिरच्या !

विरोधी पक्षांचे मोर्चे हे पुष्कळ वेळा रस्त्याला शोभा आणतात. काही मोर्चे इतके सुरेख असतात, की रस्त्यावरून आता गेली ती ' मुंजीची भिक्षावळ ' की ' मोर्चा ' असा नागरिकांना प्रश्न पडतो. संयुक्त समाजवादी, कम्युनिस्ट आणि जनसंघ हे मोर्चाभक्त पक्ष. प्रजासमाजवादी सध्या रोडावले असल्याने त्यांचा मोर्चा निघू शकत नाही ! नुकताच दिल्लीला कम्युनिस्टांनी लोकसभेवर मोर्चा नेला. त्यात पन्नास हजार लोक होते, असे सर्वत्र छापून आले. या मोर्चात प्रत्यक्ष किती लोक आहेत हे मोजण्यासाठी ' जनसंघा ' ने मोर्चात जनसंघीय घुसवले होते व शिवाय नाक्यानाक्या-वर म्हणे लोक नेमले होते. वारे पठ्ठे ! त्यांनी सर्व माणसे मोजून ती फक्त पंधरा हजार आहेत, असे सिद्ध केले. हा मोर्चा अगदीच भुक्कड होता असे जनसंघभक्त वृत्तपत्रांनी जाहीर केले. हा संख्येचा घोटाळा का झाला असावा, हे सहज समजण्या-सारखे आहे. कम्युनिस्टांचा मोर्चा आपल्या पक्षाच्या मोर्चापेक्षा किती पटीने भुक्कड आहे हे प्रत्यक्ष पाहण्यासाठी या मोर्चात दहा-पंधरा हजार जनसंघीय घुसले असले पाहिजेत. त्यामुळे मोर्चाला शोभा आणण्यासाठी आलेले वीस हजार आणि मोर्चा मोजण्यासाठी घुसलेले दहा पंधरा हजार ! पाहणाऱ्यांना मोर्चा प्रचंड वाटला नं ? कोण कशाकरता मोर्चात आहे, याची चौकशी कशाला ?

असल्या मोर्चांबद्दल काय करायचे हे आता सरकारने ठरवून टाकले आहे. मोर्चा असला की असंख्य पोलीसही कपड्यांना जरा नीट इस्त्री करतात, गुळगुळीत दाढ्या करून प्रफुल्ल चेहऱ्याने लाठ्याकाठ्या घेऊन सरकारी इमारतींभोवती इतक्या संख्येने उभे राहतात की पोलिसांचाच मोर्चा आहे असं वाटतं. मोर्चा संयुक्त समाज-वाद्यांचा नसला तर पोलिस खूष असतात. कम्युनिस्टांना इंदिरा गांधींना फार त्रास द्यायचा नाही, अशा कोसिजीनच्या कानपिचक्या असल्यामुळे, घसा ताणून भाषणे करण्यापलीकडे कम्युनिस्ट हल्ली काही करत नाहीत. जनसंघीय तर वरातीसारखा मोर्चा मिरवतात आधी प्रसिद्धी करून वगैरे ! — पोलिसांचा वेळ मोर्चा असला की मजेत जातो. संयुक्त समाजवादी असले तर मात्र पोलिसांना जरा लाठ्या-बिठ्या फिरवाव्या लागतात.

मोर्चाचे उत्सवी रूप पाहून आता काँग्रेसवाल्यांनी निःश्वास टाकण्यास हरकत नाही. मोर्चा हे राजकीय हत्यार असले तरी आता त्याला धार अशी उरलीच नाही. या लष्करी तलवारीला आता खुशाल कुरवाळावे. हात कापणार नाही. रक्त येणार नाही. एकमेकांच्या लाकडी तलवारींची लांबी रुंदी, त्यांच्यावरची वेलबुट्टी पाहण्यात विरोधी पक्षांची बाळे आता रंगून जाऊ लागली आहेत. हत्यार आले की त्याला धार हवी. ज्याच्याविरुद्ध ते वापरायचे त्याच्या डोळ्यांना पाणी यायला हवे, ही हिंसक कल्पना आता इतिहासजमा झाली आहे. डोळ्यांत पाणी न आणणारी ही मोर्चाची मिरची शहरी जीवनाला अधूनमधून बरी चव आणते. मोर्चा जाऊ लागला की, रहदारी बंद होते. ऑफिसात जाणारे कारकून अडकून पडतात. कामाला निघालेल्या माणसांची वाहने ताटकळत थांबतात. इथे कुणाला घाई आहे?

कधी कधी १४४ कलम तोडणे वगैरे गंमतीचे कार्यक्रम पक्ष आखतात. जे कोण चार-पाच जण कलम तोडणारे असतात ते घरून निघताना, "सायंकाळी परत येतो ग!" असे सांगून घर सोडतात. नाक्यानाक्यावर त्यांना सुवासिनी ओवाळतात. 'सुवासिनी' या एका विशेषणाशिवाय त्यांच्याविषयी जास्त काही सांगण्यासारखे नसते. हे ओवाळणे, हार, वगैरे उरकीत ही मोर्चाच्या अग्रभागी असलेली ४-५ मंडळी पोलिसांची साखळी दिसली की मोठमोठ्याने घोषणा करतात. मग साखळी तोडण्याचा समारंभ, लग्नात विडा तोडण्याच्या समारंभासारखा, लाजत लाजत पुरा होतो. साखळी तोडण्यात दोन-चार बायका असल्या तर पोलिस लाजतात. कलम तोडले की मंडळी मोटारीतून फरासखान्यात जातात. तेथे घरून डब्यांची सोय झालेली असते. डबे खाऊन मंडळी सायंकाळी घरी परततात. सकाळी ओवाळून घेऊन आघाडीवर गेलेले सत्याग्रही सायंकाळी घरी येतात. बायको विचारते, "संध्याकाळी भूक कितपत आहे?"

"छेः ग. पोट अगदी डब्ब आहे." उत्तर येते.

## □ गोवा

गोवा ही दिलीश्वरांची नावडती बायको आहे. पोर्तुगीजांच्या अंमलाखाली गोवा होता, तेव्हा तो आपसूक स्वतंत्र होईल, अशी दिल्लीश्वरांची अपेक्षा होती म. गांधींच्या मार्गांनी भारत स्वतंत्र झाला, पाकिस्तान स्वतंत्र झाले. एवढा मोठा बलाढ्य ब्रिटिश-साहेब नमला, तिथे पोर्तुगीजांची काय कथा, अशी दिल्लीश्वरांची अपेक्षा होती. पण गोव्याच्या जनतेने पोर्तुगीज सत्तेपुढे अहिंसक मार्गांचा अवलंबा किफायतशीर नाही, असे अनुभवान्ती ठरवले. मग काँग्रेसने काही करण्याऐवजी ना. ग. गोरे, सौ. सुधाताई जोशी, जगन्नाथराव जोशी हीच मंडळी सत्याग्रह करून बाहेरून आत घुसून तुरुंगात पडली. हिरवे गुरुजी हुतात्मा झाले. दिल्लीश्वरांना

याही खेपेस गोव्याच्या जनतेने दगा दिला. गोवा काही स्वतंत्र होईना. ब्रिटिशांसारखा काहीसा सुसंस्कृत राज्यकर्ता होता म्हणूनच महात्माजी यशस्वी झाले, असे लोक कुत्सितपणे बोलू लागले. गोव्याने दिल्लीश्वरांना पेचात टाकले. दिल्लीश्वरांना अहिंसेचा जाहीरपणे त्याग करून गोव्यात सैन्य घुसवावे लागले. गोवा स्वतंत्र झाला; परंतु अहिंसेचे नाक कापून! गोव्याचा हा पहिला गुन्हा...बरे, त्यानंतर तरी तिथल्या निवडणुकीत जनतेने काकोडकरांना निवडून द्यावे की नाही! आमच्याकरता सैन्याने काय करायचे ते केले, काँग्रेसने काही केले नाही, इतकेच नव्हे तर आता दहा वर्षे आम्हांला मराठी माणसांपासून विभक्त ठेवण्याचा काँग्रेस प्रयत्न करते आहे, असे म्हणून गोव्याच्या जनतेने दिल्लीश्वरांचा पुन्हा रोष ओढवून घेतला.

मध्यवर्ती काँग्रेस सरकारचे नाक कापून पुनः त्यांना अधिकारापासून दूर ठेवणाऱ्या गोव्याच्या जनतेला सरकारने काय म्हणून सहानुभूती दाखवावी हो! म्हणूनच गोव्यात सार्वमत घेण्याचे आता काँग्रेसने ठरविले आहे. सार्वमताची तरतूद आपल्या घटनेत नाही. एकदा असा पायंडा पाडला तर पुढे देशात अशा मागण्या वाढीस लागून देशाचे अंती तुकडे होतील, असले फालतू मुद्दे कामराज–इंदिरा–चव्हाण यांनी मुळीच लक्षात घेतले नाहीत हेच बरोबर आहे. देशाचे पुढे काय व्हायचे ते होईल. तेव्हा थोडीच ही मंडळी हयात असणार आहेत! काँग्रेसचे काय, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. वाटेल ते तोडगे काढून पक्षाचे होडगे बुडू देता कामा नये!

तिसरा गुन्हा गोवा करणार होते. त्यापासून काँग्रेसने गोव्याला वाचवले आहे. गोव्याच्या बहुसंख्य जनतेचे मत गोवा महाराष्ट्रात विलीन व्हावा असेच आहे. पण ही बहुसंख्य जनता म्हणजे हिंदू जनता होय. तेथल्या बहुसंख्य ख्रिश्चनांना गोवा स्वतंत्र राहावासा वाटतो. हे सत्य मागील निवडणुकीत जाहीर झाले. म्हणजे गोव्याचा प्रश्न हा अखेर जातीय प्रश्नच आहे, असे त्याचे रूप लोकांपुढे येते! ही गोष्ट जरी खरी असली तरी निधर्मीय दिल्लीश्वरांना असली भलती–सलती सत्ये व्यवहार म्हणूनही कुणी सांगू नयेत, अशी त्यांची अपेक्षा आहे.

म्हणून आता सार्वमत ठेवले आहे. या सार्वमतात प्रत्येकजण निधर्मी भावनेने मत देईल, अशी काँग्रेसची खात्री आहे. जातीय निर्णयाने नव्हे तर निधर्मी निर्णयाने. गोवा महाराष्ट्रात यावा यासाठी हे 'सार्वमत' आहे. निवडणुकीत एखादा उमेदवार असतो. त्याचे नाव बांदोडकर किंवा बेंजामिन असे काहीतरी असते. नाव आले की धर्म येतो आणि निवडणुका जातीय होतात. सार्वमतात असे काही नाही. निधर्मी गोवा निधर्मी महाराष्ट्रात जावा की नुसताच निधर्मी राहावा, असा प्रश्न आहे.

गोव्याने दिल्लीश्वरांना आता अधिक चिडवू नये. निधर्मी भावनेने काय करायचे ते करावे! नवऱ्याच्या डोक्यावरचे पांढरे केस उपटणारी ही नावडती बायको, काळे केस उपटणाऱ्या विरोधी पक्षांच्या नादी न लागता सार्वमतानंतर सुतासारखी सरळ येईल, यात मुळीच संशय नाही.

## □ घबराट कशासाठी ?

मोगलांच्या घोड्यांना पाण्यात संताजी घोरपडे दिसे व मोगल सरदार बिचकणाऱ्या घोड्यांना "पाण्यात संताजी दिसतो काय ?" असे विचारीत. आता लोकशाहीचे युग आहे. परंतु संयुक्त सोशॅलिस्ट खासदार मधू लिमये यांनी लोकसभेत जी धमाल उडवली, त्यामुळे चहाच्या कपामध्ये अनेक उच्चपदस्थांना मधू लिमये दिसू लागला आहे. उच्चपदस्थांनी यापुढे मुळीच घाबरण्याचे कारण नाही. एकतर गेल्या अठरा वर्षांत कुणाही उच्चपदस्थ मंत्र्याला वा अधिकाऱ्याला चौकशी होऊन शिक्षा झालेली नाही. अशी घबराट लोकशाहीप्रधान देशात इतिहासात अनेक वेळा निर्माण झालेली आहे व लोकांचे तोंड धरणे अशक्य असते.

१९१६ सालची गोष्ट आहे–त्या वेळचे इंग्लंडचे पंतप्रधान लॉर्ड ॲस्क्विथ यांच्याविरुद्ध, ते जर्मनांना अनुकूल असल्याचे काहूर माजले होते. त्याच सुमारास आगगाडीतून प्रवास करताना लेडी ॲस्क्विथ यांना एक अमेरिकन स्त्री भेटली. त्या अमेरिकन बाईंना, बरोबर प्रवास करणारी बाई ही लॉर्ड ॲस्क्विथची बायको आहे, हे माहीत नव्हते. ती अमेरिकन बाई, बोलताना विषय ॲस्क्विथसाहेबांवर येताच म्हणाली—

"मला असे एका महत्त्वाच्या गोटातून कळते की क्रप्सच्या कारखान्यात ॲस्क्विथसाहेबांची भागीदारी आहे, आणि त्यांची मुलगी एलिझाबेथ ही एका जर्मन नाविकदल अधिकाऱ्याशी विवाह करणार आहे."

लेडी ॲस्क्विथ म्हणाली—

"अहो, काय सांगता ? ॲस्क्विथ हा माणूस इतका श्रीमंत असेल हे मला मुळीच माहीत नव्हते हो !"

ती अमेरिकन बाई उत्साहाने सांगू लागली—

"सांगते काय ! गडगंज पैसा आहे त्याच्याजवळ पण लोक म्हणतात, स्वतः ॲस्क्विथसाहेब हा साधा-भोळा आहे. पण त्याची बायको मोठी जहांबाज आणि महत्त्वाकांक्षी आहे. तिच्यापुढे बिचाऱ्याचे आयुष्य धुळीला मिळणार आहे. बाई भयंकर दिसते !"

लेडी ॲस्क्विथने विचारले—

"तुमची लॉर्ड किंवा लेडी ॲस्क्विथशी ओळख आहेसे वाटते. नाहीतर—"

त्या अमेरिकन बाईने लेडी ॲस्क्विथचे वाक्य तोडून म्हटले—

"ओळख कशाला हवी ? प्रत्येकाला हे माहीत आहे. शिवाय इतकी कुरूप आहे ती बाई म्हणता !"

हा संवाद लेडी ॲस्क्विथ यांच्या आत्मचरित्रात आणखी पुढे पुष्कळ आहे.

सांगायचे तात्पर्य, मध्यवर्ती मंत्र्यांनी किंवा उच्चपदस्थांनी घाबरण्याचे कारण नाही. लोक काय वाटेल ते बोलत असतात.

१ ऑक्टोबर १९६६

हॅम्लेटच्या सुरात सुब्रह्मण्यम म्हणाले ते बरोबर आहे—"To resign or not to resign – that is not the question !" (राजीनामा द्यावा, की देऊ नये हा मुळी प्रश्नच नाही !)

## ☐ नको तो मूर्खपणा

एकदा एक भारतीय कीर्तनकार चार पैसे मिळावे म्हणून अमेरिकेत कीर्तनासाठी गेला. यासाठी खूप मेहनतीने त्याने अभंगांची इंग्रजी भाषांतरे केली होती. पहिल्या दिवशी कीर्तनाच्या सुरुवातीला त्याने सांगितले की, कीर्तन संपल्यावर ज्यांना जे शक्य असेल, ते द्रव्य शेवटी आरती फिरवण्यात येईल, तेव्हा थाळीत टाकावे.

कीर्तनकाराने निरूपणात मूर्खाची लक्षणे सांगितली व मूर्खाजवळ पैसा राहू शकत नाही, हे सोदाहरण सांगितले.

शेवटचा अभंग सुरू झाला—

"O Lord my humble request meet
Give us only sugar & wheat"
[ हे चि दान देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ।। ]

आरती फिरू लागली. एक छदामही न टाकता सर्व अमेरिकन श्रोतृवृंद निघून गेला. आरतीत पैसे टाकून शिवाय मूर्खपणा पदरात घ्यायला कुणी तयार नव्हते.

— ग्यानबा

• • •

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड
शर्मा स्वीट मार्ट
दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.



सांस्कृतिक क्रांतीचे भूगजळ

## □ लाल भक्षक !

चीनमध्ये सध्या एका नव्या क्रांतीच्या प्रचंड वादळाने थैमान मांडले आहे. ही नवी "महान सांस्कृतिक क्रांती" आपल्या झंझावाती वेगाने मी मी म्हणणाऱ्या जुन्या चिनी कम्युनिस्ट खोडांना मुळापासून उखडून टाकीत आहे. आघाडीचे नावाजलेले कम्युनिस्ट पुढारी 'फेरवादी' (रिव्हिजनिस्ट) 'प्रतिक्रांतीवादी' म्हणून बद्दू केले जाऊन जीवनातून उठवले जात आहेत. स्वत:ला "लाल रक्षक" म्हणवून घेणारी व पाठीशी माओ-त्से-तुंग आणि लिन पियाओ यांचा आशीर्वाद असणारी चिनी मुलांची टोळकीच्या टोळकी चिनी शहरांच्या रस्त्या-रस्त्यांतून स्वैर घुमाकूळ घालीत 'प्रतिक्रांतीवादी' व 'बूर्ज्वा' बुद्धिवाद्यांविरुद्ध उग्र निदर्शने करीत आहेत. जुन्या चिनी संस्कृतीच्या उरल्यासुरल्या खुणा नामशेष करीत आहेत. रस्त्यांची जुनी नावे बदलून त्यांना नवीन क्रांतिकारक नावे देत आहेत. विरोधकांना पिटून काढीत आहेत. साऱ्या चीनमध्ये या लाल रक्षकांनी दहशतीचे वातावरण निर्माण केले आहे.

हे नवे वादळ म्हणजे माओ-त्से-तुंगने आपल्या स्वप्नांतील 'खरा कम्युनिझम' चीनमध्ये प्रत्यक्षात आणण्यासाठी सुरू केलेला अखेरचा निकराचा प्रयत्न. कम्युनिस्ट तत्त्ववेत्ते कार्ल मार्क्स आणि लेनीन यांच्या बरोबरीने जगाच्या इतिहासात

स्थान मिळविण्यासाठी माओचा हा प्रयत्न आहे.' त्यासाठी अवघ्या चीनचा चेहरा-मोहराच बदलून टाकण्याचा तो प्रयत्न करीत आहे.

माओ-त्से-तुंगची 'खऱ्या साम्यवादी समाजाची' कल्पना त्याच्या अनुभवातून उगवली आहे. १९३६ ते १९४० च्या दरम्यान कोमिन्टांग सैन्याच्या उपद्रवापासून दूर येनानच्या पहाडी प्रदेशात माओने, त्याच्या लाल सैन्याने आणि तेथील जनतेने अत्यंत खडतर परिस्थितीत दिवस काढले. गुहांमधून त्यांना राहावे लागत होते, अन्नाच्या एकेका कणासाठी त्यांना अतिशय कष्ट करावे लागत होते. एकेका शस्त्रासाठी त्यांना जीव धोक्यात घालावे लागत होते. मोठ्या कठीण परिस्थितीतून तावून सुलाखून निघाल्यानंतरच ते आपल्या क्रांतीत यशस्वी झाले होते.

चीनमधील नव्या पिढीला या कष्टांची जाणीव आहे की नाही ? या कष्टांची जाणीव आणि अनुभव असल्याशिवाय नव्या पिढीची कम्युनिस्ट क्रांतीवर हवी तेवढी निष्ठा राहणार नाही, याची माओ-त्से-तुंगला भीती वाटते. नव्या पिढींचा कडवेपणा टिकविण्यासाठी तिलाही असेच अग्निदिव्यातून तावून सुलाखून बाहेर काढले पाहिजे, असे माओला वाटते. म्हणून तो आपल्या कडव्या साम्यवादी समाजाचे स्वप्न प्रत्यक्ष आणीत आहे.

माओच्या कल्पनेतील या नव्या साम्यवादी समाजात बुद्धिवाद्यांना मुळीच स्थान नाही. या समाजात प्रत्येक स्त्री, पुरुष, मूल मनाने, शरीराने, कृतीने संपूर्ण कम्युनिस्ट असेल. प्रत्येकजण आपल्या हाताने काही तरी उत्पादक काम करीत असेल. सारा समाज हा खऱ्याखुऱ्या शेतकऱ्यांचा आणि कामकऱ्यांचा असेल. शहरी आणि ग्रामीण, लष्करी व नागरी असे भेदाभेद या समाजात नसतीलच. सर्व समाज हेच लष्कर राहील. शालेय पुस्तकी शिक्षणाची कपात करून प्रत्यक्ष व्यवहाराला उपयोगी पडेल एवढेच शिक्षण देण्यात येईल.

थोडक्यात म्हणजे या नव्या "माओ-युगातील" प्रत्येक व्यक्ती ही शेतकरी, सैनिक, विद्यार्थी, कामगार, क्रांतिकारक असेल व तिची प्रत्येक कृती ही माओ-त्से-तुंगच्या विचारांवर आधारित असेल. असे झाले, सर्वत्र अशी एकच समानता पसरली म्हणजेच सनातन काळापासून चालत आलेला वर्गकलह मिटेल. माओ व लिन पियाओ यांच्या वेळोवेळच्या भाषणांवरून या स्वप्नाचे स्वरूप स्पष्ट होते. १९४९ पूर्वी शेन्सी प्रान्तात येनानच्या आसपास कम्युनिस्ट लाल सेना वावरत असताना त्यांना परिस्थितीमुळे खरोखरच असे जीवन जगावे लागत होते. तेच जीवन पुन्हा चिनी जनतेने जगावे असा माओचा प्रयत्न चालू आहे. आपल्या स्वप्नीचा हा कम्युनिस्ट स्वर्ग प्रत्यक्षात आणण्यासाठीच माओने महान सांस्कृतिक क्रांतीची चळवळ उभारून आपल्या विरोधकांना हाणून पाडले आणि विरोधक पुरेसे खच्ची झालेले पाहून चीनच्या जुन्या परंपरा, चीनमधील भेदाभेद आणि विरोधी सामाजिक शक्ती यांच्यावर हल्ला करण्यासाठी त्याने लाल रक्षकांचे मोहोळ साऱ्या चीनभर उठविले.



‘ फूल बने पत्थर ’

‘ बूर्ज्वा ’ सुखासीनता, ‘ प्रतिक्रांतिवादी ’ वेष व धनसंचय यांच्यावर हल्ले करण्यासाठी लाल रक्षक उठले.

आपले हेतू साध्य करण्यासाठी माओ-त्से-तुंगने या १५ वर्षांखालील छोटया मुलांनाच का हाती धरले हेही उघड आहे. माओला अभिप्रेत आहे तशी क्रांती सैन्याच्या किंवा प्रौढांच्या संघटनांच्या साहाय्याने होणे शक्य नाही. चीनमधील ही पंधरा वर्षांखालची मुले लहानपणापासून कम्युनिस्ट शिक्षणात, माओच्या विचारसरणीचा अभ्यास करीत वाढली आहेत. आणि त्यामुळे माओवर व त्याच्या क्रांतीवर त्यांची अनन्यसाधारण निष्ठा आहे. जुन्या फेरवादी व बूर्ज्वा प्रवृत्तींना ती जेवढया बिनदिक्कतपणे हाणून पाडतील तेवढया जोषात कोणीच हाणून पाडणार नाही.

**लाल भक्षक**

डिवचलेल्या मोहोळाप्रमाणे हे लाल रक्षक उठले आणि नव्या क्रांतीच्या घोषणा करीत आणि जे जे म्हणून प्रतिक्रांतिवादी वाटेल त्यावर कडाडून हल्ले करीत ते पुढे जाऊ लागले. लाल रंग हा क्रांतीचा पवित्र रंग आहे. त्याचा दुरुपयोग करणारांस त्यांनी पिटून काढले. सर्व जगभर रस्त्यांवरच्या आणि इतर खुणांसाठी लाल रंग धोक्याचा म्हणून वापरला जातो. लाल रंगाच्या या भांडवलदारी उपयोगावर लाल रक्षकांनी प्रथम आक्षेप घेतला. रस्त्यावरील व रहदारीच्या इतर खुणांसाठी हिरवा हा विधाचा व प्रतिक्रांतिवादी रंग धोक्याचा म्हणून चीनमध्ये वापरला जाऊ लागला व पवित्र लाल रंग सुरक्षिततेचा निदर्शक म्हणून वापरला जाऊ लागला.

लष्करी संचलनामध्ये सलामी देताना “ दाहिने निगाह ” (आईज राईट) करावे लागते. मान उजवीकडेच का फिरवायची ? उजवा गट हा प्रतिक्रांतिवादी

असतो म्हणून सलामी देताना मान डावीकडेच वळविली पाहिजे, असा लाल रक्षकांनी नियम केला. खाकी कपडे आणि दंडावर क्रांतीची लाल फीत बांधलेल्या या मुलांनी रस्तोरस्ती पाश्चात्त्य पद्धतीचे कपडे घातलेल्या चिन्यांना कपडे बदलण्यास भाग पाडले. न्हाव्यांना पाश्चात्त्य पद्धतीने केस कापण्यास मनाई करण्यात आली. माओच्या विचारांशी सुसंगत असलेल्या पुस्तकांशिवाय इतर पुस्तके न विकण्यासंबंधी दुकानदारांना तंबी देण्यात आली. परदेशांतून आयात केलेल्या चैनीच्या वस्तू दुकानांमधून गायब झाल्या.

शोभेच्या दिखाऊ वस्तूंवर लाल रक्षकांनी हल्ले चढवले. मुलींनी फॅशनेबल कपडे घालणे आणि तोंडावर पावडर लावणे त्यामुळे बंद केले. पुरुषांसारख्याच आकारहीन पॅंट्स् घालायला मुलींनी सुरुवात केली.

धर्म हा तर क्रांतीचा पहिला वैरी. म्हणून त्यांनी बौद्ध देवळात जाऊन बुद्धाच्या मूर्ती उखडून टाकल्या. चर्चेसमधील क्रॉस उपटले आणि परदेशी पाद्र्यांना आणि भिक्षुणींना देशाबाहेर हाकलून लावले. मशिदींमधील मौलवींना पिटून काढले आणि सर्व धार्मिक स्थळी घोषणा चिकटविल्या–"जुन्या जगाचा नाश करा! नवे जग निर्माण करा!"

ज्या ज्या घरांत थोडेसे सधनतेचे लक्षण दिसेल त्या त्या घरात या लाल रक्षकांची टोळकी शिरू लागली. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला पुरेल एवढे सामान सोडून उरलेले सामान जप्त करून घेऊन ते इतरत्र वाटण्यासाठी नेले जाऊ लागले. घराघरांतून अशा झडत्या सुरू झाल्या. श्रीमंत लोकांना पेकिंग आणि इतर मोठ्या शहरांतून बाहेर घालवून देण्यात आले आणि त्यांना शेतावर काम करण्यासाठी पाठविण्यात आले.

अशा रीतीने या लाल रक्षकांनी जेव्हा जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत हात घातला, तेव्हा त्यांना विरोध सुरू झाला. विशेषतः नवनव्या पुढाऱ्यांविरुद्ध ते 'माओविरोधी' वागल्याची आरोपपत्रके काढू लागले, तेव्हा तर त्यांना होणारा विरोध तीव्र होऊ लागला. ठिकठिकाणी लाल रक्षकांच्या टोळ्या आणि इतर लोक यांच्यांत मारामाऱ्या होऊ लागल्या. शेवटी तर या लाल रक्षकांनी चीनचा सुरुवातीपासूनचा पंतप्रधान चाऊ–एन–लाय यावरही आरोपपत्रके काढली आणि त्याच दरम्यान चाऊ पंतप्रधान पदावरून बडतर्फ झाल्याच्या बातम्या येऊ लागल्या.

नव्या वार्तांनुसार लाल रक्षकांच्या अत्युत्साहाने बेजार होऊन त्यांच्या चळवळीला हळू हळू लगाम घातला जात आहे. "प्रतिक्रांतिवाद्यांना शारीरिक इजा करू नका, त्यांची मते वळवा," असा पोक्त सल्लाही लाल रक्षकांचा पाठीराखा लिन पियाओ याने दिला. काही ठिकाणचे कम्युनिस्ट पक्षाचे गट आणि लाल रक्षक यांच्यांतही रस्तोरस्ती हातघाईच्या मारामाऱ्या झाल्या. आणि लाल रक्षकांच्या क्रांतीचा हा हिंसक वेग हळू हळू थंडावू लागला.

**धक्का प्रयोग !**

अद्याप ही लाट ओसरली नाही. पण त्या दरम्यान जुन्या संस्कृतीनिष्ठ समाजाला एक जोराचा धक्का देण्याचा माओचा हेतू साध्य झाला आहे. लाल रक्षकांना विरोध झाला खरा. पण त्यांनी प्रसृत केलेल्या कल्पना समाजाच्या कानांवर तर पडल्या ! त्यातल्या काही अंमलातही आल्या. सामाजिक क्रांती करायची असते ती असेच समाजाला एकामागून एक धक्के द्यावे लागतात. एकाच धक्क्याने क्रांती सफल होत नाही, हा माओचा विश्वास.

विश्वास बसो वा न बसो. या सांस्कृतिक चळवळीचे आणि लाल रक्षकांचे औपचारिक पुढारीपण आहे शँग शिग या माओच्या पत्नीकडे. शँग शिग ही पूर्वी एक सुप्रसिद्ध नटी होती. लाँग मार्चच्या सुमारास ती कम्युनिस्टांकडे आकृष्ट झाली आणि पुढे तिने आपला व्यवसाय सोडून क्रांतिकार्यात उडी घेतली व माओ-त्से-तुंगशी लग्न केले. ३१ ऑगस्ट रोजी लाल रक्षकांचा पेकिंगमध्ये जो प्रचंड मेळावा भरला होता, त्याचे औपचारिक उद्‌घाटन शँग शिगनेच केले होते.

लाल रक्षकांना उठविण्यासाठी अगोदर माओ-त्से-तुंग आणि त्याचा उजवा हात लिन पियाओ यांनी आपल्या विरोधकांचा जो निचरा केला तोही अभूतपूर्व होता. या चळवळीला १९६३ पासूनच सुरुवात झाली. चळवळीची पहिली कुऱ्हाड पडली बुद्धिवाद्यांवर. माओचा जिवलग मित्र व चीनचा सांस्कृतिक पंतप्रधान म्हणून ओळखला जाणारा सुप्रसिद्ध चिनी लेखक को-मो-जो याच्यावर प्रथम टीका होऊन त्याला जीवनातून उठविण्यात आले. पुढे हा वणवा पसरत जाऊन मोठमोठ्या राजकीय व लष्करी पुढाऱ्यांनाही या आगीत भस्म व्हावे लागले. चिनी पॉलिटब्यूरोचा एक महत्त्वाचा सभासद आणि पेकिंगचा मेयर पेंग चेन, आणि शेवटी शेवटी चिनी अध्यक्ष लिउ शाओ ची आणि पंतप्रधान चाउ-एन्-लाय यांच्यापर्यंत ही झळ पोचली.

विरोधकांचा निचरा करण्याची पद्धत जरा सुसंस्कृत आहे. इतर हुकूमशाहीत विरोधकांचा निचरा म्हणजे ते नाहीसेच होणार. पण चीनमध्ये तसे नाही. अपराधी विरोधकांकडून आपल्या "प्रतिक्रांतीवादीपणाची" जाहीर कबुली घेऊन त्यांना सोडून देण्यात येते. गेल्याच आठवड्यात पेंग चेन एका जाहीर समारंभाला हजर होता. राजकीय पुढारी म्हणून नव्हे, तर आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेच्या संघटना समितीचा अध्यक्ष म्हणून.

तूर्त वादळ शमविण्यात आले आहे. लाल रक्षकांना शहरांमधून बाहेर काढून खेड्यांमध्ये शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी म्हणून पाठविण्यात येत आहे.

पण अजूनही 'सांस्कृतिक क्रांती' संपलेली नाही. क्रांती पूर्ण करण्यासाठी माओ चिनी समाजाला धक्का देण्यासाठी लाल रक्षकांसारख्या आणखी कोणकोणत्या चिजा बाहेर काढतो हे हळूहळूच कळेल.

●

## □ भारतात विज्ञानाभिमुख दृष्टिकोन नाही

इंग्लंडमधील "विज्ञानाचे विज्ञान प्रतिष्ठाना"चे संचालक मॉरीस गोल्डस्मिथ यांची 'विज्ञानाच्या विज्ञाना'ची मूलभूत कल्पना काही दिवसांपूर्वी सांगितली. त्यानंतर भारतातल्या बऱ्याच संशोधन शाळा व विज्ञान महाविद्यालयांचा दौरा करून आल्यावर दिल्लीच्या पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीत ते म्हणाले, "पंडित नेहरू ज्या विज्ञानाभिमुख वृत्ती ('सायंटिफिक टेंपर') वर भर देत ती भारतात पसरलेली नाही, आणि आपल्याजवळ असा दृष्टिकोन असल्याचा जे दावा करतात त्यांच्या मागण्यांतही ती दिसत नाही. विज्ञानाची मनोवृत्ती म्हणजे काय? परंपरागत विधानांचा किंवा आंधळ्या समजुतींचा स्वीकार न करता प्रश्न विचारणाऱ्या व आधुनिक युगाचे आव्हान स्वीकारणाऱ्या वृत्तीला विज्ञानवादी वृत्ती म्हणता येईल."

दुसरी गोष्ट म्हणजे भारतीय सरकारी अधिकाऱ्यांच्या मते लोकशाही राज्यात 'ब्रेन ड्रेन' थांबविणे अशक्य असते. पण हे खरे नाही. एखादा वैज्ञानिक जेव्हा आपला देश सोडून जातो, तेव्हा तो केवळ पैशासाठीच निघून जातो असे नाही. संशोधनाच्या सोयी, कामाला अनुकूल वातावरण इत्यादी इतर कारणेही असू शकतील. हा प्रश्न जरी कठीण असला तरी आपल्याला मोकळेपणाने व समाधानाने काम करता येईल अशी विज्ञानविषयक, त्याचप्रमाणे सामाजिक परिस्थिती निर्माण करणे हे त्यावर एकच उत्तर आहे.

मौलिक (बेसिक) व उपयोग प्रधान (अप्लाइड) संशोधनावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण काय असते, हे सांगता येणार नाही. पण महत्त्वाच्या दृष्टीने विषयांचे क्रमांक लावायचे असतील तर पहिला क्रमांक शेतकीविषयक संशोधनाला द्यावा लागेल व त्यानंतरचे स्थान कुटुंब-नियोजनाला द्यावे लागेल. एकूण विज्ञानावर व तंत्रज्ञावर सध्यापेक्षा अधिक पैसा खर्च झाला पाहिजे यात मात्र शंका नाही. भारतासारख्या प्रगतिशील देशाने या खर्चात कपात करणे आत्मघातकीपणाचे ठरेल. शिवाय, सध्या भारतात चालू असलेल्या विज्ञानविषयक अभ्यासक्रमात व विज्ञान-शिक्षणाच्या पद्धतीत शक्य तितक्या लवकर बदल झाला पाहिजे. का?— "आता आपल्या फॅरडे-गॅलिलिओच्या काळातले नव्हे तर रदरफोर्ड—आईन्स्टीनचे समकालीन शास्त्रज्ञ निर्माण केले पाहिजेत."

## □ दक्षिण आशियात भारताचे स्थान

ऑक्सफर्ड विश्वविद्यालयातील राज्यशास्त्राचे एक प्राध्यापक डॉ. सॉल रोज हे दक्षिण आशियातील परिस्थितीची चक्षुर्वै सत्यम् पाहणी करण्यासाठी या प्रदेशातील बहुतेक सर्व देशांना नुकतीच भेट देऊन आले. परत जाताना दिल्लीच्या मुक्कामात त्यांनी आपल्याला दिसलेल्या परिस्थितीची ओझरती कल्पना दिली. ते म्हणाले, "व्हिएटनाम व लाओस हे दोन देश सोडले तर इतर देशांतली परिस्थिती वाटते त्यापेक्षा खूपच अधिक आशादायक आहे. या एकूण सर्व भू-भागांत जो आर्थिक व इतर विकास चालला आहे तो खरोखरीच लक्षात येणारा आहे. इंडोचायनामधली परिस्थिती मात्र गंभीर आहे. सिंगापूर, हाँगकाँग, जपान, दक्षिण कोरिया, इंडोनेशिया, मलेशिया, सयाम या सर्व देशांना व्हिएटनाममध्ये चाललेला रक्तपात थांबावा असे वाटते. पण अमेरिकेने या प्रदेशातून अजिबात निघून जावे, असे मात्र या देशांपैकी बहुतेक कुणालाच वाटत नाही. बऱ्याच दक्षिण आशियाई देशांच्या मते अमेरिकेची या भू-भागातील भूमिका त्यांना उपयोगी पडणारी आहे. चीनच्या धमकावणीमुळे तर या देशांना अमेरिकेची विशेषच उपयुक्तता वाटते."

खरे म्हणजे अमेरिका या प्रदेशातून बराच काळ तरी हालणार नाही असे दिसते. अमेरिकेची इच्छा असली तरी तिला तेथल्या परिस्थितीतून अंग काढून घेणे कठीण जाईल. "पूर्वी ज्या साम्राज्यवादी देशांनी या देशावर राज्य केले त्यांची हीच परिस्थिती झाली होती."


भारताचे दक्षिण आशियात स्थान काय? "भारताला दक्षिण आशियाच्या कारभारात विशेष महत्त्वाचे स्थान नाही. कारण पुढाकार घेण्याजोगी भारताची परिस्थिती नाही. भारतापुढे स्वतःच्याच समस्या पुष्कळ आहेत व स्वतःच्या सीमांचे रक्षण करण्याकडे सर्व लक्ष पुरविणे हेच भारताचे मोठे काम होऊन बसले आहे. एक काळ असा होता की सबंध दक्षिण आशिया भारताकडे सामर्थ्याचा वालेकिल्ला म्हणून पाहत होती. पण त्या देशांची अपेक्षा पूर्ण होण्याइतके सामर्थ्य भारताने कमावले नाही." ●

---

### प्रतिष्ठित दैन्य

फ्रॅन्सीन मॅले नावाची एक फ्रेंच लेखिका नुकतीच भारताला येऊन गेली. तिचे येथल्या दारिद्र्यावर मत: "येथे अपार दारिद्र्य आहे — पण ते प्रतिष्ठित आहे. लोक आपली दैन्यावस्था चव्हाट्यावर मांडीत नाहीत."

---



" मी पाणी वाचतो "
**श्री. अनवलीकर**

# जलशोधनाची नैसर्गिक देणगी

विश्वास बसो वा न बसो, पण काही काही व्यक्तींमध्ये अनाकलनीय अशा काही अतिमानवी शक्ती वास करतात, हे खरे आहे. अत्याधुनिक विज्ञानाच्या साहाय्याने देखील या गूढ शक्तींच्या कारणांचे मूळ शोधणे कठीण जाते.

पंढरपूरपासून चार मैलांवरील अनवली या गावच्या सहासष्ट वर्षे वयाच्या, जन्मापासून दोन्ही पायांनी पांगळे असलेल्या पांडुरंग दिगंबर अनवलीकर (कुलकर्णी) यांच्या वरवर क्षीण वाटणाऱ्या डोळ्यांमध्ये असेच एक अगम्य सामर्थ्य आहे—जमिनीखालून वाहणारे पाणी 'पाहण्याचे'!

" मला पण पाणी वाचता येतं. अहो, यंत्र काय वाचेल असं नेमकं पाणी मी वाचून दाखवतो," श्री. अनवलीकर आत्मविश्वासाने सांगतात. त्यांचा हा आत्मविश्वास सार्थ आहे. वयाच्या दहाव्या वर्षापासून त्यांनी पाणी 'वाचायला' सुरुवात केली. तेव्हापासून त्यांनी दाखविलेल्या जागांवर सांगली, सोलापूर, नगर आणि पुणे या जिल्ह्यांमध्ये आणि मराठवाड्यामध्ये आतापर्यंत अडीच हजारांवर विहिरी खणल्या गेल्या. पण अमुक ठिकाणी पाणी लागले नाही, असे एकाही ठिकाणी झाले नाही. सांगली, सोलापूर, सातारा भागांत अचूक पाणी सांगणारे ते एकमेव ख्यातनाम पानाडे आहेत.

श्री. अनवलीकर पाणी दाखवितात तेदेखील अगदी नेमके. बरोबर किती फूट

खणले म्हणजे पाण्याचा झरा लागेल, तो झरा कोणत्या दिशेने वाहत असेल, जमिनीखालचा खडक कोणत्या रंगाचा असेल, त्याचा प्रकार कोणता असेल, हे ते अचूक सांगतात.

एवढे नेमके पाणी दाखविले जाऊ शकते ही गोष्टच काही जणांना खरी वाटत नाही. भूगर्भशास्त्रज्ञांना तर मुळीच नाही; कारण शास्त्रीय पद्धतीने जमिनीखालचे पाणी शोधून काढण्याच्या ज्या दोन-तीन पद्धती आहेत त्यांवरून पाणी मिळेलच, अशी शंभर टक्के खात्री देता येत नाही. सर्वसाधारणपणे पाणी शोधण्यासाठी ज्या पद्धती वापरतात, त्यांवरून निव्वळ अंदाज बांधला जातो.

## शास्त्रीय पद्धती

पहिली पद्धत म्हणजे आजूबाजूची झाडे, वनस्पती, गवत, मातीचा प्रकार, जागेची उंची, तेथील पावसाचे प्रमाण, सर्वांत जवळून वाहणारी नदी अथवा ओढा वगैरे माहिती मिळवून त्यांवरून अमुक ठिकाणी पाणी असू शकेल काय याचा अंदाज काढणे. महाराष्ट्र सरकारचे शेतकी खाते अशाच तऱ्हेने जमिनीखालच्या पाण्याचा अंदाज घेते.

" परंतु अशा पद्धतीने निवडलेल्या ठिकाणी वाहते पाणी लागेलच याची आम्हांला खात्री देता येत नाही. ते जमिनीखाली किती फूट लागेल, वगैरे अंदाजही करता येत नाहीत, " असे महाराष्ट्राच्या शेतकी खात्यातील भूगर्भशास्त्रज्ञ श्री. शेषराव वागडे यांनी सांगितले. या पद्धतीने पाणी पाहिले म्हणजे ७० टक्क्यांपर्यंत यशस्वीपणे पाणी लागते, असा श्री. वागडे यांचा अनुभव आहे. पण ज्या ठिकाणी जवळपास वनस्पती वा झाडे नाहीत, अशा ठिकाणी मात्र या पद्धतीने पाणी पाहता येत नाही.

महाराष्ट्र सरकारजवळ एका ब्रिटिश कंपनीची काही पाणी ओळखण्याची यंत्रे ( वॉटर फाईंडिंग मशिन्स ) आहेत. पण ती नुसती पडून असल्याचे कळते. विद्युत्-चुंबकीय तत्त्वांवर आधारलेली ही यंत्रे पाणी हुडकून काढण्याच्या बाबतीत कुचकामी ठरली आहेत.

तिसरी एक अतिशय खर्चिक अशी " जिऑफिजिकल " पद्धत आहे. धरणे वगैरे बांधताना जमिनीखालच्या खडकांच्या स्तरांचा अभ्यास करण्यासाठी या पद्धतीचा उपयोग करतात. विहिरीची जागा शोधण्यासाठी क्वचितच. शिवाय या साऱ्या पद्धतींमुळे पाण्याचे अंतर्गत झरेच लागतील, याची खात्री नाही.

## बृहत्संहितेतील पद्धती

प्राचीन भारतात पाणी पाहण्याच्या अनेक शास्त्रीय पद्धती उपयोगात असाव्यात. इसवी सनाच्या सहाव्या शतकात उज्जयिनी येथे वराहमिहीर नामक कोणी एक मोठा ज्ञानी पुरुष होऊन गेला. त्याने रोजच्या व्यवहाराविषयीचा बारीक सारीक तपशील सांगणारा ज्ञानकोशासारखा ' बृहत्संहिता ' नामक एक ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्येच अवदगार्गलं नावाच्या एका अध्यायात जमिनीखालून वाहणारे पाणी कसे हुडकायचे याच्या पद्धती सांगणारे १२५ श्लोक आहेत. परंतु या साऱ्या पद्धती

अमुक झाडापासून इतके हात अंतरावर खणले असता पाणी लागेल, अशा तऱ्हेच्या आहेत. "पुरुषाच्या अंगातील शिरांप्रमाणे जमिनीतही वरखाली जाणाऱ्या जलवाहिनी शिरा आहेत," असे वराहमिहीर सांगतो.

ऱ्हाव्या श्लोकात त्याने सांगितलेली पद्धत अशी : जांबळीच्या पूर्वेस जवळ वारूळ असेल तर त्याच्या दक्षिणेस दोन पुरुषाखाली गोड उदक आहे. अर्ध पुरुष खणल्यावर तेथे मत्स्य व खाली पारव्याच्या वर्णाचा दगड व तेथे नीलवर्ण मृत्तिका ही चिन्हे असली म्हणजे बहुत दिवस राहणारे बहुत उदक लागेल.

किंवा चोपन्नाव्या श्लोकात पायाने ताडन केले असता भूमीचा गंभीर शब्द जेथे होतो, त्या स्थळी साडेतीन पुरुष खणले असता उत्तरेकडे (वाहणारा) झरा आहे अशा प्रकारची वर्णने आहेत. ही सारी, झाडे, जमिनीचा अथवा खडकांचा रंग यांवरून काढलेली अनुमाने आहेत.

## पाणी डोळ्यांना दिसते

परंतु श्री. अनवलीकरांना मात्र जमिनीखालचे पाणी प्रत्यक्ष दिसते, असे ते सांगतात. जमिनीखालचे पाणी साध्या डोळ्यांनी कसे दिसू शकते, हे कोडेच आहे. कुणा चौकस शास्त्रज्ञाने या चमत्काराचा शोध लावण्याचा आजपर्यंत प्रयत्न केला नाही. त्यांना स्वतःला त्यासंबंधी विचारले तर ते सांगतात, "अहो, जमिनीखालून वाहणारा झरा मला चक्क दिसतो म्हणून सांगतो ना–" याच्यापलीकडे त्यांना स्पष्टीकरण देता येत नाही. विशेष गोष्ट म्हणजे तळपत्या उन्हात अथवा स्वच्छ चांदण्यात जमिनीखालचे झरे त्यांना वाहत्या नद्यांप्रमाणे स्पष्ट दिसतात.

श्री. अनवलीकर आपल्या गावी, घरात सापडणे कठीण. कुणीही गरजू माणूस येतो आणि त्यांना आपल्या मोटारीत, बैलगाडीत अथवा सायकलवर घालून, प्रसंगी पाठुंगळीस मारूनही आपली विहीर पाहण्यास घेऊन जातो. मी अनवलीला त्यांना भेटायला गेलो, तो ते पंढरपूरला गेल्याचे कळले. पंढरपुरास चौकशी केली तर तेथूनच बारा मैलांवर असलेल्या भोसे या गावी ते गेल्याचे कळले. धावत पळत त्यांना तेथे गाठले, तो ते आपल्या कामातच गुंतले होते.

ज्या शेतात अथवा जागेत विहीर खणावयाची आहे, त्याची श्री. अनवलीकर प्रथम एखाद्या उंचवट्यावरून पाहणी करतात. त्याहाळून नजरेनेच दोन–तीन जागा निवडतात. मग त्यांपैकी प्रत्येक जागेची जवळ जाऊन खुरडीत खुरडीत अधिक बारकाईने पाहणी करतात. तेथील जमिनीकडे बारीक नजरेने एकटक लावून बघतात. जमिनीला कानही लावतात. आणि शेवटी त्यांपैकी कुठली तरी एक जागा निवडून तेथे किती पुरुष खोदावे म्हणजे कोणत्या दिशेने येणारा पाण्याचा झरा लागेल हे सांगतात. अनवलीच्या, पंढरपूरच्या व आजूबाजूच्या खेड्यांतील बऱ्याच लोकांना मी भेटलो. पण श्री. अनवलीकरांनी अमुक एक जागा दाखवली आणि तेथे मुळी पाणीच लागले नाही, असे सांगणारे कुणीही भेटले नाहीत.

## काही उदाहरणे

उदंड पाण्याच्या विहिरी दाखवून श्री. अनवलीकरांनी ज्यांचे कल्याण केले आहे, असे त्यांना दुवा देणारे मात्र अनेक लोक खेडोपाडी भेटले. नावेच सांगायची झाली तर पंढरपूरचे नगराध्यक्ष औदुंबरशेट कवठेकर, कासेगावचे बाबासाहेब देशमुख, माळीनगरचे सोपानराव बोरावके अशी कितीतरी नावे देता येतील. पण त्यांपेक्षा एक गमतीदार उदाहरण दिले म्हणजे पुरे होईल.

अनवलीचेच श्री. तुकाराम यशवंत कुलकर्णी यांनी आपल्या शेतात आपल्या मनानेच एक जागा निवडून विहीर खोदण्यास सुरुवात केली. श्री. अनवलीकरांशी त्यांचे भांडण असल्याने त्यांनी त्यांना विचारले नाही. पण म्हाताऱ्या श्री. अनवलीकरांनी मुद्दाम जाऊन सांगितले, इथे खणू नका. पाणी लागणार नाही. विहीर पाच ते सहा पुरुष खणली तरी आत काळ्या पाषाणाशिवाय काही लागतच नव्हते. शेवटी तेथूनच पंधरा हात अंतरावर श्री. अनवलीकरांनी दाखविलेल्या जागेवर पुरुषभर खणल्यावर एवढा मोठा झरा लागला, की पाणी उपसण्यासाठी दोन इंजिने लावावी लागली.

१९१७–१८ सालच्या सुमाराची एक गोष्ट पंढरपूर तालुक्यातील अनेक जुने माहितगार अभिमानाने सांगतात. मंगळवेढा हा त्या वेळी फार दुष्काळी भाग होता. तेथे विहिरीसाठी जागा पाहण्यासाठी मंगळवेढ्याच्या नगरपालिकेत मेजर पॉगसन नावाच्या एका युरोपियन अधिकाऱ्याला बोलावले होते. श्री. अनवलीकरांची तेव्हा एवढी ख्याती पसरली नव्हती. तरी ज्या ज्या ठिकाणी मेजर पॉगसनने आपल्या विशिष्ट पद्धतीने पाहणी करून पाणी असल्याचे सांगितले, त्या त्या ठिकाणी मंगळवेढ्याच्या काही लोकांनी मुद्दाम श्री. अनवलीकरांना नेले. श्री. अनवलीकरांनी निक्षून सांगितले की, इथे मोठा थोरला पाषाण आहे. पाणी लागणार नाही, खोदून उगाच खर्च फुकटात घालू नका. पण त्यांना न जुमानता विहिरी खणण्यात आल्या. त्या कोरड्या निघाल्या. शेवटी श्री. अनवलीकरांनी दाखवलेल्या जागीच विहिरी खणाव्या लागल्या. मंगळवेढ्याच्या आसपास ज्या गोड्या पाण्याच्या विहिरी आहेत त्यांतल्या बऱ्याचशा त्यांनीच पाहिलेल्या आहेत.

एखाद्या ठिकाणी पाणीच लागत नसेल तर ते तसे चक्क सांगतात. अगोदर खोदलेली पण पाणी न लागलेली विहीर त्यांना दाखवली तर ते पाहणी करून अमुक एक खडक फोडा म्हणून सांगतात आणि तो फोडताच पाण्याचा झरा लोंढ्यासारखा बाहेर येतो.

वय सहासष्टच्या वर असले तरी श्री. अनवलीकरांची स्मरणशक्ती पक्की आहे. १७ जानेवारी १९०० अशी आपली जन्मतारीख ते ठसक्यात सांगतात. वयाच्या दहाव्या वर्षापासून त्यांना पाणी 'वाचता' येऊ लागले. ज्या दिवशी त्यांनी प्रथम पाणी वाचले त्या दिवशीचीही गोष्ट त्यांना स्पष्ट आठवते. त्यांच्या वडिलांना

आपल्या शेतात विहीर खणण्यासाठी एखादी जागा शोधायची होती. बरोबर ते एका शाळामास्तरला घेऊन गेले. मागोमाग हा पांगळा मुलगाही खुरडत खुरडत गेला. मास्तरांनी एक जागा निवडली आणि तिथे खोदायला सांगितले. पण त्याच वेळी एकदम या मुलाला काय साक्षात्कार झाला कुणास ठाऊक ! तो म्हणाला, "तिथे खोदू नका, पाणी सापडणार नाही. मी सांगतो तिथे खोदा."

बापाने विचार केला; बघू या तर खरा मुलाचा पायगुण. आणि मुलाचा पायगुण खराच चांगला निघाला. त्याने दाखवलेल्या जागेवर चांगला वाहता झरा लागला. पुढे या पायगुणाच्या मुलाला आपापल्या विहिरी पाहण्यासाठी आजूबाजूचे शेतकरी नेऊ लागले. आणि जेव्हा त्याने दाखविलेल्या जागी अगदी अचूकपणे पाणी लागतेच असे सिद्ध झाले, तेव्हापासून त्याची 'पानाड्या' म्हणून ख्याती झाली.

आता कुणीही गरजू श्री. अनवलीकरांना उचलून घेऊन जातो आणि आपली विहीर पूर्ण झाली की, त्यांना शेला-पागोटे किंवा काही दक्षिणा देऊन त्यांची बोळवण करतो. श्री. अनवलीकरांनाही मानपान काही नाही. पाणी पाहण्याचे कुणाचेही बोलावणे आले—मग तो जमीनदार असो वा गरीब शेतकरी असो, ते नाही म्हणत नाहीत.

**रसिक पानाडे**

श्री. अनवलीकरांचे शिक्षण मराठी ५ व्या इयत्तेपर्यंत झालेले, पण त्यांना वाचनाची दांडगी हौस. मिळतील तेवढी वर्तमानपत्रे विकत घेऊन रोज ती सर्व ते वाचून काढतात. त्यांची अनवली येथे थोडीशी जमीन आहे. ते आजन्म ब्रह्मचारी आहेत आणि एक मुलगा त्यांनी दत्तक घेतला आहे.



कधी कुणाच्या पाठीवर....

पाणी पाहण्याची विद्या अवगत असली तरी इतरही गोष्टींत त्यांना फार रस. अनवली गाव सांगली संस्थानात असताना १९४७ पूर्वी ते गावच्या स्कूल कमिटीचे मेंबर होते. पोथ्या, कथा सांगणे हा त्यांचा फावल्या वेळचा उद्योग. भविष्यही सांगतात. वीणा, मृदंग

आदी वाद्यांवर नैसर्गिकपणेच त्यांचा हात चालतो.

त्यांच्या गरजाही फारशा नाहीत. कोठे प्रवासात असले, तर पंधरा-पंधरा दिवस ते शेंगदाणे आणि चुरमुऱ्यांवर काढतील. कडक उन्हात बसणे त्यांना फार आवडते. तासन् तास ते तळपत्या उन्हात बसून राहतात. कडक तापलेल्या सडकेवरून सहज रांगत जातात.

श्री. अनवलीकरांना जवळपासचे लोक सख्याहरीकाका म्हणतात, तर बाकी सारे लोक त्यांना देवबाप्पा म्हणून ओळखतात. त्यांना विचारले, "देवबाप्पा, ही पाणी पाहण्याची विद्या तुम्ही कशी शिकला ?" तर ते म्हणतात, "अवं मी कसली शिकतो विद्या. ही देवाची कृपा आहे झालं."

## संशोधनाची आवश्यकता

आणि खरेच त्यांच्या डोळ्यांतील सामर्थ्य तसेच आगळे असावे. ज्या प्रकाशलहरी साध्या माणसाच्या डोळ्यांच्या पडद्यावर काहीच परिणाम करू शकत नाहीत, त्या त्यांना कदाचित् दिसू शकत असतील. ज्या ध्वनिलहरी आपल्या कानांच्या पडद्यांना हलवू शकत नाहीत, त्या त्यांना कदाचित जाणवत असतील. हा एक सखोल संशोधनाचा विषय आहे.

दरम्यान आपल्या देशात-विशेषत: महाराष्ट्रात-अधिक अन्न पिकविण्यासाठी पाण्याची गरज वाढली आहे. महाराष्ट्रातील साऱ्या नद्यांचे पाणी जरी वापरले तरी एकूण जमिनीपैकी १८ टक्के जमिनीतच बागायती शेती होऊ शकेल. आजच्या बागायती शेतीपैकी ५० टक्क्यांच्यावर जमीन विहिरीतील पाण्यानेच भिजते. जमिनीखाली पाण्याचा प्रचंड साठा असतो. पृथ्वीवरील समुद्रामध्ये जेवढे पाणी आहे, त्याच्या एक तृतीयांश भाग पाणी जमिनीखाली असावे, असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. फक्त ते नेमके हुडकून मात्र काढले पाहिजे.

श्री. अनवलीकरांची नेमके पाणी पाहण्याची विद्या प्रयत्नाने साध्य होऊ शकेल काय, याचे संशोधन झाले पाहिजे. श्री अनवलीकरांसारखेच नैसर्गिक शक्ती असलेले पानाडे आणखी काही ठिकाणी आढळतील. त्या सर्वांचा अभ्यास करून हे संशोधन करता येईल. किमान भूमिगत पाणी शोधून काढण्यासाठी अशा नैसर्गिक देणगी असलेल्या पानाड्यांना पुरेशा सवलती देऊन त्यांचा योग्य उपयोग करून घेण्याचा प्रयत्न सरकारने केला पाहिजे.

मी 'देवबाप्पां'ना विचारले, "देवबाप्पा, सरकारने तुम्हांला एखादे वाहन दिले आणि सांगितले, लोकांसाठी पाणी पाहत हिंडा, तर तुम्ही कराल ते काम ?"

त्यावर देवबाप्पा माझ्याकडे पाहून हसले. म्हणाले, "का नाही बाबा ! अरे, वयानं थकलो असलो म्हणून काय झालं ? काम पाण्याचं आहे ना. ते केलंच पाहिजे."

● ● ●

## कफन

अपरंपार खुणा उमटल्या आहेत
रक्तात माझ्या...नियतीच्या क्रूर पावलांच्या
गळणारे दुःख गहन आभाळ भोवळत आहे
पायांतल्या भूकंप स्फोटामुळे
अस्ताव्यस्त क्षणांचा संसार
वाचीत आहे शिलालेख
जीर्ण झालेल्या तीस पानांनी लिहिलेला...
विलक्षण गतीने झेपावत आहे डांबरी वादळ
खोल खोल डोळ्यांच्या तळात...
आठवांचा मेंदूत घुसणारा प्रवाह
तेजाळून जातो अकस्मात
हात तुटलेले प्राण विव्हळतात
आर्ततेच्या व्यथित खळग्यात
उजाड राऊळाची खपली
वेगात उसवते... रक्ताच्या प्रचंड उसळीने
त्यावेळी बर्फाचे लाल कफन
माझ्या शवावर असते.

—*कुसुमानंद*

## जिथे पाय ठेवू –

का रे इतुका तू
झालास निष्ठूर
डोळ्यांत कापूर
पेटे माझ्या...
जिथे पाय ठेवू
तिथे तुझी खूण
पाखरा परतुन
येशील का... !
विठू म्हणे तेव्हा –
सारे लागेबांधे
तोडून टाकिले
छंदमुक्त झाले
काव्य माझे...
श्रद्धेच्या श्राद्धाचे
घातले भोजन
पुण्य पिटाळून
लाविले की...
— अणूरेणू माझा
संतानला जेव्हा
विठू म्हणे तेव्हा
वर माग... !

—*प्रसन्नकुमार पाटील*

## हिरवी काविळ क्षणात झाली

या वाऱ्याचा स्पर्श असा की
मनात काही भलते यावे
माळावरती स्वैर हिंडता
आगित हिरव्या ओठ जळावे
या वाऱ्याचा स्पर्शच लुब्रा
वठलेल्या झाडाला फुटली
हिरवी पाने, फत्तरांतुनी
एक चांदणी तेव्हा हसली

आषाढातील चिंब सकाळी
वारा होतो लाघट मोठा
माळावरती शांत सागरी
गवताच्या चुरगळतो लाटा
झुळझुळणारा वारा येता
असे बसावे, असे उठावे
अत्तरदाणी दवबिंदूंची
ओले कौतुक हुंगुन घ्यावे

आगित हिरव्या ओठ जळाले
आली नकळत फुंकर ओली
या वाऱ्याचा स्पर्श असा की
हिरवी काविळ क्षणात झाली

—मिलिंद

# आस्वाद

अमुक एक वृत्त म्हटले म्हणजे अमुक एक विषय असलाच पाहिजे असा संकेत आहे. प्रसन्नकुमार पाटलांनी 'दोन अभंग' लिहून तो पाळला आहे. पण विषय तोच असला तरी आशय किंवा रस तसाच पाहिजे असे नाही. पहिल्या अभंगातली तळमळ काहीशी पारंपरिक असली तरी आविष्कार नवीन आहे. दुसऱ्यात सगळेच नवीन. माणसात देव जागृत झाला म्हणजे नव्हे, तर सैतान संचारला म्हणजे परमेश्वराने म्हणावे, 'वर माग.' पण यातही एक मुग्धता आहे. काव्य छंदाच्या आणि मन श्रद्धेच्या खोड्यातून काढून टाकल्यावरची ही अवस्था दिसते. आपल्या विठूशी झगडा करणाऱ्या भक्ताचा हा नवा विवाद आहे.

द्वंद्व किंवा विरोधाभास हा पुष्कळदा उत्कटतेचा स्वभाव असतो. नेहमी जरी नाही, तरी कधी तरी हा स्वभाव उसळून येतो. हे द्वंद्व आजच्या कवितेत थोड्याफार फरकाने सर्वत्र दिसत असले, तरी 'कफन'सारख्या एखाद्या कवितेत त्याचा उग्र आढळ आपणाला होतो. यात स्मरणालंकार आहेच. बहुधा तीस वर्षांच्या काळातल्या कटू स्मृती आहेत या. 'डांबरी वादळा' पासून 'बर्फाचे लाल कफन' येईपर्यंत आपण विरोधाभासातूनच जात असतो! पण या साऱ्या चित्रणाला उठाव देण्याकरिता कुसुमानंदांनी कांहीं फिकट पार्श्वभूमी ठेवली असती, तर कवितेचा परिणाम अधिक झाला असता.

'हिरवी काविळ क्षणात झाली' या चमत्कृतिजन्य शीर्षकाने आपण कविता वाचू लागतो, पण प्रत्यय वेगळाच येतो. वाऱ्याच्या स्पर्शाने हलविलेल्या संवेदनांची रंगत पाहायला मिळते. आशय मनावर बिंबावा म्हणून मिलिंदांनी वारा सर्व कवितेभर खेळवला आहे. हा वारा 'लुब्रा' आहे, 'लाघट' आहे, 'झुळझुळणारा' आहे. दवबिंदूंची अत्तरदाणी ही कल्पना थोडी खटकली. आडवळणाने अर्थ घेतला तर जुळत नाही असे नाही, पण 'फत्तरातली चांदणी' जशी स्पष्टपणे गोचर होते, तशी ही अत्तरदाणी दिसत नाही! वाऱ्याइतकाच हिरवा रंग कवितेभर उधळला आहे. पण दर ठिकाणी वेगळी अर्थच्छटा आल्याने तो ठाकठीक वाटतो. पण तपशील कुठे अंधुक असले तरी या कवितेचे खरे बळ तिच्या गतिमानतेत आहे.

—गोपीनाथ तळवलकर

●

हा गोऱ्हा माझा दावेदार. आमच्या थोरल्याचा मात्र पंचप्राण होता. पार वाटुळं व्हायची वेळ आली. पन थोरल्याला सूद ती कशी आली नाही.

# सात जन्माचा वैरी!

## विष्णु गुंजाळ

भरल्या गव्हानीत हजार खिल्लारी झुलताहेत. मांडवात बांधून हायेत बैलं. अंबारी दिली हाये जत्रंकरता ! त्यांच्यासाठी सेपरेट पेंड, सरकी, उडीद, शेंगांची पोती थप्पी लागली हाये. चार गडी त्यांची देखभाल करताहेत. थोरला पटका बांधून 'टेचीत' गावात हिंडतो हाये. लागलं सवारलं बघतो हाये. धनधान्यानं घर 'ठेल' भरलं हाये. पाच-पन्नास मानूस रोज शेतात झुलतं हाये. महामूर जमीन. हत्तीच्या मस्तकासारकं पानी. देवदयेनं गोठा भरला हाये. सताठ गाया, म्हशी. म्हातारीचा कामानं झेंडू फुटला हाये.

बापाचा फेऱ्याचा धंदा जोसात हाये. सातसात, आठआठ खटारगाड्या म्हातारा एकटा हाकतो हाये. देशावर मिरच्या, कान्दा, लसून भरतो हाये. तिकडं कोकनात नेऊन इकतो हाये. तिकडन सुकट बोंबील भरतो हाये. इकडं इकतो हाये अमदानीचा काळ हाये......... चारी दारानं घर भरतं हाये.........

"तुम्ही आता उठणार आहात का मी जाऊ?"

"अं?"

"आज बाजार हाये. सूद हाये का?"


"मंग काय करू?"

"असं किती येळ बसणार आहात?"

"काय करू म्हनतेस?"

"एखादी शेळी तरी बघा इसपस्तीसापर्यंत. पोरं माजी तटातटा उपाशी मरताहेत."

"हा."



" हा काय ! त्या दिवशी एक पोतंभर दानं आना म्हनलं. आनलं ?"

" नाही."

" मंग ' हा ' कशाला म्हणता ?"

" मंग दुसरं काय म्हनू ?"

" मी तुम्हांला ' काही ' सांगू का नको, ते तरी सांगा ? पावसापान्याचे दिवस आले, पोरांच्या अंगावर बोटभर कापड नाही माझ्या. एक पोरगं व्हटेलात चाकरी करतंय त्याला तरी काही घ्या."

" बघतो मी उसन-पासनं करून !"

" म्हंजे काही करणार नाही !"

डोक्यात किडं पडावं तसा तो बाहेर पडतो. काय सांगायचं बायकोला ? पानकळा तोंडावर आला हाये. एक-दोन ' खटारी ' बघितली पाहिजेत. जवळ तर ' इख ' खाया पैसा नाही. ऊन मी म्हनतं हाये. जनावरांचा बाजार फुल भरला हाये. नामचंद बैलं आल्यात. तो उगीचच बापजाद्यांचा काळ आठवतो. गोळीसारखा चघळतो. हल्ली मनाला हाच एक चाळा लागला हाये.

" रामराम तात्या." तलाठी हटकतो.

" रामराम. काय बाजार ?"

" मंग दुसरं काय ?"

" येतो......"

" अरे तात्या, ते आपलं......सरकुल–भाऊसाहेब......त्या दिवशी चावडीवर

म्हनत व्हतं......तुमच्या शेताचा निलाव हाये म्हनून......"

"शेताचा निलाव ?" तो दचकतो.

"हा. तुमचा तो सावकार ? दगडूशेट. त्याची काही थकबाकी हाय म्हनं. त्यानंच तर सरकारमार्फत निलाव आनलाय."

"असं म्हनता ?"

"तुम्हाला नाय माहीत ?"

"नाय बा."

"बघा बुवा. सताठ दिवसांत काही तरतूद झाली तर अब्रू वाचेल. मी सांगतो तसं वाटलं तर भाऊसाहेबांना......"

"बरं बरं बघतो."

हे उगीचच ! त्याला माहीत असतं. एक फुटकी कवडी कुनी देनार नाय बापाचा माल घेतलाय, त्या सावकाराचा. तो का सोडील ! काळीज चावतं. पाय लटपटतात. जिवाला खात बसन्यात आता अर्थ नाही. त्याला कळून चुकतं. पन त्याबिगार दुसरा मार्गच नसतो.

संसाराचा विचकोबा झाला हाये. कामधंद्यावरचं लक्ष उडालं हाये. पायाला पानं बांधून तो हिंडतो हाये. काळीज पाठीवर घेऊन ! कुणाला सांगायची कर्मकथा ! मागं दोनचार रोपीटोपी पोरं. पानकळा तोंडावर आला हाये. शेतात अजून नांगराचं तास नाही. बैलबाडदाना बसला हाये. पिकलंच नाय तर खानार काय ? उल्हासंच नाही मनाला. कशानं उभारीच येत नाय. वाटतं, 'आपल्याला कुनाचा तरी तळतळाट भोवतो हाये.'

कुणीतरी 'चेडा' आपल्यामागं लागला हाये. नाय तर असं व्हतं कसं ? दोन्ही हातानं थोरल्यानं उधळलं. नाही नाही ते रंगढंग केले पन तरी अमदानी हाटली नाय. मी पैलवान गडी. आईच्यान् सुपारीच्या खांडाचं व्यसन नाय, पन घरात चिमणी कोकली तर दाना नाय ! चित् थाऱ्यावं हाये कुनाचं ! तो समंध अजून छळतो हाये.....

'त्याचा' माझा आजकालचा वाद नव्हता. सात जन्माचं वैर व्हतं आमचं. आयुष्यात मी त्याच्या इक्ता दुस्वास कुनाचा केला नाय. लई जळ्लो. त्याला बघितलं की माझं टाळकं सरकायचं. त्याच्या इक्ता तरास कुनी मला दिला नाय. अर्थात् माझ्या इक्ता मारही त्याला कुनी दिला नसल. लई छळला. आक्रीत–त्याच्या शिरी केलं ! बैलाची जात ती काय ! पण मानसापक्षी जास्त शहानी.

तिगस्ताची गोष्ट. थोरला सताठ दिवस घरात पडून व्हता. बैलं रानात सुटली व्हती. बैल चारायला तर कुनी नव्हतं. म्हातारा थंडीनं काकडायला लागला. बरं, बैलं बांधून तरी किती दिवस ठेवायची ? दुसऱ्या बैलक्यांना म्हनायला गेलो तर ते ऐकानात. मारकं बैल तुमचं सोडतो कोन वो ? बरं बैल आमचं थोरल्याशिवाय

कुनाला जवळ येऊ देत नसत. माझा तर वारा पडून देत नसत. 'म्हणून मन धीट करून थोरल्याला म्हनलं, तर तो माझ्यावर फिरला. म्हनला, 'तुला मरायचं हाये का ?' मंग मी भडकलो. समजतो काय हा सोताला नि आपल्या बैलाला !

"मला माहीत हाये. तुझ्या गोऱ्ह्याला मी मारीन म्हनून तू म्हनतोस."

"त्याच्या वाऱ्याला तरी उभं राहायची तुझी छाती हाये का ? तर तू त्याला चारायला नेनार. उचलून टाकीन तव्हा कळल."

मी गप बसलो. चांगला दिवस मावळू दिला. जेवनावळ झाली. माझा नि गोऱ्ह्याचा वाद आहे पन म्हणून त्याला इक्त भ्यायचं ? उद्या भाऊ नसल्यावर ? करूनच दाविन. भाकर खाल्ली नि खाली मांडवात आलो, तसा काळा गोऱ्हा फुसकारायला लागला. पायानं माती उकरू लागला. याला माझा वास तर येत नाही ? ताटकाळ वळखीतय ! मी जवळ आलो तसा तो माझ्यावर धावला. मंग माझं टाळकं सराकलं.

जवळ पहार पडली व्हती. उचलली तशी शिंगाडात टाकली. झांजारलं. सराकलं मागं. मंग दुसरी बैलं मी खुली केली नि त्याच्या वेसनीला कासरा लावायला गेलो. तसा तो डोळं झाकून माझ्यावर धावला. नशिब, माझं दोन्हीपैकी एक चऱ्हाट तुटलं, नायतर डेडुळच बाहेर काढलं असतं. मी हाबकलो. पन म्हनलं 'भ्यालं का भ्यालं !' याची आज पच्ची करायची. जे व्हईन ते व्हईन. मी मंग मागं सरून परत एक पहार त्याच्या शिंगाडात टाकली. तसा पटकन् पडला तो. म्हनलं, 'आटचापलं' पन तो सावध व्हता. चुचकारून मंग त्याला कासरा लावला नि घोंगडी, पऱ्हानी, लांब वेळाची काठी घेतली नि बैलं रानात हाकली. चिमुत् तो पुढं निघाला.

रानात जाईपर्यंत माझ्या जिवात जीव नव्हता. पन धीर सोडला नाय. म्हनलं 'व्हईन ते व्हईन.' रानात बैलं शिरली तशी त्याला मी लांब कासऱ्यानं बाभळीला बांधला नि वर उमाठ्याला जाऊन बसलो. म्हनलं, 'नरामलं इच्या बायलीला. पन तरी रात वैऱ्याची हाये. बटकीचं डुक धरीन. सावध राहिलं पाहिजे. नायतर खल्लास !

मधानी रात व्हायला आली तरी दुसऱ्या बैलक्यांचा पत्ता नाय. जीव धाकधुक करतो हाये. अजून बैलके कसं आलं नाहीत ? आरं एव्हडं भिता या कावळ्याच्या पिल्लाला ? या नायतर नका येऊ. मला काय ध्यान हाये. उद्या दादाच्या तोंडून माझा 'परताप' ऐकतान तव्हा कळल.

मला कव्हा डोळा लागला कळलाच नाय बरं का. जागा व्हवून पाहातोय तर वैरी शेजारी उभा. माझ्या हालचालीची वाट बघतोय. मला दरदरून घाम फुटला. म्हनलं, 'मेलो आता. आतामातर खैर नाही. गाठ समंधाशी हाये. बळाचा काही उपेग नाही. उठलो आपून का मेलो' दुष्मन मार मला हुंगतोय. माझी हालचाल

मी खिनभर थांबवली. तसं त्यानं माझ्या तोंडावर तोंड ठेवलं. मी स्वासूस्वास रोखला. मनात म्हनलं, 'वैरी आतामातर काटा काढल्याबिगार न्हात नाय.' किती काळ आपुन स्वास रोखणार ? स्वास रोखला तर काळीज धाडधाड उडू लागलं. निस्ता पडून तरी कव्हर राहू ?

मी घोंगडीतून टुळूटुळू पाहातोय. चंद्र मावळायला चाललाय. बैलं चरत्यात. काही टेकल्यात. ह्याचा मातर खडा पहारा. चाहूल लागली की वैरी हुंगायला यायचा. तोंडानं ढुसनी देऊन बघायचा. मी मेल्याचं सोंग घेऊन पडायचो. आसपास कुनाचा सूवारा नाय. हा बैल खैस तर नाही !

झावाळलं तसा मी पालथ्याचा उताना झालो. अंग ताठून गेलं होतं. त्यानं वळाखलं. आला तसा हुंदाडायला लागला. शिंगं धरावी तर समुर मरान दिसत व्हतं. घोंगडी नाय सोडावी तर अंगाची सालटं निघत व्हती. भीतीनं दातखिळ बसायची वेळ आली होती. सकाळी सताठ गडी धावत आलं तव्हा सुटका झाली.

असा हा माझा दावेदार, आमच्या थोरल्याचा पंचप्राण होता. पार वाटुळं व्हायची येळ आली पन थोरल्याला सूद कशी ती आली नाही. सातचाव केले थोरल्यानं त्याचे. कारण हा घरात आला नि थोरला नादावला. बैल दिदारू. पळायला जबरा. ह्याच्यासाठी थोरल्यानं शेपन्नास बैल बदलला. पन ह्याला जोड मिळाली नाही. हा बैल वे. तो इक. आज काय म्हसे. उद्या काय बेल्हं. हा सतराशाचा, तो बावीसशाचा. सगळा सत्यानास केला असल तर या खैसानं. घरातील एकून एक मानसाला ह्यानं मळून काढलं व्हतं. बाप बोंबलायचा. पन हे वक्ट थोरल्यानं इकलं नाही. कारन थोरल्याला ह्याच्यामुळं नावलौकिक मिळत व्हता, भाम नह्याराचं नाक भिम नह्यारानं कापलं ते ह्याच्यामुळं ! ह्याचा तालेवारपणा थोरला मानून घेई.

जत्रा सुरू झाल्या की, ह्याला 'फुरान' चढायचं. डफडं वाजलं की हा कावराबावरा व्हायचा, नाचायचा. आज काय पिंपळगाव, उद्या काय तळेगाव. थोरला गाडा घेऊन जायचा. मागं गावचा शेपन्नास गडी. तो दिमाख. इनामाचा गाडा म्हनल्यावर थोरल्याच्या अंगावर चाटूभर मांस चढायचं.

थापलिंगला थोरल्याच्या अंगावरून गाडा गेला. बाजेवर घालून भावाला घरी आनलं. पन त्याला त्याचं काहीच नाही. कारन थापचिंगला पहिला नंबर आला व्हता ना !

या गोऱ्ह्याचा नि माझा वाद कसा पडला मला नाही सांगता येनार. नाय पन हे वक्ट मला पहिल्यापासून आवडत नसं. अहो द्वाडचं ! आल्याबरोबर आईला खासंत घातलं. गाय इकडं जीव काढतेय नि हे भूत तिला प्यातय. मंग झीट नाय येईन मानसाला तर काय व्हईन ? मी त्याच्या तोंडावरच लाथ मारली व्हती, अशी की जन्माची याद राहावी !

माझा त्याचा परसंग फारसा येतच नसे. गुराढोरांत माझा कधीच जीव गुतला नाही. त्यात हे भोसडीचं बहात्तर खोडीचं. आठआठ दिवस ह्याला कुणी सोडीत नसे. एकदा सुटलं की बोंबाबोंब. भाऊ जाग्यावर नसला की मला त्याची सोडबांध करावी लागायची. गुडघं कोपरं फुटायचं. मग मी रघात पडस्तंवर मारायचो. थोरल्याला कळलं की तो रुसायचा, महिना महिना मंग बोलणं बंद !

माझा नि त्याचा डावच पडला व्हता. मला पाहिलं की ह्या वाकारायचा, फुस्कारायचा, शिंगानं माती उकरायचा. तरी सदा वेसनीला चऱ्हाट, आलगुज असायचं. पन त्याला त्याचं काहीच नाही. अहो शेवटपर्यंत दोरीच तोडली नव्हती थोरल्यानं ह्याची ! मी ह्याला कधी शिवतच नसे. पण परसंग पडला की मी दणकवायचो. अशी तळतळ यायची ह्याची. कारन थोरला मला नाही नाही ते बोलायचा. पन करतो काय ? थोरल्याचं लाडकं ! मारलं हानलं तर गडी रुसून जायचा सासूकडं.

मला ह्या गोऱ्ह्याची खरी तळतळ आली ती आंबेवहाळापासून. तव्हापासून तो माझ्या मस्तकातच बसला. हौसेनं मी चैतीला गाडा घेऊन गेला. आता आंबेवहाळ का ह्याला माहीत नव्हता ? पण माझी अब्रू घ्यायची ना ! ढुंगाला पाय लावून मी पुढं पळतोय. टकळी वाजवून त्याला 'ये ये' म्हणतोय. पन हे शिप्तार दुसरीकडं गाडा घेऊन गेलं. मंग तळतळ नाय येईन मानसाला तर काय व्हईन ? सारी थाप वळखीची जत्रा समोर बसल्याली. परटाच्या गाडयाची वाट पाहात ताटकाळलेली. खाली गाडा सोडायला गावचा शेपन्नास गडी उभा. 'वावधान्याची टाळी झाली' एवढच ऐकायची सर्वांची इच्छा. पन ज्याला त्याला खाली पाह्यला लावलं भडव्यानं. अशी चीड आली व्हती की टाळक्यात कुऱ्हाड टाकून डोकं दोन भाग करावं ! काय चोचले पुरवले साल्याचे !!

दुष्मना, पन तू सूड उजरलास. एक तुझा धनी सोडला तर तुझे सारे चोचले मी पुरवले व्हते. अरे, थोरला उभा असता तर मला 'ह्याची' काहीच जरूर नव्हती. शप्पत सांगतो मला यात बिलकुल गोडी नाही. अन् मला काय माहीत प्रत्येक वेळी तुला थोरला लागतो म्हणून !

आदल्या दिवशी रात्री तुझी दृष्ट काढली. तुझी ऊठबस केली, रातभर जागून. म्हनलं, 'उद्या त्याला मानचं पान जिखायचं हाये. भाम नह्याराचं नाक कापायचं हाये. वाद्या दुष्मनाचं काय सांगावं ? एखाद्यानं काही 'घासकुटका' चारला म्हंजी ? पन मंग जिवाला आला तो त्याग ! चीड !! तळतळ !!!

'परटाचा गाडा आला' म्हनल्याबरोबर सगळा घाट थाप झाला. 'सुटला सुटला' म्हनता म्हनता 'वळाला वळाला'ची मुमका फुपाटचावरोबर घाटात पांगली. रंगाचा बेरंग झाला. भर उन्हाचा घाट फुटला. किती नाराज झाले लोक.

मी भर उन्हाचा घाटात थिजलो व्हतो. काय झालं हे ! थोरला हाय खाऊन मरेन आता...

अन् अखेरी झालंही तसंच. सताठ दिवसात थोरला गेला. म्हातारा मेला. मी खचलो होतो पन तितकाच सुडानं पेटलो होतो.

जत्रा संपल्या नि मी अंग झाडून कामाला लागलो. नांगरट पडली व्हती. पानकळा तोंडावर आला व्हता. उभ्या जन्मात तू कधी काम केलं नव्हतंस. मानाचा तू ! पन मी तुझी पंधरवड्यात माती करून टाकली. तुझी पेंड, दाना, सरकी, एवढंच काय तुझा कडबा, 'घास'सुद्धा मी तोडला. तुझ्यासाठी होती फक्त सरमाडीची पेंढी ! गाडाभर काम !! तुझ्या डोळ्यादेखत मी शेजारी बैलांना रग्गड चारीत होतो. पन तू गुमान बघायला तयार नव्हतास. अशा वेळी तुझ्या डोळ्यांतून टिपं गळालेली मला पाह्यची व्हती. एव्हडा काय तू ताठ्याचा लागून गेला होतास ? काय असं मला सुख दिलं होतस ? पन तरी तू गप सगळं सहन केलंस. मंग मातर माझा स्वाभिमान जागा झाला. तुला छळू नये इक्ता छळला, तुला मारू नये इक्ता मारला, इक्तं मी तुझ्या शिरी केलं. आठवत असेल तुला !

शेवटी पेरणी झाली नि मी तुझा निकाल लावला. तुला कसाबाला देऊन टाकला. माझ्या संसाराला लागलेलं 'भूत' मी माझ्या हातानं गाडून टाकलं !

पन आज मी जिवाला खात बसलो हाये. नेहमीच बसतो. बाप गेला. भाऊ गेला. त्यांच्याबरोबर त्यांची अमदानीही खलास झाली. आज हाये काय माझ्याजवळ ? फक्त आठवण माझ्या बापाच्या अमदानीची. माझ्या भावाच्या नावलौकिकाची. गोठा माझा रोडावला हाये. संसार माझा नासला आहे. चित् माझं थाऱ्यावर नाही. व्हतं कसं ? झालं कसं ? का ? कुनाचा तळतळाट ?

भरल्या गव्हानीतून मी तुला कसाबाच्या दावणीला बांधला. तुला मी माझ्या दारात मरू दिला नाही. माझ्या बापाच्या ऐश्वर्याला, माझ्या भावाच्या वैभवाला मी कवडी किमतीचं लेखलं !

वावधान्या, आज पस्तावा व्हतो हाये रे. पस्तावा व्हतो हाये. तू गेलास नि तुझं राज्यही गेलं रे. तो सुकाळ नाही आता. पोरं माझी रानोमाळ भटकताहेत. कुनी व्हटेलात चाकरी करतो हाये. काय सांगू ?

तुझा एवढ्यात 'खिमा'सुद्धा झाला आसन्, पन तुझा आत्मा इथंच कुठंतरी हिंडत आसन. नक्की सांगतो.

तू माझा पिच्छा सोडणार नाहीस ! इक्तं मी तुझ्या शिरी केलं हाये. दुष्मना, दावेदारा, एकदा माझ्या गोठ्याला पाय लाव तरी. मला माहीत हाये. तू इसरणार नाहीस. सात जन्माचं वैर हाये आपलं !

● ● ●


सादर सप्रेम निमंत्रण
५६०२६ विचारी माणसांनी
आपले मूल्यवान दागिने, जडजवाहीर आणि दस्तऐवज
पंजाब नॅशनल बँके च्या
सेफ डिपॉझिट लॉकर्समधे सुरक्षित ठेवलेले आहेत. भारतांत १८२ ठिकाणी पंजाब नॅशनल बँकेची सेफ डिपॉझिट लॉकर्स आहेत. ही लॉकर्स भक्कम आणि सुरक्षित आहेत. त्यांना चोराचिलटांचे, आगीचे, वाळवीचे भय नाहीं. आपली मूल्यवान चीजवस्तु या सेफ डिपॉझिट लॉकर्समधे ठेवण्यासाठी आपणांसही
सादर सप्रेम निमंत्रण
पंजाब नॅशनल बँक
स्वावलंबनाचा एकमेव मार्ग — उत्पादनवृद्धि।

# निर्हेतुक नामात भगवंत

खरोखर आज आपणाला आपले अंतरंग ओळखण्याची खरी गरज आहे. सत्कर्म असो किंवा दुष्कर्म असो, हेतूवर सर्व काही आहे. पुष्कळ पुण्यकर्मे केली आणि काही-तरी विषयाचा हेतू मनात धरला तर काय उपयोग ! काबाडकष्ट खूप केले, बायका-पोरे टाकून बाह्यांगाने कितीही केले तरी मन जोपर्यंत तिथे नाही, तोपर्यंत राम नाही भेटणार. मनाला भगवंताची तळमळ लागली तरच उपयोग. निर्हेतुकात भगवंत असतो म्हणून आपली कर्मे तशी करावीत. प्रापंचिकाएवढे कष्ट साधकाला, पारमार्थिकाला नसतात. प्रपंचाच्या काबाडकष्टांपेक्षा नियमाने जरी भगवंताकरिता केले तरी खूप फायदा पदरात पडेल. ज्या स्थितीत भगवंताने आपणांस ठेवले त्या परिस्थितीतून त्याला ओळखता येणे सहज शक्य आहे. आपण विषयाकडे दृष्टी ठेवून कर्मे करतो व भगवंत भेटत नाही म्हणून दुःखी होतो, याला काय करावे ? दैत्यदानवांनी भगवंताची तपश्चर्या केली व समर्थांनीही केली. एकाने हेतू धरून केली त्यामुळे त्याला विषयाचा, हेतूचा लाभ झाला; परंतु भगवंत अंतरला; तर समर्थांना भगवंताशिवाय दुसरा कशाचाही लाभ नको होता. त्या लाभातच त्यांनी सर्वस्व मानले. उत्कट प्रेमामुळे भगवंताचा ध्यास लागतो. भगवंताला पाहून "मला आता काही नको, तू भेटलास" अशी वृत्ती झाली पाहिजे. तरच मीपणा मरेल. भगवंताचा हात तर पुढे आहेच. आपलाच हात त्याच्यापर्यंत पोहोचत नाही. बुद्धीपेक्षा व पैशापेक्षा सदाचरणाचे वजन जास्त असते. सदाचरण असून भगवंताची निष्ठा असेल आणि आहे त्या परिस्थितीत समाधान ठेवण्याची सवय असेल तर प्रापंचिक सुख लाभते. सुख हे कोठून उत्पन्न करायचे नसून ते आपल्या वृत्तीतच असते. जसा "मी" भगवंताचा आहे तसे "सर्व जग" भगवंताचे आहे. म्हणून भगवंतावर प्रेम केले की, सर्व जगावर प्रेम बसेल. ज्याप्रमाणे भगवंताच्या प्रसादा-मध्ये एखादा कडू बदाम आला तरी तो आपण खातो, त्याप्रमाणे भगवंताने एखादे वेळी दुःख दिले तरी ते आनंदाने सोसायला पाहिजे. चिकित्सा थोडी बाजूला ठेवून आपण स्मरण करावे. मीठ म्हणून साखर खाल्ली तरी साखरेची गोडी आल्या-शिवाय राहत नाही, त्याप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत जरी नाम घेतले तरी 'तारकच' ठरेल यात काहीच शंका नाही.

# भावयुक्त अंतःकरणाने नाम घेणे

विषयात काळ घालवू लागलो की पूजेचा विसर पडतो. मला आज देवाची नड अशी वाटत नाही, पण ती कशी वाटेल याचा तरी आपण विचार करावा. भगवत् चिंतनाने, नामाने ही गरज भासू लागते. गरज इतकी भासली पाहिजे की अन्नपाणी गोड नाही लागू. जितकी आग जोराची तितका पाण्याचा मारा हवा. जितकी देहबुद्धी बनावट तितका नामाचा जोर पाहिजे. नामात प्रेम नाही म्हणून ते घेण्याचे सोडू नये. पाण्यात पडल्यावरच पुढे पोहायला येते. काशीस गेले नाही तरी काशीस जायचे असे तरी म्हणावे, त्याप्रमाणे नामात प्रेम नसले वाटत तरी नामात प्रेम आहे असे नित्य म्हणावे. नामाशिवाय दुसरे सत्य नाही, दुसरे साधन नाही, असा दृढ विश्वास झाला म्हणजे नाम घेतल्याशिवाय राहवत नाही व ते घेतल्याने, त्याच्या सहवासाने प्रेम येते. देव आहे असे संत म्हणतात. मीही देव आहे असे म्हणतो. मात्र फरक इतकाच की माझे म्हणणे अनुमानाने असते, त्यांचे प्रत्यक्ष अनुभवाचे असते. संत देहातीत असतात. त्यांचेजवळ गेल्याने देहाभिमान कमी होतो. प्रत्यक्ष गेले नाही तरी चालेल. भाव ठेवून कार्य लवकर होते तितके देहाच्या सहवासाने होत नाही. तीर्थात तीर्थपण, देवात देवपण व गुरूत गुरूपण आपण आपल्या भावनेने देतो. तीर्थास जाऊन जर आपण त्याने निष्पाप होऊ अशी भावना असली तरच मला तीर्थाचे स्नान होईल, नाहीतर मला ते पाणीच आहे. थोडक्यात म्हणजे सर्व काही भावनेत आहे. नाम हे भाव उत्पन्न करते. भावयुक्त अंतःकरणाने आपण नाम घेतले म्हणजे आपले काम शीघ्र होते. साधूंची किंवा संतांची लक्षणे आपल्या अंगात बाणवून घेण्याकरिता सांगितली आहेत. परंतु त्या लक्षणांवरून साधू कधीही ओळखता येणार नाही. साधू होऊनच त्यास ओळखले पाहिजे. साधू सर्वांभूती भगवद्भाव किंवा सर्वत्र मीच आहे, असे पाहतात. त्यामुळे सर्वांवर ते प्रेम करतात. आपण आपलेपणा काहींमध्ये पाहतो; सर्वत्र पाहत नाही, म्हणजे द्वैत प्रचितीस येते. साधूंचा मीपणा गेल्याने जगात त्यांना सर्वत्र अभेद-प्रचिती येते. सर्वत्र भगवद्भाव ते पाहतात व त्यांचे प्रेम अगदी निर्भेळ असते. साधूंच्या प्रेमाची छोटी छटा आईच्या प्रेमाला येते, पण तिचे प्रेमसुद्धा थोडे स्वार्थमूलक असते. संतांचे प्रेम यावयास नाशिवंत वस्तूंवरचे प्रेम नष्ट झाले पाहिजे.

●

# आणि हूनान जागा झाला

लेखांक आठवा

अरुण साधू

हुनानचा उठाव दडपला गेल्याने माओसारखी मते असलेल्या कम्युनिस्टांमध्ये डाव्या कोमिन्टांगविषयी एकदम अविश्वास निर्माण झालाच होता. त्याचप्रमाणे खुद्द चिनी कम्युनिस्ट पक्ष व त्याला सूचना देणारे सोव्हिएट कोमिन्टार्न यांच्यां विषयीही अविश्वास उत्पन्न होऊ लागला होता. डाव्या कोमिन्टांग पक्षातही आता चँग-कै-शेककडे ओढा असलेला एक गट निर्माण होऊ पाहत होता आणि त्यातही कम्युनिस्टविरोध वेगाने वाढत होता. अशातच सोव्हिएट कोमिन्टार्नतर्फे स्टालिनने चिनी कम्युनिस्टांना तगादा लावला होता की कोमिन्टांगशीच सहकार्य करा, त्यातच तुमचे हित आहे.

परंतु पुढे अचानक अशा काही रहस्यमय घटना घडल्या की एकाएकी डाव्या कोमिन्टांगनेही कम्युनिस्टांशी काडीमोड केली आणि कम्युनिस्टांची अनपेक्षितपणे कत्तल सुरू केली. कम्युनिस्टांना नामशेष करण्याच्या बाबतीत डाव्या आणि उजव्या कोमिन्टांग सरकारांची जणू परस्परांशी काही काळ स्पर्धाच लागली होती. सुमारे पंधरा हजार कम्युनिस्ट या कत्तलीत बळी पडले अणि पक्षाला भूमिगत व्हावे लागले.

कम्युनिस्ट आणि डावे कोमिन्टांग यांचे संबंध बिघडत चालले होतेच, पण ते एकाएकी इतक्या निकराला येतील याची कुणाला कल्पना नव्हती. संबंध दुरावायला

नेमके काय कारण झाले हे एक रहस्यच आहे.


या प्रकरणात कोमिन्टार्नचे त्या वेळचे चीनमधील एक सल्लागार श्री. मानवेन्द्रनाथ रॉय यांचा फार मोठा हात होता. डावे कोमिन्टांग सरकार आणि कम्युनिस्ट यांची फाटाफूट होऊन पुढे जी कम्युनिस्टांची सरसकट कत्तल झाली आणि कालांतराने डावे सरकार कोसळलेल्या दुर्घटनांना बरेचजण रॉय यांना जबाबदार धरतात.

**स्टालिनची तार**

त्यातल्या त्यात हे संबंध फाटण्याला कारण झालेली एक प्रमुख घटना सांगण्यात येते ती अशी. जून १९२७ च्या सुमारास रॉय यांना स्टालिनची एक तार मिळाली. त्या तारेमध्ये डाव्या कोमिन्टांगला भरीव मदत करण्यासाठी म्हणून कम्युनिस्टांनी २० हजार शेतकऱ्यांचे सशस्त्र सैन्य उभारावे, पण त्याचबरोबर हुनान प्रांतात ज्या लष्करी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांवर व कम्युनिस्टांवर अत्याचार केले होते त्यांना डाव्या कोमिन्टांग सरकारकरवीच शिक्षा करवाव्या अशा तऱ्हेच्या सूचना कम्युनिस्ट पक्षाला दिल्या होत्या.

रॉय यांनी ही तार वुहान सरकारचा पंतप्रधान वाँग चिंग वै याला दाखविली. त्याचा परराष्ट्र मंत्री युजेन चेन यानेही ती वाचली. त्याबरोबर त्याचा चेहरा पांढरा फटक पडला.

युजेन ओरडला "कम्युनिस्टांची ही दगलबाजी आहे. हे सरळ सरळ कोमिन्टांग आणि कम्युनिस्ट यांच्यामधील युद्ध आहे."



तेथूनच पुढे कम्युनिस्ट आणि डाव्या कोमिन्टांगचे संबंध पूर्णपणे फाटले. रॉय यांनी ती तार वाँगला दाखवून कम्युनिस्टांशी फितुरी केली, असा आरोप बरेचजण त्यांच्यावर ठेवतात.

"माझे चीनमधील अनुभव" (My Experiences In China) नावाचे एक पुस्तक रॉय यांनी पुढे लिहिले. त्यामध्ये त्यांनी आपल्यावरील आरोपांचा संपूर्ण इन्कार केला आहे.

रॉय यांचे म्हणणे असे की चिनी कम्युनिस्ट पक्षाने सुरुवातीपासूनच कमालीचे मऊ

धोरण स्वीकारले होते. कोमिन्टांग पक्षच क्रांतिकारक बनवून पक्षातील जमीनदारी प्रवृत्तीच्या नेत्यांना हाकून लावणे व त्याजागी आपणच पक्षाचे नेतृत्व स्वीकारणे ही कम्युनिस्ट पक्षाची कोमिन्टांगशी केलेल्या एकीमागील भूमिका होती. कोमिन्टांगलाही कम्युनिस्ट एकीची गरज होती. या एकीमुळे त्यांचा आतापर्यंत विखुरलेला पक्ष संघटित होणार होता.

परंतु एकीमागील भूमिका विसरून एकी हेच आपले साध्य, असे कम्युनिस्टांना वाटू लागले. त्यामुळे कोमिन्टांग पक्षातील अनिष्ट प्रतिगामी प्रवृत्तींना आळा घालण्याचा जोर कम्युनिस्टांत उरला नाही, असे रॉय यांचे मत आहे. चँग-कै-शेक फुटून निघाल्यानंतर डाव्या कोमिन्टांग पक्षात तरी कम्युनिस्टांनी आक्रमक भूमिका स्वीकारून प्रतिगामी प्रवृत्तींना चीत करावे, असा आग्रह रॉय धरीत होते. परंतु "कोमिन्टार्नचा प्रमुख सल्लागार बोरोदीन याच्या हाती चिनी कम्युनिस्ट पक्षाची सूत्रे होती आणि माझे कुणी ऐकण्याच्या स्थितीत नव्हता," अशी रॉय यांची बाजू आहे.

डाव्या कोमिन्टांग सरकारचा पंतप्रधान वाँग चिंग वै हा 'पुरोगामी' होता. परंतु पक्षातील उजवा गट त्याच्याविरुद्ध जोर करीत होता. मध्यंतरी वाँग रशियाचा दौरा करून आला होता. आणि त्याला भरघोस मदतीची आश्वासने मॉस्कोत देण्यात आली होती. पण प्रत्यक्ष मदत येत नव्हती. कम्युनिस्ट पक्षही काही कृती करीत नव्हता. त्यामुळे निराश होऊन वाँगने उजव्या गटाशी बोलणी सुरू केली होती

## रॉय यांचे समर्थन

अशा खचत असलेल्या परिस्थितीत रॉय यांची चीनमध्ये नेमणूक झाली. रॉय म्हणतात, "परिस्थिती वाचविण्यासाठी काहीतरी करणे भाग होते. वाँगचा विश्वास संपादन करणे भाग होते. म्हणून मी त्याला मॉस्कोहून आलेल्या तारेतील मजकूर सांगितला. ही तार खरी म्हणजे त्याच्यासाठीच होती. मॉस्कोमध्ये वाँगला जी आश्वासने देण्यात आली होती, त्या अनुषंगानेच ही तार होती.

...परंतु वाँग संशयी स्थितीत होता. खरोखरच ही तार आलेली आहे, की ही शुद्ध थाप आहे याचा त्याला संशय होता. मागचा कटु अनुभव त्याला होताच. त्याने ती तार पाहावयास मागितली. तारेतील मजकूर त्याच्यासाठीच असल्याचे व तो त्याला माहीत झाल्याने आणि त्याचा विश्वास मिळविण्याच्या हेतूनेच मी ती तार त्याला दाखविली......

वाँगने पुढे कम्युनिस्टांवर आरोप करताना या तारेचा उल्लेख केला असला तरी केवळ या तारेमुळे पुढील घटना घडल्या असे म्हणणे मूर्खपणाचे ठरेल. ही तार येण्याच्या कितीतरी दिवस अगोदरपासून वाँगचे उजवे गट चँगशी संधान बांधून होते आणि कम्युनिस्टांना त्रास देत होते. बोरोदीनच्या संधिसाधू धोरणामुळे वाँग अगोदरच उजव्या गटाकडे ओढला गेला होता......"

या पुस्तकाच्या तळटीपेत रॉय लिहितात "...... आजही या देशातील (भारतातील) अनेक लोक माझ्या या फितुरीच्या कृत्यामुळेच चीनमध्ये हजारो शेतकऱ्यांचे व कामगारांचे शिरकाण झाले, असा प्रचार करतात. हा अत्यंत मूर्ख आरोप आहे. अशा तऱ्हेचा कोणताही आरोप माझ्यावर अधिकृतपणे ठेवण्यात आला नाही. या उलट चिनी कम्युनिस्ट नेत्यांवर व त्यांचा सल्लागार बोरोदीन यांवर हाच आरोप ठेवता येईल, असा किती तरी पुरावा चीनमधून मी माझ्याबरोबर आणला. मी जेव्हा चीनमध्ये होतो, तेव्हा कुणाचेच शिरकाण झाले नाही......मी जे धोरण पुढे मांडले होते व ज्याला कम्युनिस्ट इंटरनॅशनलचाही पाठिंबा होता ते धोरण चिनी कम्युनिस्ट नेत्यांनी न स्वीकारल्यामुळेच हे शिरकाण झाले...... जे माझ्याविरुद्ध खोटा प्रचार करतात त्यांना माझे आव्हान आहे, कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या कोणत्याही अधिकृत कागदपत्रात माझ्यावर हा आरोप ठेवल्याचा उल्लेख त्यांनी दाखवावा. चीनमधून परत आल्यावर मी एक वर्षभर मॉस्कोमध्ये एक जबाबदारीचे काम पाहत होतो......दूरान्वयाने जरी मी फितुरीच्या गुन्ह्याशी थोडाही संबंधित असतो तर माझे डोके खांद्यावर खचितच शांत राहिले नसते......"

डावे कोमिन्टांग सरकार वुहान येथे अस्तित्वात होते. त्या सबंध काळात या सरकारात मायकेले बोरोदीनचे फारच मोठे प्रस्थ होते. वुहान शहरात राहणाऱ्या परदेशी लोकांनी तर बोरोदीन म्हणजेच वुहान सरकार, आणि वुहान सरकार म्हणजेच बोरोदीन असे समीकरण मांडले होते.

वुहानमध्ये बोरोदीन 'पीपल्स ट्रिब्यून' नावाच्या एका अमेरिकन जोडप्याने चालविलेल्या वर्तमानपत्राच्या कचेरीच्या वरच्या मजल्यावर राहत असे. त्याच्या खोल्यांकडे जाणाऱ्या जिन्याच्या दारांजवळ वुहान सरकारचे वेगवेगळे अधिकारी त्याच्याकडे सल्ला मागायला येत, त्यांच्या डझनभर मोटारी सतत उभ्या असत. त्याच्या वेगवेगळ्या खोल्यांमधून सतत दिवस रात्री कोमिन्टांग किंवा कम्युनिस्ट पक्षाच्या बैठकी होत असत.

वुहानमधील परदेशी लोक बोरोदीनकडे एक अतिमानवी दुष्ट शक्तीचा म्हणून बघत. "तुम्ही बोरोदीनला खरोखरच पाहिले आहे काय? कसा दिसतो तो?" अशा तऱ्हेची कुजबुज त्या स्वरातली चर्चा सतत चालत असे आणि एखादा माणूस खरोखरच बोरोदीनला भेटून आला तर लोक त्याच्याकडे संशयाने बघत. सरकारने काढलेला कोणताही हुकूम किंवा पत्रक बोरोदीनच्याच लेखणीतून उतरले असले पाहिजे असे त्या लोकांना वाटे.

बोरोदीनच्या बारीकसारीक हालचालींवर गावात गरमागरम चर्चा होई. बोरोदीन रात्री उशिरापर्यंत काम करीत बसे. त्यामुळे बराच वेळपर्यंत त्याच्या खोलीतील दिवा जळत असलेला बाहेरून दिसे. पण एखादे रात्री बोरोदीन दमून लवकर झोपला आणि त्याच्या खोलीतील दिवा विझलेला कुणा रस्त्यातल्या माणसाने रात्री

पाहिला की लगेच गावात अफवा उठत असे की, ' बोरोदीन रात्रीतून एका खाजगी विमानातून पळून गेला. ' याचाच अर्थ वुहान सरकार लवकरच कोसळणार. बोरोदीनशिवाय वुहान सरकारात दमच नाही असे लोकांना वाटत होते. आणि खुद्द वुहान सरकारचे नेतेदेखील सल्ला मागण्यासाठी एवढेच नव्हे तर क्रांतीची मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट करून घेण्यासाठी बोरोदीनच्या तोंडाकडे पाहत.

## बोरोदीनची अखेर

वुहानमध्ये येणारे परदेशी वार्ताहर प्रथम बोरोदीनची मुलाखत मागत आणि ती त्यांना चटकन मिळत असे. बोरोदीन म्हणजे एक रक्तपिपासू अतिरेकी क्रांतिकारक अशी समजूत करून आलेले वार्ताहर त्याची भेट घेतल्यानंतर इतके खूष होऊन भारावून जात की, बोरोदीनची तोंड भरून स्तुती करणारी त्यांनी पाठविलेली वार्तापत्रे त्यांच्या संपादकांना छापणे अशक्य होऊन बसे.

बोरोदीन आपले काम अगदी तळमळीने करीत असे. इतकी वर्षे तो चीनमध्ये राहिल्यामुळे त्याचे चीनवर प्रेम जडले होते. तरी सगळा चीन आपणांला समजला नाही, याची त्याला खंत होती. ॲना लुई स्ट्राँग या अमेरिकन वार्ताहर स्त्रीला बोरोदीन म्हणाला, " लोकांना वाटतं आम्हा रशियनांनी ऑक्टोबर क्रांती केली ही फार मोठी गोष्ट केली. असेलही तसं. पण चीनमध्ये होणारी क्रांती त्यापेक्षा किती तरी पटीने मोठी असेल. नव्हे ती जगातील सर्वांत मोठी घटना असेल. वेळ खूप लागेल आणि ती साध्य होईपर्यंत तिच्यासाठी माझ्यासारखे कितीतरी बोरोदीन कामी येतील. "

बोरोदीनला चीनची क्रांती पाहायला तर मिळाली नाही, एवढेच नव्हे तर क्रांतीच्या चळवळीची वाताहत उघडया डोळयांनी पाहत विफल होऊन त्याला, आपल्या रॉय आदी सहकाऱ्यांसह चीनमधील आपले चंबूगबाळे आटोपून पसार व्हावे लागले. इतकी वर्षे चीनमध्ये घालविल्यामुळे चीनविषयी त्याच्या मनात खरोखरच आस्था निर्माण झाली होती. अवाढव्य शरीराचा, शांत मनोवृत्तीचा बोरोदीन तोल सोडून आपल्या चेहऱ्यावर भावनाप्रधानतेचे चिन्हही कधी दाखवत नसे. पण २७ जुलै रोजी कॅन्टॉन रेल्वे स्टेशनवर चीनला अखेरचा रामराम ठोकताना त्याच्या डोळयांत पाणी उभे राहिले. चीनची खरी नाडी अखेरपर्यंत त्याला ओळखताच आली नव्हती.

पुढे चिनी कम्यूनिस्ट पक्षावरच वुहान सरकारने बंदी घातली. पक्षाचा अध्यक्ष चेन तु हुसियूने पक्षाचा राजीनामा दिला. पक्ष सदस्यांना भराभर भूमिगत व्हावे लागले. जे उघडयावर सापडले त्यांची सरसकट कत्तल झाली. थोडयाच दिवसांत आधीच चँग–कै–शेकच्या माणसांनी पोखरून काढलेले डाव्या कोमिन्टांगचे वुहान सरकारही कोलमडून पडले आणि जनरल चँग–कै–शेकने वुहानवर ताबा मिळविला.

लष्करी सुभेदारांचे भाग सोडले तर इतर चीनवर चँग–कै–शेकने या वेळपर्यंत ताबा मिळविला होता.

अशा रीतीने १९२७ पर्यंत चिनी कम्युनिस्ट पक्ष जवळजवळ नाहीसा झाला. अर्धेअधिक सदस्य कापले गेले होते आणि उरलेल्यांना भूमिगत होऊन वेगवेगळ्या दिशांनी फुटून तरी निघावे लागले होते किंवा कम्युनिस्ट हे नावच टाकून द्यावे लागले होते. या प्रचंड अपयशाची सारी जबाबदारी माओ–त्से–तुंग पक्षप्रमुख चेन तु ह्सियूवर ठेवतो. तो म्हणतो, " चेनच्या संधिसाधूपणामुळे पक्षाला निर्णायक नेतृत्व मिळू शकले नाही आणि त्यामुळेच पक्षाला स्वतंत्र भूमिका घेता आली नाही. "

एडगर स्नोपाशी बोलताना माओने सांगितले, " रॉय हा मूर्ख होता, बोरोदीन घोडचुका करणारा होता तर चेन हा त्याच्या नकळत द्रोही बनला होता. "

माओने ही टीका स्टालीनच्या प्रतिनिधींवर केली आहे. परंतु हे प्रतिनिधी फक्त स्टालीनच्या आज्ञाच अंमलात आणीत होते.

पुढे १९२९ मध्ये चेनने त्या वेळच्या भूमिगत कम्युनिस्ट पक्षाला आपली भूमिका विशद करणारे पत्र पाठवले. त्यामध्ये सोव्हिएट कोमिन्टार्नच्या आणि स्टालीनच्या भूमिकांवर विदारक प्रकाश पडतो. चेन लिहितो :

**प्रिय कॉम्रेडस्**

" चीनमध्ये कम्युनिस्ट पक्ष संघटित करण्याचे काम मी हाती घेतले, तेव्हापासूनच कम्युनिस्ट इंटरनॅशनलचे बेत स्टालीन, झिनोव्हिव बुखारीन यांनी वेळोवेळी घालून दिलेली संधिसाधूपणाची धोरणे मी अतिशय प्रामाणिकपणे पाळीत होतो. या धोरणामुळेच चिनी क्रांतीचा लज्जास्पद रीतीने भयानक पराभव झाला . . . माझी समजूत तेवढी स्वच्छ नव्हती आणि मते पक्की नव्हती. त्यामुळे मी स्टालीनच्या या संकुचित गटाच्या हातचे साधन मात्र बनलो. . . . . .

. . . . . . प्रिय कॉम्रेड्स ! आपल्या सध्याच्या चुका या काही विशिष्ट प्रश्नांशी संबंधित नाहीत; स्टालिनने प्रथमपासूनच जे संधिसाधूपणाचे धोरण चीनमध्ये घालून दिले तेच या चुकांमुळे उघडे पडते. चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या व मध्यवर्ती समितीच्या जबाबदार नेत्यांनी स्टालिनच्या मतांना केवळ मानच डोलविण्याचे ठरविल्याने त्यांना स्वतःला जी सद्सद्विवेकबुद्धी होती, ती ते पार गमावून बसले आहेत आणि आता ते अधिकाधिक खोल गर्तेत जाताहेत.

तेव्हा आता खऱ्या मार्क्सवादाच्या व लेनीनवादाच्या ध्वजाखाली आपणांला उभे राहावयाचे आहे व कोमिन्टार्नच्या आणि मध्यवर्ती समितीच्या संधिसाधूपणाशी झगडा द्यावयाचा आहे. "

## एकाकी माओ पुन्हा मायभूमीकडे. . .

७ ऑगस्ट १९२७ रोजी चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या उरल्या सुरल्या मध्यवर्ती

समितीची गुप्त बैठक भरली. या बैठकीला मॉस्कोचा कोणताच प्रतिनिधी हजर नव्हता. असा हा पहिलाच प्रसंग होता. बैठकीला माओ-त्से-तुंग, चांग कुओ ताओ, ली ली सान, शांघाय येथील कम्युनिस्ट शिरकाणातून निसटलेला चाऊ-एन-लाय, त्साई हो शेंग, पेंग कुंग ता आणि लो मान एवढेच सदस्य हजर राहू शकले. सभेत चेन तु हूसियूला पक्षातून काढून टाकण्याचा ठराव झाला. तसेच पक्षाचा नवा कार्यक्रम हाती घेण्यात आला. मोठ्या जमीनदारांकडून जमीन हिसकावून तिचे सर्व शेतकऱ्यांत समान वाटप करण्याचा हा कार्यक्रम होता. सभा होताच सुरक्षिततेसाठी सारे सदस्य भराभर विखुरले.

एका नव्या तडफेने व नव्या स्फूर्तीने माओ-त्से-तुंगही लपत छपत हुनानमध्ये परतला. भूमिगत राहण्यासाठी त्याला आपली जन्मभूमीच योग्य वाटत होती.

या वेळी खरे म्हणजे अधिकृत कम्युनिस्ट पक्ष असा उरला नव्हताच. मध्यवर्ती समितीची जी गुप्त बैठक भरली होती, तिला प्रमुख सभासद हजर नव्हते त्यामुळ त्या बैठकीतील ठरावांना अधिकृतपणा नव्हता; कोमिन्टार्नची मान्यता नव्हती.

चँग-कै-शेकच्या कोमिन्टांगचे अत्याचार या वेळी शिगेला पोचले होते. कम्युनिस्ट सापडला की, तो जिवंत सुटत नसे. कम्युनिस्टांचा नातेवाईक, मित्रदेखील कुणी सापडला तरी त्याला ठार मारण्यात येई.


चिनी भूमीवरून कम्युनिस्टांना पूर्णपणे नामशेष करण्याचा चंगच जनरल चँगने बांधला होता.

परंतु चिनी जनतेचा इतिहासच असा आहे की, जो जो बंडखोरांवर अत्याचार करून त्यांना दडपून टाकावे तो तो ते अधिक ईर्ष्येने उफाळून येतात. आणि सूडाच्या योजना आखू लागतात. अधिक जोषाने आणि श्रद्धेने लढे देतात. कोमिन्टांगने कम्युनिस्टांचे संपूर्ण शिरकाण करण्याचा प्रयत्न केला पण त्यामुळे त्यांच्यांतील क्रांतीची ज्योत विझली नाही. उलट ती अधिक प्रखर होऊ लागली. सोव्हिएट कोमिन्टार्नने त्यांना दाबून ठेवण्याचा प्रयत्न केला, पण त्याचीही विशेष पर्वा त्यांनी केली नाही. उलटून लढा देण्याचा त्यांचा निश्चय अधिक व प्रबळ झाला.

त्यांचा पूर्ण पराभव झाला होता. राजकीय दृष्ट्या ते अस्तित्वात नव्हते, कोमिन्टांगने त्यांच्यावर बंदी घातली होती. ते निःशस्त्र होते. अंधःकारमय भविष्याच्या कडेलादेखील कोठे प्रकाशाची झालर दिसत नव्हती.

अशा परिस्थितीतही चिनी कम्युनिस्ट तग धरून राहिले. एवढेच नव्हे तर त्यानंतर अवघ्या वीस वर्षांमध्ये त्यांनी आपल्या प्रचंड सामर्थ्याच्या जोरावर अवघा चीन व्यापून टाकला आणि सत्ता काबीज केली.

अर्धपोटी असलेल्या, अनवाणी पायांनी आपल्या मायभूमीकडे निघालेल्या आणि मानेवरच्या टांगत्या कोमिन्टांग तलवारीची सतत भीती असलेल्या माओ-त्से-तुंगला या वेळी आपल्या या भविष्याची कल्पना स्वप्नातही येणे शक्य नव्हते. [अपूर्ण]



# अजून ताजे असलेले बहुमोल विचार

रसेलच्या या पुस्तकाचा अनुवाद मराठीमध्ये प्रसिद्ध करून प्रकाशकांनी चांगली कामगिरी केली आहे. निवेदनात ते म्हणतात, " ... हे पुस्तक १९१७ साली लिहिलेले आहे. काळ लोटल्याने विचार जुना, शिळा ठरत नाही या म्हणण्याचे प्रत्यंतर या पुस्तकावरून येते. किंवा असे म्हणता येईल, की या पुस्तकास मांडलेल्या विषयांत मानवजात अद्यापिही शहाणी न झाल्याने जवळजवळ पन्नास वर्षांनंतरही रसेल यांचा विचार तेवढाच प्रयोजक व महत्त्वाचा राहिलेला आहे. "

या विधानातील वस्तुस्थिती खरी आहे, पण त्याचे कारण संपूर्ण खरे नाही. ' काळ लोटल्याने विचार जुना, शिळा ठरत नाही ' असे नाही. जे तात्कालिक परिस्थितीविषयीचे प्रासंगिक विचार असतात, ते कालमानानुसार जरूर शिळे होतात; परंतु कोणत्याही समस्येच्या निमित्ताने ' मूलभूत तत्त्वाविषयी 'चे जे विचार व्यक्त केले जातात, ते पन्नास नाही पाचशे वर्षे झाली तरी अबाधित राहतात. प्रस्तुत पुस्तकातील विचार हे बरेचसे अशा प्रकारचे आहेत. बर्ट्रांड रसेल यांची विचारपद्धतीच या प्रकारची आहे. एकदम मुळाला हात घालणारी आहे. परखड बुद्धिवादाने आत्मपरीक्षण करून रोखठोक सिद्धांत ते मांडतात. त्या सिद्धांतांचा प्रचार तर नाहीच, पण आग्रही पुरस्कार करणारा अभिनिवेशही त्यांच्या प्रतिपादनात नाही. त्यांचे सर्वांगीण परीक्षण करून सुस्पष्ट समालोचन मात्र ते अगदी निर्भिडपणे करतात. अभिनिवेश असलाच तर तो तर्काधिष्ठित आहे. आग्रह असलाच तर तो समजून घेण्यासाठी आहे; जबरदस्तीने प्रमाण मानण्यासंबंधी नाही.

" आजचे माणसामाणसांतील राजकीय व्यवहार सर्वस्वी चुकीच्या राजकीय ध्येयांवर आधारलेले असून, दुःख, दुराचार आणि विनाश यांपासून आपली सुटका काही वेगळ्याच ध्येयांचा अंगीकार केल्यानेच होऊ शकेल, हे आपल्याला दिसत आहे. " या घोषणेने रसेलनी आपल्या विवेचनाला सुरुवात केली आहे. प्रत्येक व्यक्तीला जीवनातील अधिकाधिक चांगल्या गोष्टींचा अधिकाधिक लाभ कसा

घेता येईल, या दिशेने त्यांचा विचारप्रवाह चालू होतो. राजकारण आणि समाजकारण यांची व्यक्तीच्या केंद्राभोवती होणारी विकासगती ते व्यक्तीला केंद्रस्थानी मानूनच विचारात घेतात. राजकीय ध्येये, भांडवलशाही अर्थव्यवस्था, साम्यवादातील खाचखळगे, व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक नियंत्रण, राष्ट्रीय सार्वभौमत्व आणि आंतरराष्ट्रीय भूमिका या समस्या समाजरूप विराट मानवाच्या विकासामध्ये नित्य उद्‌भवणाऱ्या आहेत. तथापि, त्यांचा विचार विशाल भूमिकेवरून करताना रसेलनी समाजाचा घटक असलेल्या मर्यादित व्यक्तित्वाला नजरेआड होऊ दिलेले नाही. केवळ पारंपरिक सिद्धांतांचे खंडन वा मंडन हे त्यांच्या चर्चेचे स्वरूप नाही. अवतरणांच्या भरीला आणि प्रत्युत्तरांच्या जिद्दीला ते पडत नाहीत. समाज आणि त्यातील व्यक्ती यांच्या परस्परसंबंधांविषयी आणि त्यांच्या परस्परपरिणामांविषयी ते स्वच्छ पूर्वग्रहरहित वृत्तीने विचार करताना दिसतात. हा विचार मुळापासून असतो, म्हणून तो महत्त्वाचा आहे. त्याला उत्तर देऊ पाहणाऱ्याला त्यातले एखादेच तत्त्व नाकबूल करून चालणार नाही. उगमापासूनची सगळी साखळीच व्यवस्थित पाहावी लागेल.

या साऱ्या विवेचनाचे अनेकविध पैलू आणि भिन्न संदर्भ असले तरी त्यांच्या मुळाशी दोन मूलभूत प्रेरणांचा विचार रसेलनी काटेकोरपणे केलेला आहे. एका बाजूला, सर्वांना सारखेच उपभोगता न येणारे खाजगी धन स्वत:साठी जास्तीतजास्त मिळविण्याचे व राखून ठेवण्याचे उद्दिष्ट ठेवणाऱ्या स्वामित्वाच्या प्रेरणा असतात तर दुसरीकडे, मालकीचा वा खाजगी उपभोगाचा प्रश्न उद्‌भवत नाही असले धन मिळविण्याचे किंवा सर्वांच्या आस्वादासाठी असले धन उपलब्ध करण्याचे ध्येय बाळगणाऱ्या सर्जनशील विधायक प्रेरणा असतात. " ज्या जीवनात सर्जनशील प्रेरणांचा कार्यभाग अधिकाधिक आणि स्वामित्व प्रेरणांचा कमीतकमी, ते जीवन श्रेष्ठ होय," अशी रसेल यांची व्याख्या आहे; किंबहुना या पुस्तकातील विचारांचा हा टेकू (Fulcrum) आहे. सर्जनशील प्रेरणांच्या अभ्युदयाचे हे सूत्र सर्व विवेचनांतून ओतप्रोत गुंफले गेले आहे. सुरक्षितता आणि स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या असल्या तरी आदर्श राजकीय संस्थांच्या दृष्टीने त्या केवळ अकरणात्मक शर्ती आहेत, प्राथमिक अटी आहेत. तिच्या जोडीला सर्जनशीलता असेल तर जीवनांत साहस आणि उत्साह चिरंतन राहतील आणि प्रगती होईल. ( ' राजकीय ध्येये ' ). फार काय, अर्थव्यवस्थेच्या डोळ्यांसमोर असावी लागणारी ध्येये सांगतानाही रसेलनी वस्तूंचे अधिकात अधिक उत्पादन आणि तंत्रविद्येतील प्रगतीला जास्तीत जास्त वाव, संपत्तीची न्याय्य विभागणी, आणि प्रत्येकास अन्न–वस्त्र–निवारा यांची शाश्वती यांच्या जोडीनेच चौथे प्रमुख ध्येय सांगितले आहे : सर्जनशील प्रेरणांची मुक्तता आणि स्वामित्व प्रेरणांचे दमन. " या चार उद्दिष्टांपैकी शेवटचे उद्दिष्ट सर्वांत महत्त्वाचे आहे, "

असे ते म्हणतात. आणि पूर्वीची उद्दिष्टे याला साधनभूत ठरवितात. आणि त्याच दृष्टीने, उत्पातकारी क्रांती आज आवश्यक नसली तरी आर्थिक स्वातंत्र्य आणि उद्योगधंद्यांची स्वायत्तता या ध्येयाकडे वाटचाल करणारे क्रांतिकारक विचार आणि त्या विचारांवर जोपासलेली विवेकाधिष्ठित विधायक आशा यांची आवश्यकता प्रतिपादन करतात. ('मांडवलशाही अर्थव्यवस्था'.) 'व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक नियंत्रण' यांच्यांतील नाते ठरवितानाही हीच कसोटी. व्यक्तीच्या स्वामित्वप्रेरणेवर अवश्य बंधन हवे. पण सर्जनशील प्रेरणा आणि तदनुषंगिक कृती मात्र बंधनातीत असाव्या.

रसेल यांच्या विचारसरणीचे वैशिष्ट्य हे की ते नुसता तात्त्विक विचार करून थांबत नाहीत. अधांतरी चालत नाहीत. आपले विचार कार्यवाहीत आणण्यासाठी, प्रत्यक्षात उतरविण्यासाठी काही निश्चित मार्गांचा ते निर्देश करतात. हे मार्ग घडवलेले नाहीत. अस्पष्ट आहेत, अंधुक आहेत, गाठायला कठिण आहेत, पण त्यांच्या योगेच इष्ट ध्येय मिळेल असा विश्वास रसेल यांच्या मनात आहे. सर्जनशील कृतीसाठी कल्पनाशक्ती आणि स्वयंप्रज्ञा यांची गरज असल्याने प्रत्येक संघटनेचा कारभार लोकशाही तत्त्वांवर चालावा, आर्थिक क्षेत्रात खरे स्वातंत्र्य व लोकशाही निर्माण होण्यासाठी आर्थिक संघटनांत प्रत्यक्ष काम करणाऱ्यांच्या हातात त्या संघटनांचे चालकत्व असावे, सत्तेचे बऱ्याच मोठ्या अंशी विकेंद्रीकरण व्हावे, उत्पादनाची कमाल मर्यादा गाठावी, मोबदल्यातील फरक वाजवीपेक्षा जास्त राहू नये, यांसारखे पर्याय सुचविताना ते वैचारिक आणि व्यावहारिक पातळीची सांगड घालताना दिसतात.

रसेल यांचे विचार बहुमोल आहेत. ते अंमलात आणण्यासाठी त्यांनी दाखविलेले मार्गही परिणामकारक आहेत. तथापि आजच्या मानवाची निष्ठामूल्ये आणि विचारपद्धती लक्षात घेता हे मार्ग अजून कितीतरी वर्षे (की शतके?) अस्पृष्टच राहणार असे वाटू लागते. सर्जनशील प्रेरणा कितीही महत्त्वाची आणि कल्याणकारी असली, तरी आज स्वामित्वप्रेरणेचेच स्वामित्व जगावर आहे; आणि रसेल यांच्या विचारांना पन्नास वर्षे झाली तरी त्याची पकड कमी न होता जास्तजास्त दृढ होत चालली आहे.

कदाचित म्हणूनच रसेल यांच्या या विचारांची आज जरुरी असेल, कदाचित त्या विचारांचा ताजेपणा यातच असेल, कदाचित रसेल यांनाही याची जाणीव असेल. कसेही असले तरी विचारांचे तात्त्विक मूल्य कमी होत नाही हे खरे. त्याच्या प्रायोगिक व्यवहार्यतेकडे फलवादी दृष्टिकोनातून न पाहता आशावादी तात्त्विक भूमिकेतून हे विचार स्पष्टपणे मांडणे, हेही महत्त्वाचे आहे. कुणीतरी ते करायलाच हवे असेल, तर रसेल यांनी ते अत्यंत प्रभावीपणे केले आहे.

या छोट्या पुस्तकातली रसेल यांची मोठी भूमिका ही अशी आहे. परखड

भूमिका आहे. तौलनिक विचारवादी भूमिका आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे भयानक तोटे, त्यांतून निर्माण होणाऱ्या विविध अपप्रवृत्ती, भौतिक संपत्तीची बेदरकार उधळपट्टी आणि त्यामुळे व्यक्तिजीवनावर होणारे शारीरिक आणि मानसिक दुष्परिणाम यांचे विदारक चित्रण करून प्रचलित अर्थव्यवस्थेचे वैफल्य ते स्पष्ट करतात. आणि त्याचबरोबर लोकशाहीची गळचेपी करणाऱ्या साम्यवादाने केवळ खाजगी मालमत्तेचे समाजीकरण करून त्यावर उपाय सापडणार नाही, हेही तर्कशुद्ध रीतीने विशद करतात.

चिकित्सक विचार करण्याच्या बुद्धिवादी पद्धतीमुळे जाताजाता रसेल अनेक मूलगामी व्याख्या बनवितात. "राज्यसत्तेकडून व्यक्तिस्वातंत्र्यात होणारा हस्तक्षेप कमीतकमी करण्याचे लोकशाही हे उत्तम् तंत्र आहे."... "ज्या ज्या बाबतीत आचारभिन्नतेमुळे अराजक माजण्याचा धोका नाही त्या सर्व बाबींमध्ये वेगवेगळ्या गटांना आचारस्वातंत्र्य दिले पाहिजे." यांसारखी वाक्ये रसेल यांच्या विचारांचे आखीव, बांधेसूद स्वरूप तर दाखवतातच, पण शिवाय त्या नकळत शास्त्रीय बनून जातात. "एखाद्या कलाकाराला किंवा विचारवंताला तुम्ही ठार मारू शकाल; परंतु त्याची कला वा त्याचे विचार तुम्ही हिरावून घेऊ शकणार नाही," अशी काही वाक्ये तर मनाचा ठाव घेतात.

विशेषत:, तत्कालीन इंग्लंडचे जे वर्णन रसेलनी केले आहे, ते आजच्या भारताला कित्येक ठिकाणी तंतोतंत लागू पडते. "चेहऱ्यावर खोटे हसू खेळवीत, इकडेतिकडे कोणाला तरी शोधणारी नजर ठेवून पार्लमेंटच्या सभासदांना सभागृहातून बाहेर पडताना...ज्याने पाहिले आहे, आपल्या मतदारसंघातील कोणी मासा नजरेला गावला, की लगबगीने पुढे होऊन, "अरे वा ! तुम्ही केव्हा आलात ?" म्हणत, त्याच्या खांद्याभोवती हात टाकून जातानाचे दृश्य ज्याने पाहिले आहे, आणि ते पाहत असताना ते हसू आणि तो खांद्याभोवती टाकलेला हात याच कलेच्या जोरावर माणसे आमदार-खासदार होतात याचे भान ज्याला झाले आहे, त्याला आजची आपली लोकशाही दोषपूर्ण आहे असे वाटल्याखेरीज राहणार नाही. सर्वसाधारण मतदार यामागचा दांभिकपणा ओळखू शकत नाही हे एक कटू सत्य आहे."— एवढे एकच वर्णन नमुन्यादाखल पाहिले तरी पुरे.

रसेल यांच्या इतर लेखनाचा नि वक्तव्यांचा विचार न करता, केवळ या पुस्तकापुरतेच बोलावयाचे झाल्यास असे म्हणण्यास हरकत नाही की आदर्श राजकीय आणि सामाजिक ध्येयांसाठी मांडलेले हे प्रभावी विचारसूक्त आहे. हे आचरणात आणण्याइतकी मानवजात जेव्हा सर्जनशील बनेल तो सुदिन.

[ "राजकीय ध्येये" — बर्ट्रांड रसेल— भाषांतर : सुमन दाभोळकर— समाज प्रबोधन संस्था— एक रुपया साठ पैसे— पृष्ठे ९९ ]

## □ ध्येयवादी स्वप्नाचा एक भाग

कै. साने गुरुजींचे 'आंतर-भारती'चे रम्य स्वप्न पुरे करण्यासंबंधी आंतरभारती ट्रस्टने या मासिकाच्या रूपाने पुढचे पाऊल टाकले आहे. "'आंतर-भारती' भारतीयोंका एक दूसरेसे स्नेहसिक्त परिचय करायेगी। भिन्न भिन्न प्रांतोंके महापुरुषोंके चित्र वहाँ होंगे। नयी पीढ़ियाँ नवीन भारतके इन महान निर्माताओंसे परिचित होंगी।" हे संस्थेचे आणि पर्यायाने मासिकाचे ध्येय आहे. किंबहुना या ध्येयाचे महत्त्वपूर्ण साधन म्हणूनच मासिकाचा हा खटाटोप आहे.

ध्येय फार मोठे आहे. रम्य आहे. आदर्श आहे. आपापल्या प्रांतीय, भाषिक, वांशिक परंपरेविषयी अभिमान वाटणे साहजिक आहे. मात्र तो अभिमान एकराष्ट्रीयत्वाच्या विशाल भावनेला अंगरूप असला पाहिजे. कितीही तीव्र मतभेद असले तरी ते आपसांतले वाटले पाहिजेत. सांस्कृतिक, वैचारिक, भावनिक आणि वाङ्मयीन दृष्टींनी परस्परांचे परस्परांत संमीलन झाले पाहिजे. काठ वितळून गेले पाहिजेत.

मासिकाचा पहिला अंक तरी या ध्येयाकडे नजर ठेवूनच निर्माण केलेला आहे. आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या लेखांमधून 'आंतरभारती'च्या कार्याचे महत्त्व, दिशा आणि स्वरूप स्पष्ट होते. लेखाची वैचारिक बैठक समतोलच आहे. मात्र त्यातील एका विधानाविषयी मतभेद व्यक्त केला पाहिजे. आचार्य लिहितात, "परंतु यह कहना बिलकुल सही नहीं है कि हिन्दू संप्रदायवादी नहीं हैं। भारत के हिन्दुओं को नेपालपर गर्व है।...यह संयोग की बात है कि भारत से बाहर नेपाल के अतिरिक्त और कोई हिंदू राज्य नहीं है। यदि होता तो उसके लिये भी हिंदुओं के मनमें वैसी ही भावना होती जैसी मुस्लिम राज्यों के लिये यहाँ के मुसलमानोंके मनमें है।" हे म्हणणे बरेच धाष्टर्याचे आहे. अविचाराचेही आहे. मुळात अस्तित्वात नसलेल्या राष्ट्राविषयी भारतीय हिंदूंना वाटणाऱ्या भावनेची आक्रमक देशांविषयीच्या राष्ट्रद्रोही भावनेशी तुलना करण्यात कसलाही उदारपणा नाही. (आजकाल ही फॅशनच पडली आहे काय ? अगदी अकारण आत्मनिंदा केल्याशिवाय उदारपणा पुरा होतच नाही काय ?)

श्री. र. वि. पंडित यांच्या पाच कोंकणी कवितांचा श्रीपाद जोशी यांनी केलेला अनुवाद हे 'आंतरभारती'च्या हेतुपूर्ततेचे उष्कृष्ट वैशिष्टय ठरावे. दि. बा. मोकाशींची विज्ञानकथा आणि 'जन हे सामान्य मानव महान' ही बाबा आमटे व रमेश गुप्ता यांची महान आशयाची आवेशपूर्ण कविता यांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे.

याच ध्येयवादी वृत्तीने मासिकाची परंपरा चालू राहील अशी आशा निर्माण करण्याचे सामर्थ्य ह्या पहिल्या अंकात निश्चितच आहे.

**—निशिकांत मिरजकर**

['आंतर-भारती' – आंतर-मारती ट्रस्ट–वर्ष १, अंक १–१ रुपया] ●

[मी बागेच्या टोकाला उभा राहिलो - तोच आवाज आला, "मी पिअरी आहे"]




: लेखक :
एल्. सी. मोझिस
अनुवादक :
अशोक खरे
लेखांक :
दुसरा

आम्ही दोघेजण बागेतून वकिलातीकडे संथपणे चालत होतो. त्यांची दृष्टी फारच तीक्ष्ण होती; कारण इतक्या किर्र अंधारात वाटेवर लहान लहान पायऱ्या असूनही तो एखाद्या सराइतासारखा चालत होता. आमच्यांतील मौन, भीषणता वाढवत होते.

आम्ही अंधाऱ्या खोलीतून हॉलमध्ये आलो. दिवे लावले. पिअरी तर उत्साही व ठाम दिसत होता. निराश होतो मीच.

" पैसे आणलेस काय ?" त्याने मुद्यास हात घातला.

मी मान हलवली.

त्याने ओव्हरकोटच्या खिशांतून दोन फिल्म्सचे रोल काढले. मी फिल्म्स घेण्यास धावलो. ताबडतोब त्याने त्या बाजूस घेतल्या.

" अं हं अगोदर पैसे, " व्यापाऱ्यासारखा तो म्हणाला.

मी तिजोरीकडे गेलो. माझी पाठ त्याच्याकडे वळली होती. माझी अस्वस्थता वाढली. मला ठार मारणे त्याला सहज शक्य होते. सुदैव माझे तसे काही झाले नाही. मी नोटांचे पुडके हातांत घेतले. तिजोरीचे दार धाडकन् लावले. इतक्या जोराने की, माझा अंगठा जवळजवळ फटीत सापडला.

मी वळलो. माझे हात थरथरत होते. तो पूर्वीच्याच जागी उभा होता. नोटांचे पुडके पाहून आधाशीपणाचे भाव त्याच्या चेहऱ्यावर तरंगले.

हा क्षण अत्यंत महत्त्वाचा होता. अगोदर फिल्म्सच्या सत्यतेबाबत खात्री करून घेणे व मगच पैसे देणे या माझ्या निर्णयाबाबत मला खंबीर राहणे आवश्यक होते मी पुडके सोडतच टेबलापाशी गेलो. संथपणे पैसे मोजण्यास मी सुरुवात केली. तो जवळ आला व तोही मनात मोजणी करू लागला.

"......पंधरा हजार......सोळा.....सतरा............वीस हजार " मी पैसे बांधून ठेवले.

" झाली खात्री. आता दे बघू फिल्म्स." त्याने फिल्म्स दिल्या व तो पैसे घेण्यास पुढे धावला.

" थांब थांब. एवढा उतावळा नको होऊस. फिल्म्स कशा आहेत हे तर पाहू दे. मी फिल्म्स ' डेव्हलप ' करीपर्यंत तुला थांबावे लागेल. " मी म्हणालो.

" अगदी संशयी बुवा. खरा म्हणजे तूच माझ्यावर विश्वास ठेवला पाहिजेस. तरीही काही हरकत नाही. थांबतो मी इथे " तो म्हणाला.

मला हायसे वाटले. मी पैसे पुनश्च तिजोरीत ठेवले. त्याला सिगरेट्स दिल्या. " तू येईपर्यंत त्या पुरतील मला. " तो शांतपणे बोलला व सिगरेट्‌ची वलये काढण्यात धुंद होऊन गेला. मी दाराला कडी लावली व अंधाऱ्या खोलीत फ़ोटोग्राफर बसला होता तिकडे गेलो.

फोटोग्राफरने ताबडतोब डेव्हलपिंगच्या कामास सुरुवात केली. मी सर्व कृती त्याच्याकडून समजावून घेतली. अपेक्षेपेक्षा फारच वेळ लागत होता. वेळ जाण्यासाठी मी सिगरेट्स ओढू लागलो. पुन्हा थोडा वेळ झाला. आणि मग एक रोल मी दिव्यावर धरला. फिल्म्स तांत्रिकदृष्टया उत्कृष्ट होत्या. त्या फिल्म्स किती मौल्यवान् होत्या ते आता मला समजले. फिल्म्सवर अगदी परवापरवाची तारीख होती. मी फोटोग्राफरला पंधरा मिनिटांत येतो, असे सांगितले व पुन्हा हॉलमध्ये आलो.

सिसेरो अजूनही त्याच स्थितीत बसला होता. रक्षापात्र मात्र पूर्णपणे भरले होते. मी तिजोरी उघडून पैसे काढले व त्याला दिले. ताबडतोब पैशांचे पुडके ओव्हरकोटच्या खिशात कोंबून डोळ्यांवर हॅट ओढत व कॉलर ताठ करत तो म्हणाला,

"याच वेळेला उद्या" आणि तो अंधारात लुप्त झाला.

गेल्या दोन दिवसांतील घटनांचा विचार करता त्याचा अनुभव घेणारा मी नसून एक वेगळी व्यक्ती आहे असे वाटू लागते. विचारांच्या जंजाळात मला मीच विसरलो.

### जर्मनीचे दारुण भवितव्य पाहिले

'टिक् टिक्'......बऱ्याच वेळानंतर त्या आवाजाने मी जागा झालो, तेव्हा समजले की मी इथेच झोपलो होतो. दार उघडले. दारात मिस् स्नुर्शेन उभी होती. काहीच न बोलता कामाला लागली.

मी खोलीत आलो. अजूनही फिल्म्स वाळत होत्या. जरा वेळाने फोटोग्राफर आला. या अशा वेळी माझ्या परावलंबित्वाबद्दल मलाच मी लाख शिव्या दिल्या. अर्थात् फोटोग्राफरला त्या फिल्म्स कसल्या हे माहीत असण्याची शक्यता कमी होती. फोटोग्राफीचे सर्व तंत्र मी समजावून घेतले व त्याला बाहेर जाण्यास सांगितले.

फिल्म्सच्या दोन रोलमध्ये बावन्न निगेटिव्हज होत्या. मी यंत्राप्रमाणे काम करीत होतो. घड्याळाचे काटे पुढे सरकत होते. रात्रभर काम करून दुसरे दिवशी पहाटे ४ वाजता ते बावन्न फोटो पूर्ण डेव्हलप् झाले. ते घेऊन मी ऑफिसात आलो व दार घट्ट लावून घेतले.

मी फिल्म्सचे निरीक्षण करू लागलो. आणि काय आश्चर्य त्या सागरकेसरीची राजकीय व सैनिकी गुपिते माझ्या पुढयात पडली होती. संशयाला जराही जागा नव्हती. एखाद्या गुप्त हेराने जंगजंग पछाडूनही अशी गुपिते न मिळाल्याने ती मिळाल्याचे स्वप्नात पाहावे व त्यातच समाधान मानावे अशा तोडीची ही फिल्म होती. या अमूल्य देणगीच्या बदल्यात आम्ही दिलेले पैसे फारच कमी होते.

या 'डेव्हलप्' झालेल्या फोटोंपैकी एकही फिल्म पंधरा दिवसांहून जुनी नव्हती. आणि कित्येक फिल्म्स कालपरवाच्या दिसत होत्या. त्या फिल्म्स म्हणजे लंडनमधील परराष्ट्रमंत्रालय व अंकारातील ब्रिटिश वकिलात, तसेच लंडन, वॉशिंग्टन,

मॉक्को यांच्यामधील राजकीय व सैनिकी गुपितांबावतचा पत्रव्यवहार होता. बर्लिनमधील तज्ज्ञांना ब्रिटिश परराष्ट्रखात्याच्या या सांकेतिक लिपीतील संदेशाचा अर्थ लावण्यासाठी एक तपशील फार महत्त्वाचा वाटला. तो तपशील म्हणजे संदेश कोणत्या वेळेला पाठवला त्याची नोंद.

या फिल्म्समुळे नाझी जर्मनीच्या संपूर्ण विध्वंसाची लक्षणे अगदी स्पष्ट दिसू लागली होती. या फिल्म्स म्हणजे नुसतीच वस्तुस्थिती व आकड्यांची करामत यांचे दर्शन नव्हते तर आमच्यापुढील दारुण भवितव्यतेचा तो चित्रपट होता. दोस्तांची ताकद इतकी प्रचंड होती की केवळ दैवी चमत्कार घडता तरच आम्ही युद्ध जिंकणे शक्य आहे.

बर्लिनची आता खात्री पटली होती की या फिल्म्स खोट्या नाहीत. परंतु आमचे नेते या फिल्म्सचे भांडवल करून एकमेकांच्या उरावर बसत होते. ब्रिटिशांची गुपिते चोरल्याच्या विजयावरच समाधानी होते. लष्करी डावपेचांच्या दृष्टीने या माहितीचा कधीच उपयोग केला गेला नाही. आमचे परिश्रम व असह्य मानसिक ताण अशा रीतीने मातीमोल ठरले म्हणून फार वाईट वाटते. अरेरे, दैवा किती क्रूर तू !

'टिक् टिक् '...... दारावर आवाज होतो. मी खडबडून जागा झालो, तेव्हा दुसरा दिवस उजाडला होता. स्नुर्शेन दारात उभी होती. माझ्याकडे आश्चर्याने पाहत ती कामास लागली.

काही वेळानंतर मी पॅपेनच्या ऑफिसात गेलो. अजूनही माझा थकवा गेला नव्हता. पॅपेनची सेक्रेटरी कामाच्या घाईत दिसली. हाताला काहीतरी चाळा हवा म्हणून मी फोटो मोजून पाहू लागलो. अर्थात् त्यामुळे पॅपेनची सेक्रेटरी मिसेस रोझ हिची जिज्ञासा चाळवली गेली.

"काय भानगड आहे साहेब ? त्या पुडक्यात आहे तरी काय ?" तिने विचारले.

"तुझ्यासारख्यांना त्याच्यात काही मजा येणार नाही. आहेत काही नग्न चित्रे. ओहो काय सौंदर्य आहे बाकी. अगदी तिलोत्तमाच जणू." मी थाप मारली.

"अरे, किती चावट तू. काहीतरी वाटलं पाहिजे तुला." तिने फणकाऱ्यात सांगितले.

अर्थात् तिच्या बडबडीकडे मी दुर्लक्ष केले व फिल्म्समधील फोटो मोजू लागलो. "...... अठ्ठेचाळीस ...... एकोणपन्नास ......पन्नास ...... एकावन्न ......" आ एक फोटो हरवला. गेलातरी कुठे ? ते सर्व फोटो खिशात कोंबून मी खाली पळत सुटलो. प्रवेशद्वाराजवळ आत येणाऱ्या पॅपेनशी माझी टक्कर झाली. पण मी तसाच पुढे सटकलो व मागे पाहिले. वकीलसाहेब चमत्कारिक नजरेने मजकडे पाहत होते. मी बागेत आलो. इंचन् इंचं तपासला. पण सर्वत्र निराशा होती. आता मात्र मी घामाघूम झालो. ऑफिसात पळतच आलो. टेबलावर पाहिले, खाली पाहिले, इकडे तिकडे सर्वत्र पाहिले. पण छे. मला आता रिबेन्ट्रॉप, फ्यूरर आदींचे संतप्त चेहरे दिसू लागले.

कॉन्सेन्ट्रेशन कँप दिसू लागला. देहदंडाचा स्तंभ दिसू लागला. देवा असा निर्दय होऊ नकोस. सत्य नावाची वस्तू जगात असेल तर माझी सुटका होईल.

हताशपणे मी वकिलातीकडे निघालो. आणि काय आश्चर्य हरवलेले गवसले. तो फोटो उपड्या स्थितीत पडला होता. काही पावलावर टर्कीश द्वाररक्षक उभा होता. माझ्या सुदैवाने तो फोटो त्याला दिसला नव्हता. मी तो फोटो उचलला व याच्याशी माझा काय संबंध अशा थाटांत पाहू लागलो. हळूच खिशात कोंबला व पुन्हा ऑफिसात आलो.

"स्नुर्शेन पाणी दे बरं" मी जडपणे बोललो. छाती धडधडत होती पंखा सोडला. जरा विश्रांती घेतली व ताबडतोब वकिलातीत आलो.

"मोझिस काय चावटपणा आहे हा. मघाशी अगदी रेसकोर्समधील घोड्यासारखा धावत होतास. मला धक्का दिलास आणि तसाच पुढं गेलास अं" पपेनसाहेबांनी तक्रार केली.

"सॉरी सर. पण एकाएकी मला काहीतरी हरवल्याचा भास झाला."

"काय, सिसेरो काय म्हणतोय? अं? २०,००० पौंड दिलेस ना. मिसेस् रोझ म्हणत होती की त्याबद्दल तुला सुरेखशी नग्न चित्रे मिळाली. अं?"

वकीलसाहेब चांगलेच खुशीत होते.

"ते फोटो इतके महत्त्वपूर्ण आहेत की त्याबद्दल दिलेले २०,००० पौंड कमीच ठरतील." असे म्हणत ते फोटो मी त्यांच्या हातात दिले.

"विलक्षण! भयानक!!" ते पुटपुटले. ते जसे जसे फोटो पाहत होते तशी तशी त्यांच्या मनात विलक्षण खळबळ माजली होती. इकडे मी मात्र डुलक्या घेत होतो.

"अरे बापरे! हा फोटो पाहिलास काय?" पॅपेनच्या धारदार आवाजाने मी जागा झालो. टर्कीत रॉयल एअर फोर्सचे घुसलखोर घुसत होते त्याचा तपशील एका फिल्म्‌मध्ये दिसत होता. घुसलखोरांची संख्या आम्हांला वाटले त्याहून कितीतरी जास्त होती. "बर्लिनला हे नक्कीच पचणार नाही" ते म्हणाले.

वकीलसाहेब पुढील फोटो पाहू लागले. सोविएट रशियाला दिलेल्या प्रचंड युद्धसामर्थ्याचा त्यात बारीकसारीक तपशील होता. नक्कीच फ्यूररचा भडका उडेल त्यामुळे.

पॅपेन वाचतच होते. मध्येच स्वतःशी पुटपुटत "अशक्य! अविश्वासार्ह!!"

पॅपेन खुर्चीला टेकले व विचारात मग्न झाले. थोड्या वेळानंतर भीतभीतच मी त्यांना त्यांचे मत विचारले.

"या फिल्म्स जर खऱ्या असतील – आणि माझ्या मते संशयाला मुळीच जागा नाही – तर याची किंमत अमूल्यच ठरेल. तरीही जागरूकता हवी. एखादा धूर्त डाव असायचा. ब्रिटिशांना बावळट समजणे ही मोठी घोडचूक ठरेल. तो नोकर पुढील

फिल्म देईल त्यावर सर्व गोष्टी अवलंबून आहेत. बरं, तू त्याला कधी व कुठे भेटणार ? अं ? "

" आजच रात्री गॅरेजजवळ. तेथूनच आम्ही ऑफिसात येणार. आमची ही भेट कोणालाही माहीत नाही. "

" मला हे सर्व रिबेन्ट्रॉपला कळवावे लागेल. तोपर्यंत हे फोटो इथंच असू देत." पॅपेन फोटो मोजू लागले. इकडे माझ्या अंगावर मघाचाच प्रसंग आठवून काटा उभा राहिला.

" ...... पन्नास ...... एकावन्न ...... बावन्न ठीक आहे. परंतु अरे हो ! आपल्या ऑफिसच्या कामासाठी या माणसाचे बारसे करायला हवे. त्याच्या नावाबद्दल काही कल्पना ? "

" नाही बुवा. तो पिअरी नावाने टेलिफोन करतो. परंतु ते त्याचे खरं नाव नव्हे. "

" तितकंसं चांगले नाव नाही. त्याने दिलेल्या फिल्म्स इतक्या बोलक्या, सत्य कथन करणाऱ्या आहेत, की आपण त्याला सिसेरो नावाने संबोधू . "

## सिसेरो–भेट दुसरी

काही तासांच्या झोपेनंतर मी अगदी ताजातवाना झालो. मी फोटोग्राफीवर एक पुस्तक घेतले होते ते वाचत बसलो.

पुन्हा माझी व पॅपेनची भेट झाली. आजचा सगळा दिवस त्यांनी फिल्म्सचा अभ्यास करण्यात घालवला होता. फिल्म्च्या खरेपणाबद्दल ते निःशंक झाले होते.

वकीलसाहेव, जेंके व मी यांची वेगवेगळ्या मुद्यांवर चर्चा चालू होती. उपस्थित होणारे प्रश्न मी टिपून घेत होतो. त्यांतील बरेच प्रश्न वेळ आली तसेतसे मी सिसेरोला विचारले व त्याची त्याने अत्यंत लाघवी भाषेत उत्तरे दिली. मी त्याला विचारले, की तुला फ्रेंच येत नसूनही तू त्याच भाषेत का बोलतोस ? कारण ब्रिटिशांच्या नोकराला इंग्रजी येणे जरूर आहे. या प्रश्नाला त्याच्याकडे उत्तर नव्हते.

बरोबर रात्री दहा वाजता मी गॅरेजजवळ आलो. सिसेरो अगोदरच आला होता. त्याने माझे दोस्ताप्रमाणे स्वागत केले. मी त्याला म्हणालो, की तू दिलेल्या फिल्म्स आमच्या पसंतीस आल्या आहेत. त्यामुळे त्याला आनंद झाला.

आम्ही ऑफिसात आलो व दार लावून घेतले. सिसेरोने खिडकीवरील पडदे सोडले. इतर सर्व प्रकारची दक्षता त्याने घेतली. आम्ही दोघेही टेबलाशेजारी बसलो. शेजारच्या स्टुलावर सिगरेट्स व व्हिस्कीची बाटली. त्यांचा आस्वाद घेत सिसेरोने नव्या फिल्म्चे दोन रोल ठेवले. ते माझ्या ताब्यात घेऊन मी म्हणालो, " अगदी या घटकेला माझ्याकडे दमडीही नाही, पण लौकरच बर्लिनहून पैसे येतील." त्याची प्रतिक्रिया जाणून घेण्यास मी अधीर झालो.

" या फिल्मचे ३०,००० पौंड तू पुढील वेळी दिलेस तरी हरकत नाही. कारण

त्याबद्दल मला खात्री आहे. मला आनंदी ठेवणे तुमच्याच हिताचे आहे." तो म्हणाला.

माझ्या शब्दांना तीन हजार पौंडांची तरी किंमत होती.

"त्या फिल्म्सचा तांत्रिक दर्जा खरोखर अप्रतिम आहे. खरंच तू एक अव्वल दर्जाचा फोटोग्राफर आहेस. बरं पण तू एकट्यानेच हे काम करतोस का मदतनिसा-बरोबर ?" माझ्या पोतडीतून मी एक एक प्रश्न काढण्यास सुरुवात केली.

"कित्येक वर्षांपासून मला आवड आहे फोटोग्राफीची. अर्थात् सर्व काही मीच करतो."

"फोटो कुठे काढतोस ?" माझा दुसरा प्रश्न.

"अर्थात् वकिलातीत." चिडून तो म्हणाला. आणि शेवटी सांगितले, "हे बघ नसत्या चौकशा करू नकोस. मी तुला फिल्म्स देतो ते पुरेसे नाही काय ? त्याबद्दल तुझा फारच आग्रह असेल तर पुन्हा कधीतरी सांगेन त्याविषयी. अरे पण हे बघ, मला एक झकाससा कॅमेरा मिळवून देशील काय ? सध्या आहे, तो आहे मित्राचा. त्याला परत केला पाहिजे तो. पण आणल्यास तो बर्लिनहून मागव. कारण अंकारात विकलेल्या कॅमेऱ्यांच्या क्रमांकांची नोंद ठेवली जात असणे साहजिक आहे."

त्याने प्रत्येक गोष्टीचा विचार केल्याचे दिसत होते. अर्थात् तसे तो न करता तरच नवल.

मध्यरात्र झाली होती. तो जायला उठला. जाता जाता म्हणाला, "आता आपण ऑफिसात भेटणे धोक्याचे ठरेल. शहरातील जुन्या वस्तीत एखाद्या अंधाऱ्या रस्त्यावर भेटू. अरे, तुझ्याकडे मोटार आहे का ?"

मी मानेने हो म्हटले.

"तर मग आजच दाखवतो भेटायची जागा. आपण अशा ठिकाणी भेटू की जिथे तुला मोटार थांबवावी लागणार नाही. मोटार अगदी हळू हाक. दिवे मंद कर. नेहमीची जागा येताच दार उघड. मी आत उडी घेईन. हे बघ जवळपास कोणी असल्यास मला टाळ. तिथेच दोन–तीन फेऱ्या घाल व कोणी नाही याची खात्री करून मला मोटारीत घे. तुझी मोटार आण बरं."

मी मोटार आणावयास जाणार तोच तो म्हणाला. "हे बघ. मी तुला फोन करीन तेव्हा मी तुला भेटू इच्छितो त्यापेक्षा चोवीस तास उशिराची वेळ सांगेन. समजा, मी तुला दिनांक सातला भेटू इच्छितो तर फोनवर मी तुला आठ तारखेस भेटावयास सांगेन. समजलं ?"

माझी गाडी दुरुस्तीस टाकली होती त्यामुळे मित्राची ओपेल गाडी आणली. तो मागच्या सीटवर बसला व शहराच्या जुन्या वस्तीकडे जाण्यास सांगितले. पडदे खेचण्यास तो विसरला नव्हता. एका ठिकाणी मोटार थांबवत तो म्हणाला,

"हीच आपली भेटायची जागा. नीट बघून ठेव. आणि मला आता आमच्या वकिलातीजवळ सोड बघू."

"अं काय म्हणालास ?" मी ताडकन् विचारले.

"घाबरू नकोस. हूं चल सरळ ने मोटार... वळव उजवीकडे...... थांब थांब पलीकडच्याच रस्त्यावर आमची वकिलात आहे." तो म्हणाला.

खरोखरच त्याचा काहीतरी डाव दिसतो. इतक्यात मागून आवाज आला. क्लिक् ऽऽ ... मी मागे पाहिले. सिसेरो कधीच दिसेनासा झाला होता. मी मोटार वळवून भरधाव हाकली व जर्मन वकिलातीत आलो. जेंकेच्या खोलीव्यतिरिक्त सर्वत्र अंधार होता.

ताबडतोब दिलेले रोल व फोटोग्रोफीचे पुस्तक घेऊन मी अंधाऱ्या खोलीत शिरलो. आता या फिल्म्मधून कोणती माहिती मिळते याकडे माझे डोळे लागले होते. ताबडतोब मी कामास सुरुवात केली. रात्रीचे दोन वाजले होते. अजूनही जेंकेकडे दिवा जळत होता. कारण त्यांच्याकडे आज पार्टीचा समारंभ होता. पाहुणे मंडळी ब्रिज खेळण्यात दंग होती. मी जेंकेचे दार उघडून आत गेलो व मिसेस जेंकेला कॉफी करण्यास सांगितले. मीही खेळात सामील झालो. पण माझे मनच रमेना. कॉफी पिऊन मी पाहुण्यांचा निरोप घेऊन लागलीच माझ्या खोलीत आलो.

सकाळचे सहा वाजले व ब्रिटिशांच्या त्या गुपिताची फिल्म् आता पूर्णपणे डेव्हलप झालेल्या अवस्थेत माझ्या समोर पडली होती. सबंध रात्रभर काम करून फिल्म् डेव्हलप करण्यात यश मिळाले त्याबद्दल माझ्यावरच मी खुश होतो.

## चाळीस फोटोत–मॉस्को वृत्तांत

दुपारी बाराच्या दरम्यान मी वकीलसाहेबांच्या ऑफिसात शिरलो. माझ्या बॅगमध्ये चाळीस फोटो होते. या फिल्म्समध्ये दोस्तांच्या मॉस्को बैठकीचा वृत्तांत होता. अँथनी ईडन व कॉर्डेल हल् यांची या बैठकीस उपस्थिती होती. हा वृत्तांत इतका महत्त्वाचा होता की, चर्चिल केवळ फक्त हाऊस ऑफ कॉमन्समध्येच या विषयावर बोलू शकत होते. पॅपेनना सारी हकीकत मी सांगितली.

त्यापुढील दोन आठवडे त्या बैठकीचा अभ्यास करण्यात व ते सांकेतिक लिपीत बर्लिनला पाठवण्यात गेले. या नाटयपूर्ण घटनांशी संबंधित असे सर्व काम मलाच करावे लागे, त्यामुळे आताशा मला अशक्तपणा आला होता व त्यांतच बर्लिनच्या लांबलचक प्रश्नमालिकेची भर पडे. त्याची उत्तरे मला लागलीच द्यावी लागत. अर्थात् प्रश्नांचे स्वरूप इतके विचित्र व मूर्खासारखे असे की केवळ दिव्य दृष्टीचा माणूसच प्रश्नांना उत्तरे देऊ शकेल. बर्लिनचे दुर्दैव असे की मी तसा नव्हतो. काही प्रश्न अगदी तर्कशुद्ध व समर्थनीय होते व त्याला मी उत्तरेही व्यवस्थित दिली. परंतु बर्लिनची तऱ्हा काही औरच. ज्या प्रश्नांना उत्तरे देता येणे शक्य नाही अशा प्रश्नांचीच मालिका असे.

बर्लिनच्या मते माझी घोडचूक म्हणजे सिसेरोशी मी संधान बांधण्याची काहीच

व्यवस्था केली नाही. आमची भेट केवळ त्याच्या इच्छेवरच होई. पण याचे उत्तर फार सोपे होते. समजा, तसे मी करता तर 'ऑपरेशन सिसेरो 'चा शेवट घडता. सिसेरो पैशाच्या मागे आहे एवढे उघड झाले होते. त्यामुळे मीच त्याच्याशी संधान बांधून काहीतरी लफडी निर्माण करण्यापेक्षा त्यानेच माझ्याशी संधान बांधणे जास्त शहाणपणाचे होते. कारण एकदा का सिसेरोला त्या खोलीत प्रवेश मिळणे अवघड झाले की जर्मन राष्ट्राची सारी संपत्तीही ती अमूल्य माहिती मिळण्यासाठी दिली तरी ती मिळणे अशक्य. मला कोणत्याही प्रकारचा धोका नको होता.

४ नोव्हेंबरला बर्लिनहून खास विमान अंकारात आले. बर्लिनने पाठवलेले दोन लाख स्टर्लिंग पौंड मी घेतले.

५ नोव्हेंबरला काही कामानिमित्त मी ऑफिसात गेलो नव्हतो. नेमका त्याच दिवशी सिसेरोचा फोन आला. माझ्या सेक्रेटरीने सांगितले की पिअरी नावाच्या माणसाने ६ नोव्हेंबरला रात्री ९ वाजता ब्रिज खेळण्यास बोलावले होते. याचा अर्थ असा की आजच रात्री मला बोलावले होते.

रात्रीचे जेवण झाले. मी अलिशान ओपेल बाहेर काढली. माझे दुर्दैव असे की नेमका आयत्या वेळी कार्बुरेटर बिघडला. आलिया भोगासी. मी गाडीतून उतरलो व गाडी दुरुस्त करण्याची पराकाष्ठा केली. पण छे:, आता सिसेरोशी कसली भेट होणार असे वाटू लागले. नवाला पाच मिनिटे होती. अजूनही एंजिनमध्ये काही धाकधूक दिसत नव्हती. आता मात्र माझी धडधड वाढू लागली. आता एक मिनिट होते. शेवटचा प्रयत्न म्हणून मी गाडी सुरू करण्याचा प्रयत्न केला. चालू होणार गाडी असे वाटले. ॲक्सिलरेटर दाबला व काय आश्चर्य हिरमुसलेल्या गाडीने टुण-कन् उडी मारली. मी भरधाव वेगाने निघालो. नेहमीची अंधारी गल्ली आली. घड्याळात पाहिले तेव्हा दोन मिनिटे उशीरच झाला होता. जवळजवळ शंभर यार्डांवर मी टॉर्चचा झोत पाहिला. तो माणूस टॉर्च बंद करी व पुन्हा झोत पाडी. सिसेरोचा आज काहीतरी वेगळाच डाव दिसतोय. मी माझी संरक्षणाची तयारी केली व गाडी वळणार तोच खुद्द सिसेरोच दार उघडून मोटारीत घुसला. पण तोही इतक्या मांजरपावलाने की जेव्हा त्याने मला शहराच्या नवीन भागाकडे जाण्याविषयी सांगितले तेव्हाच मला तो आल्याचे समजले. या वेळी मला त्याचा फार राग आला होता.

मी गाडीचा वेग वाढवला व गल्लीबोळांतून सुसाटयासारखा निघालो. सिसेरो सूचना देत होता.

"आता डावीकडे...तो समोर दिव्याचा खांब दिसतोना हा तिथेच वळ... आता सरळ जा....."

मी तसेच करत होतो. त्याने विचारले, "माझे तीस हजार पौंड दे बघू. तुला खासच आवडेल अशी नवीन फिल्म आणली आहे आज."

मी त्याला पैसे दिले व त्याने मला फिल्म रोल दिला. क्षणभर त्याला पैसे मोजावे असे वाटले पण लागलीच त्याने पैसे खिशात कोंबले. त्याच्या मुद्रेवर विजयी भाव दिसत होते.

आता आम्ही उलुसनेदम या प्रमुख चौकात शिरलो. युद्धकालीन परिस्थितीमुळे सर्वत्र प्रकाश-बंदी होती. तरीसुद्धा मध्येच एखादा दिवा जळताना दिसे. इतक्यात मोटारच्या मागील बाजूने टॉर्चचा झोत कोणीतरी टाकला. सिसेरो लागलीच सीटच्या कोपऱ्यात दडून बसला. काळ्या ओव्हरकोटची कॉलर उंच करीत तो म्हणाला, "ताबडतोब निसट. धोका दिसतो कसलातरी."

मी वेग वाढवला व एका गल्लीत शिरलो. आता प्रकाश येत नव्हता, सिसेरोने सुटकेचा निःश्वास टाकला. मी बोलण्यास प्रारंभ केला, "बर्लिनला तुझे नाव व नागरिकत्व पाहिजे आहे."

क्षणभर शांतता पसरली.

"माझ्या नावाशी तुझा वा बर्लिनचा काहीएक संबंध नाही. हवं असल्यास तूच शोधून काढ. एक गोष्ट सांगतो मी टर्कीश नाही. मी आहे अल्बानियन."

"बरं ते जाऊ दे. पण तू ब्रिटिशांचा एवढा द्वेष का करतोस?"

मला स्पष्ट दिसत होते की या प्रश्नामुळे तो चिडला होता. बेचैन झाला होता. तो संतापून म्हणाला,

"एका ब्रिटिश गध्याने माझ्या बापाचा खून केला."

माझे हृदय हेलावले. पैशाच्या हेतूपेक्षा मला वाटले हाच त्याचा गुपिते चोरण्याचा खरा हेतू असावा. मी माझे प्रश्न आवरते घेतले. कारण त्याची उत्तरे देण्याच्या मनःस्थितीत नव्हता तो.

सिसेरोने थंडपणे गाडी हळू हाकण्यास सांगितले. आम्ही पुन्हा अंकारातील मुख्य रस्त्यावर आलो होतो. सिसेरोबद्दल मला बरीच सहानुभूती वाटू लागली. बिचाऱ्याच्या वडिलांचा खून एका उर्मट ब्रिटिशाने करावा म्हणून मीही संतापलो. सिसेरोला विचारायला मागे वळून पाहतो तो काय सिसेरोचा पत्ता नव्हता. तो केव्हाच पसार झाला होता.

मी घरी परतलो व दुसरे दिवशी सकाळी दहा वाजेपर्यंत झोप घेतली.

## रिबेन्ट्रॉपचे निमंत्रण

पॅपेनच्या ऑफिसात मी अकराला प्रवेश केला व त्यांना सर्व तपशील कळवला. माझ्यासाठी बर्लिनहून पत्र आल्याचे त्यांनी सांगितले. मी वाचावयास सुरुवात केली. बर्लिनहून निमंत्रण आले होते. रिबेन्ट्रॉपचे. सर्व सिसेरोबद्दलचे कागदपत्रही न्यावयाचे होते.

दिनांक ८ नोव्हेंबरला खास विमानात बसलो. खरे म्हणजे आमच्या नियमा-प्रमाणे मी फर्स्टक्लासचे तिकिट काढणे अवश्य होते पण त्या लाचखाऊ क्लार्कने सगळी तिकीटे संपल्याचे सांगितले. थोडेसे पैसे चारल्यावर मला सेकंडक्लासचे तिकीट मिळाले. इतक्या महत्त्वाची कागदपत्रे घेऊन सेकंडक्लासने प्रवास करणे फार धोक्याचे व त्यातच माझा सहप्रवासी निघाला लुच्चा ब्रिटिश. ती रात्र फारच अस्वस्थपणात गेली. माझ्याचप्रमाणे तोही त्याच स्थितीत दिसला.

आम्ही इस्तंबूलला आलो. तो तोंड धुण्यासाठी उठला. पण काही केल्या तो जाईना. सारखे बेंडिंग वर खाली करी. उघडी, पुन्हा गुंडाळी. एकंदर त्याच्या चेहऱ्याकडे पाहून त्याला हजामतीचे सामान हवे, असा मी तर्क केला. माझ्याकडचा जर्मन बनावटीचा रेझर मी त्याला दिला. रेझरकडे तो पाहतच राहिला व अती आकर्षक अशी हास्य लकेर त्याच्या तोंडावर उमटली.

मी इस्तंबूलला उतरलो. विमानतळावरच जंकर्स ५२ हे विमान माझी वाट पाहत होते. मी त्यात बसलो. आता आम्ही मार्मोटाच्या सामुद्रधुनीतून प्रवास करत होतो. खालीच पसरलेल्या वैभवशाली इस्तंबूलचे मी दर्शन घेत होतो. डोक्यावर शांत गंभीर निळे अवकाश व खाली निरनिराळ्या रूपांत दिसणारी प्राचीन इस्तं-बूल नगरी पाहून मन कसे प्रसन्न झाले. हळूहळू निद्रादेवी मला तिच्या जाळ्यात खेचत होती.

आमचे विमान सोफियाला इंधनासाठी उतरले. तेथे माझे नाव पुकारले गेले. खाड्खाड् आवाज करीत एक तरुण सैनिकी अधिकारी आला व ताबडतोब जनरल काल्टेनब्रुनरने भेटीस बोलावल्याचे सांगितले तो म्हणाला, "तुम्ही पुढं व्हा. मी करतो बाकीची व्यवस्था."

ही व्यवस्था खाण्यापिण्याची का आणखी कसली याचा मी विचार करू लागलो.

[ अपूर्ण ]

● ● ●



अंगांतल्या व हवेंतल्या

**उष्णतेच्या तक्रारीं** साठीं

**पर्ल काढा** कुटुंबांत

सर्वांच्या उपयोगी पडतो

असा गेल्या चाळीस वर्षांचा अनुभव आहे. सर्व अंग आंतल्या आंत रसरसणें, डोळ्यांची व हातापायांच्या तळव्यांची जळजळ, उन्हाळ्याचा त्रास, पचनेंद्रियें कमजोर होऊन वारंवार अपचन, पोट दुखणें-फुगणें-जड होणें, शौचाला केव्हांच साफ नसणें, नेहमीं अगदीं थकल्यासारखें वाटणें वगैरे उष्णतेच्या तक्रारी शीतल, शक्तिवर्धक, आरोग्यदायक पर्ल काढा जलद दूर करतो. काढा या नांवामुळें घाबरण्याचें कारण नाहीं. पर्ल काढा चवदार लागतो. वर्षांतून एक दोन वेळां पर्ल काढ्याच्या ४।५ बाटल्या घेतल्यास प्रकृती उत्तम राहते. पर्ल काढा पुरुषांप्रमाणेंच नाजुक प्रकृतीच्या स्त्रियांना व मुलांना विशेष उपयोगी पडतो. स्त्रियांनीं गरोदरपणीं सुद्धां निर्धास्त घ्यावा. केव्हां दिवसपाळी केव्हां रात्रपाळीमुळें हटकून होणारें अपचन, पित्त, मलावरोध घालवून प्रकृती चांगली ठेवण्यासाठीं पर्ल काढा पुष्कळ मंडळी वापरतात. आपल्याकडच्या उष्ण हवेंत साहजिक उद्भवणाऱ्या उष्णतेच्या तक्रारींसाठीं पर्ल काढा घ्या.

**उष्णतेच्या तक्रारीं** चा

अनुभविक उपाय **पर्ल काढा**

**पर्ल कंपनी, मुंबई २७.**




Stusa 4/64

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ❑ श्री. रेशनलाल व कु. पंचशीला

नावात काय आहे असा प्रश्न शेक्सपियरने विचारला त्या काळात नावांचे फक्त साधी व गोड असे दोनच प्रकार असावेत, त्यामुळे नावात विशेष काही नाही असे त्याला वाटले. पण आता काळ बदलला आहे. आता नाव नुसते साधे आहे की गोड आहे एवढे पाहून चालत नाही, तर ते खारट आहे की आळणी आहे, गरम आहे की थंड आहे, मोटारीला साजणारे आहे की बैलगाडीला शोभणारे आहे, भांडवल-वादी आहे की साम्यवादी आहे, अहिंसक आहे की हिंसेवर विश्वास ठेवणारे आहे हेही पाहावे लागते. म्हणूनच मला वाटते गेल्या आठवड्यात चीनच्या लाल रक्षकांनी हुकूम सोडला आहे की 'बूर्ज्वा' अन् सरंजामशाही नावे असलेल्या सर्व मंडळींनी पोलीस स्टेशनवर हजर व्हावे अन् आपले नाव बदलून घ्यावे. शाब्बास! नावापुरता साम्यवाद स्थापन करण्याच्या या मोहिमेत नाव ठेवायलादेखील जागा नाही.

नाही तरी आपले नाव ठेवताना नेमके आपलेच मत कोणी विचारीत नाही हा माझ्या मते प्रत्येक बारशातला एक गंभीर दोष आहे. आता माझेच उदाहरण घ्या. माझे नाव देव आनंद, दिलीप कुमार, जॉय, शम्मी असे काही तरी दिलखेचक असावे असे मला फार फार वाटते. पण हाय! आमच्या पुराणमतवादी मातोश्रींनी आम्हांला दगा दिला, अन् मी तेथल्या तेथे जोराचा निषेध प्रकट केला तेव्हा "भारीच बाई रडका आहे हा!" अशा शब्दांत त्या निषेधाची अजाणपणे बोळ-वण करण्यात आली. बरं, एकदा चिकटलेले नाव काढायचे तर आमची ही नाक मुरडून म्हणते तुम्ही काय नाव काढणार दिसतंच!

पण मुख्य अडचण अशी की माझे नाव बूर्ज्वा आहे की सरकारमान्य 'समाजवादी समाजरचने'ला योग्य आहे याचाच मला पत्ता नाही. अर्थात् सरकारच्या आर्थिक धोरणाला योग्य असे 'भिकारदास' किंवा निधर्मी धोरणाशी सुसंगत असे 'रहीम-नाथ' असे काही तरी नाव असते तर प्रश्न नव्हता. त्यातून निवडणुकीला उभे राहायचे असते तर आणखी काळजी घ्यावी लागली असती. उदाहरणार्थ, रामसिंग नावाचा माणूस अहिंसेला वाहिलेल्या काँग्रेसचे तिकिट मिळविण्याची आशा करू

शकेल का? अर्थात् नाही. कॉंग्रेसला आता पृथ्वीवल्लभ नकोत, धेनुवल्लभ पाहि-जेत. अन् एकदा नावात सगळेच आहे असे म्हटले म्हणजे त्यात राजकारणाबरोबर समाजकारण, अर्थकारण, अनर्थकारण, सगळेच येईल. कुणी सांगावे, उद्या एखाद्या रोशनलालचा रेशनलाल होईल अन् एखादी सुशीला असेल तिची पंचशीला होईल. पुढचे पुढे. सध्या तरी सुब्रह्मण्यम्चे अब्रह्मण्यम् झाले आहे!

## □ सांस्कृतिक सँडविच

सकाळी टेबल-खुर्चीवर बसून टोस्ट अन् ऑम्लेट खाल्ले म्हणजे कसे 'मॉडर्न' वाटते! साहेबाचे राज्य ही खरोखरीच ईश्वरी देणगी होती हे जॅम लावलेला पाव खाताना मला पूर्णपणे पटते. खरे म्हणजे कंपनीसाहेब इकडे आला तेव्हापासूनच शिवाजीसारखा संयमी माणूस, दिल्लीचे तमाम खाबू बादशाहा, पुढे १८५७ साली नानासाहेब पेशव्यासारखा बहकलेला पेन्शनर, झाशीच्या राणीसारखी अडदांड बाई, तात्या टोपेसारखा उपद्व्यापी माणूस, वासुदेव बळवंतासारखा माथेफिरू टिळक–सावरकरांसारखी आगलावी मंडळी, भगतसिंग–आझादसारखे आक्रस्ताळी अन् अखेर राजकारणाचा राग जेवणावर काढणारे गांधी या सर्वांना साहेबाने भरपेट जॅम-सँडविच चारले असते तर या मंडळींना खाल्ल्या पावाला जागल्या-शिवाय उपाय राहिला नसता आणि त्यांनी साहेबाला अगदी आग्रहाने ठेवून घेतले असते.—साहेबाच्या पावाचा महिमाच तसा आहे.

पण खेदाची गोष्ट म्हणजे हे नावमाहात्म्य प्रत्यक्ष पावाच्या पावनभूमीतच ओसरू लागलेले दिसते. कारण परवा वर्तमानपत्रांत वाचले की इंग्लंडमधला सर्व-साधारण कामकरी माणूस हल्ली "फिश् अँड चिप्स" ऐवजी "इंडियन करी" अधिक पसंत करतो. माय गॉड! साहेब अन् कढी भात? एकच प्याल्याइतकाच हा एकच भुरका भयंकर असतो हे साहेबाने वेळीच ओळखावे, अशी मी त्याला कळ-कळीची विनंती करतो. आज साहेब कढीभात खायला लागला की उद्या तो पाटावर बसायचा अन् परवा ताटाभोवती रांगोळी काढून चक्क नैवेद्य दाखवायचा! छे, छे, छे! साहेबाची संस्कृती अत्यंत धोक्यात आहे. अन् तिचे रक्षण करायची आता साहेबाला शुद्ध नसली तर पावावर पोसलेला मी त्या पावन कार्यासाठी पुढे सरसावायला कचरणार नाही. ठरले—आजपर्यंत मी टोस्ट–ऑम्लेट खात होतो, तरी हाताने खात होतो. उद्यापासून ऑम्लेटला हात लावणार नाही—काटा-चमचा लावीन. मागे एकदा काटा थेट घशात गेला होता तसे पुन्हा झाले तरी बेहेत्तर आहे. इंडिया दॅट् इज भारतात साहेब-संस्कृति-रक्षणासारख्या महान् कार्यापुढे यःकश्चित् जिवाची कोण पर्वा करतो?

●

# राशी भविष्य : श्री. बी. डी. घाणेकर : भृगुसंहितातज्ज्ञ

## दिनांक १ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर १९६६

**मेष :** आपला राश्याधिपती आजपासूनच अनुकूल येत आहे. त्यामुळे गेले महिना–दीड महिना जो आपण त्रास सहन केलात तो संपला आहे. त्यामुळे अडीअडचणी दूर होऊन स्वस्थता लाभेल. आरोग्याबद्दल चिंता करण्याचे कारण नाही. आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन येणे असलेले पैसे वसूल होतील. पत्नीच्या तब्येतीस मात्र किरकोळ त्रास होईल. संततीच्या आरोग्याबाबत व विद्याभ्यासाबाबत हा सप्ताह अनुकूल आहे. विद्यार्थ्यांस विद्येत प्रगती. अश्विनी नक्षत्र प्रथम चरण असणारांस दिनांक १ व २ जास्ती शुभ. व्यापाऱ्यांस हलक्या वस्तूंपासून फायदा मिळेल. महिलांच्या बाबतीत संसार–सौख्यात व पतीच्या तब्येतीस त्रास.

**वृषभ :** आपला राश्याधिपती नीच स्थितीत आहे व सुखस्थानातून मंगळाचे परिभ्रमण होत आहे. त्यामुळे घरात निरनिराळ्या अडीअडचणी व प्रकृतीस त्रास. पैशाचे व्यवहार काळजीपूर्वक करावेत. दिनांक १ व २ हे फारच प्रतिकूल आहेत. कोणत्याही व्यवहारात सावधानता ही अत्यंत आवश्यक आहे. संततीच्या प्रकृतीस त्रास. वाहनांपासून जपावे. नोकरीत वरिष्ठांशी मतभेद होऊन बदलीचाही योग येईल.

अशुभस्य कालहरणम् ।। १ ।।

प्रतिकूल काळ असला म्हणजे कोणतेही कार्य लांबणीवर टाकणे अत्यंत श्रेयस्कर. विद्यार्थ्यांना विद्याभ्यासात दक्षता घ्यावयास पाहिजे. व्यापाऱ्यांनी नवीन उद्योगाच्या घडामोडी करू नयेत. कनिष्ठ लोकांपासून त्रासाचा संभव. शक्यतो प्रवास टाळावाच.

**मिथुन :** आपला राश्याधिपती पंचमातून परिभ्रमण करीत आहे. त्याचप्रमाणे मंगळही पराक्रमात आहे. आणि त्यात गुरुमहाराजांचे साहाय्य आहेच. त्यामुळे आपल्याला हा सप्ताह अनुकूल आहेच. कवी, लेखक, नाट्यचित्र व्यावसायिकांना हा सप्ताह अर्थप्राप्तीच्या दृष्टीने फारच चांगला आहे. ६ व ७ तारखा ह्या विशेष अनुकूल आहेत.

धन्य आनंद दिन पूर्ण मनकामना ।। १ ।।

आपल्या मनातील मनोकामना मूर्त स्वरूपात येतील. प्रेमिकांनो, आपली प्रेयसी आपल्या मनाप्रमाणे वागेल. प्रेमिकांची प्रेमे या सप्ताहात सफल होतील. व्यापाऱ्यांस व विद्यार्थ्यांस हा सप्ताह अनुकूल आहे. पत्नी मनाजोगती वागेल. महिलांस संसार-सौख्य चांगले लाभून त्यांच्या इच्छा–आकांक्षा पतिराज पूर्ण करतील. दि. ४–५ मात्र प्रतिकूल.

**कर्क :** लग्नी गुरू, पराक्रमात रवी व सुखात बुध अशी आकाशस्थ ग्रहांची

स्थिती असल्यामुळे या सप्ताहात आपल्या प्रयत्नांस उत्तम तऱ्हेने यशप्राप्ती होईल.

उद्यमेनही सिद्धयन्ति कार्याणि न मनोरथैः

आता नुसते मनोरथ करून भागणार नाही. त्यासाठी प्रयत्नांस लागा. आपणांस निश्चित यशप्राप्ती मिळेल. मित्रांचे सहकार्य लाभून कोर्टकामात यश मिळेल. नोकरी करणारांस बढती मिळेल. उष्णविकारांमुळे घशास व डोळ्यांस त्रास. तरी त्यांपासून जपावे. पुष्य नक्षत्र द्वितीय चरण ज्यांचे आहे, त्यांना हा सप्ताह फार अनुकूल आहे. दिनांक ४ व ९ हे शुभ दिवस. विद्यार्थ्यांस अभ्यासात प्रगती. व्यापाऱ्यांना धंद्यांत फायदा मिळेल. महिलांना पतिराजांची सुस्थिती असल्यामुळे त्यांच्या कामना पूर्ण होतील.

**सिंह :** आपल्या राशीस गुरू १२ वा आहे आणि शनिमहाराज अष्टमात आहे. त्यामुळे निरनिराळ्या अडचणी व मनाविरुद्ध घटना घडतील. कोणत्याही कार्यात अपयश.

मनसा चिंतितं कार्यम्
दैवम् अन्यत्र चिन्तयेत ।। १ ।।

आपली सिंह रास आहे म्हणून आपण मनात कितीही योजना आखल्या तरी दैव प्रतिकूल असल्यामुळे कार्यसिद्धी होणार नाही. तथापि सहजस्थानात बुध असल्याने मित्रांकडून सहकार्य मिळेल. काही दिवस आपणांस परिस्थितीशी झगडावे लागेल. शुभ कार्यात द्रव्यखर्च होईल. प्राप्तीपेक्षा खर्चाचे प्रमाण वाढल्यामुळे आपण अगदी त्रासून जाल. विद्यार्थ्यांना विद्येत यश मिळण्यासाठी काळजी घ्यावी लागेल. दि. ६—७ फारच शुभ आहेत.

**कन्या :** आपला राश्याधिपती शुभ स्थितीत आहे. रवी—गुरू दोन्हीही ग्रह अनुकूल आहेत. तरी पण गेला महिना आपणांस जितक्या प्रमाणात अनुकूल होता तितका या सप्ताहात मंगळ प्रतिकूल येत असल्यामुळे आपले जे सुरळीत कार्य चालले आहे त्यात निरनिराळ्या अडीअडचणी निर्माण होतील. काही कार्ये होताहेत असे वाटून लांबणीवर पडतील. तसेच उष्ण विकारांपासून तब्येतीस त्रास होईल. कोणतेही पैशाचे नवीन व्यवहार करू नयेत. व्यवहारात किंवा मित्रांपासून धोका होण्याचा संभव. प्रवास शक्यतो टाळावा. अनाठायी द्रव्यखर्च होईल. पैशाची तारांबळ उडेल. नोकरी करणारांस वरिष्ठांशी मतभेद होतील. दिनांक ४—७ शुभ आहेत. भावास अकस्मात त्रासाचा योग. कोर्टकामे लांबणीवर टाकावीत. अशा तऱ्हेच्या प्रतिकूल काळात आपणांला फार दिवस जपून राहावे लागणार नाही. तरी १ महिना जपून राहावे.

**तूळ :** आपला राश्याधिपती व्ययस्थानात आहे व रवीही तेथे आहे. तरी प्रकृतीबद्दल काळजी घ्यावी. मंगळ मात्र अनुकूल आहे. त्यामुळे आर्थिक स्थिती चांगली राहील. प्रवासाचा योग येईल. पत्नी आपल्या मनाप्रमाणे वागेल. येणे असलेले पैसे

वसूल होतील. दिनांक ६ व ७ ह्या तारखा फारच शुभ आहेत. संततीच्या प्रकृतीस जपावे. तारीख ४–५ मात्र प्रतिकूल आहेत. मंगळासारखा तेजस्वी ग्रह दिनांक १ ऑक्टोबरपासून महिना–दीड महिना लाभस्थानातून परिभ्रमण करणार आहे. त्यामुळे अर्थप्राप्ती निश्चितच चांगली होईल. बहीण–भावांचे सहकार्य मिळेल. महिलांचे बाबतीत त्यांच्या पतिराजांस चांगली अर्थप्राप्ती होणार असल्यामुळे गृह-सौख्यात आनंदी वातावरण निर्माण होईल. व्यापाऱ्यांस धंद्यात फायदा होईल. लाल किंवा पिवळ्या वस्तूंपासून अर्थप्राप्ती चांगली असल्याने चिंतेचे काय कारण ?

**वृश्चिक :** भाग्यात गुरू व दशमात मंगळ आणि लाभात रवि–शुक्र. इतक्या ग्रहांची आपणांला या सप्ताहात अनुकूलता आहे. त्यामुळे आपल्या सर्वच गोष्टी मार्गाला लागतील. बढतीचा योग येईल. व्यापारात उत्तम फायदा होईल. अकस्मात शुभ घटना घडतील. मनामध्ये ज्या काही इच्छा–आकांक्षा आहेत, त्या या सप्ताहात पूर्ण होईल.

मना करा रे प्रसन्न
सर्व सिद्धीचे कारण ।।

मन प्रसन्न ठेवून कार्य मात्र नेटाने करीत राहा. दैव अनुकूल आहेच. दि. ६ आणि ७ प्रतिकूल असल्यामुळे मानसिक अस्वस्थता येईल. दि. ९ व ११ ह्या शुभ आहेत. संतती व पत्नी यांचे सौख्य चांगले व सहकार्यही मिळेल. विद्यार्थ्यांच्या विद्येत प्रगती.

**धनू :** आपल्या राश्याधिपती जरी अष्टमात असला तरी या सप्ताहात आपणांस रवी आणि मंगळाची चांगलीच साथ आहे; त्यामुळे आपल्या प्रयत्नांस यश येऊन अडचणी दूर होतील. मित्र व धंद्यातील भागीदारांचे चांगले सहकार्य मिळेल.

"एकमेका सहाय्य करू
अवघेचि धरू सुपंथ"

अशी स्थिती आहे. बुद्धी–कौशल्याने आपणांस यश मिळत राहील. अकस्मात लाभाचा योग. विद्यार्थ्यांस चित्ताची एकाग्रता साधून विद्येत उत्तम यश लाभेल. पत्नीच्या सल्ल्याने वागल्यास उत्तम यश व आर्थिक फायदा. दिनांक ८ शुभ आहे. कलावंत, लेखक आणि नाट्यचित्रकारांना हा सप्ताह शुभ आहे. नवीन करार करण्यास हरकत नाही.

**मकर :** आपल्या राशी–स्वामी वक्री आहे व मंगळासारखा प्रखर ग्रह अष्टमात आहे. सावधान ! कोणत्याही कार्यात दक्षता घ्यावयास हवी. वाहनांपासून धोका आहे. दक्षता घ्यावी. मित्र व व्यवसायातील भागीदार यांचेपासून अर्थप्राप्तीत धोका निर्माण होईल. मानसिक नैराश्य निर्माण होईल. कोणतेही नवीन देवघेवीचे व्यवहार बंद. स्थावराचे व्यवहार करू नयेत. कोर्टविषयक कामे लांबणीवर टाकावीत. सर्वात काल हा श्रेष्ठ आहे. म्हणूनच —

"कालाय तस्मै नमः।"

प्रतिकूल काळाचा त्रास कमी होण्यासाठी व सौख्यप्राप्तीसाठी जगन्मातेची उपासना करावी. त्यायोगे अडचणी दूर होऊन थोडेफार स्थैर्य मिळेल.

**कुंभ :** रवी नि मंगळ हे दोन्हीही ग्रह प्रतिकूल आहेत. त्यामुळे मनाविरुद्ध घटना घडतील. कोणतेही कार्य होईलसे वाटून अखेर नैराश्य मात्र पदरी येईल. बोलण्यात मात्र संयम ठेवावा. नाहीतर विनाकारण वैमनस्य निर्माण होईल. शब्द हे दुधारी शस्त्र आहे हे लक्षात ठेवा.

सुसरीबाई तुझी पाठ मऊ–अशी स्थिती आहे. तेव्हा हा सप्ताह जपून काढावा. कोणी काहीही म्हटले तरी त्याकडे दुर्लक्ष करावे. प्रत्येकजण उपदेश करीत राहील. आर्थिक स्थितीप्रमाणेच आरोग्यासही त्रासाचा योग आहे. सर्व ग्रहांची प्रतिकूल स्थिती असल्यामुळे सर्व कार्यांत धीमेपणा हा ठेवलाच पाहिजे. पत्नीच्या प्रकृतीस त्रासाचा योग. संततीस मात्र हा सप्ताह अनुकूल आहे.

**मीन :** आपणांस गुरुमहाराज अनुकूल आहेत, त्यामुळे कितीही अडचणी इतर ग्रहांमुळे निर्माण झाल्या तरी 'गुरुमहाशय' पाठीशी असल्यावर विरोधकांचे विरोध नष्ट होतील. कोर्टकामात यश मिळेल. नोकरीत बढतीचा योग आहे. दिनांक ९–११ जास्ती शुभ. प्रवासाचा योग येईल. विद्यार्थ्यांना विद्याभ्यासात यशप्राप्ती मिळेल. बरेच दिवस रेंगाळत पडलेली कामे या सप्ताहात अडचणी नष्ट होऊन मूर्त स्वरूपात येतील. व्यापाऱ्यांस हा सप्ताह उद्योगधंद्याचे दृष्टीने चांगला. पत्नीच्या तब्येतीस मात्र किरकोळ त्रास. कलावंत, लेखक, नाट्यचित्र व्यावसायिकांना अनुकूलता आहे. या सप्ताहात सर्वच कामे तातडीने उरकून टाकावीत. म्हणजे त्यात उत्तम यश प्राप्त होईल.

●

**सूचना—**

एका विजेच्या खांबावर पुढील धोक्याची सूचना होती.

"खबरदार, लक्षात ठेवा. या विजेच्या तारांना हात लावल्यास तत्काळ प्राण जाईल. जर कोणी हात लावताना आढळला तर त्याच्यावर खटला भरला जाईल."

—रमेश के. सहस्रबुद्धे

# स्वरश्री लता मंगेशकर

लेखक : वसंत भालेकर

"आनंदकंदा प्रभात झाली...." भूपाळीचे मंगल स्वर आसमंतात घुमत होते. सगळीकडे शांत, निःस्तब्ध होतं. त्या स्वरांच्या जादूनं सारा आसमंत भारून टाकला होता. सारेजण जिवाचे कान करून त्या स्वरांना साठवून ठेवीत होते. ही त्या स्वरांची किमया की त्या वातावरणाची, हा भ्रम होता.

भूपाळी आकार घेत होती. रेशीम उलगडावे तसे सूर त्या धुंद, शांत वातावरणात अलगद मिसळत होते. गायिका तद्रूप झाली होती. मध्यरात्रीच्या त्या कमालीच्या गारव्यात आगळीच बेहोषी निर्माण झाली होती.

भूपाळी संपली. वाद्यं थांबली. त्या धुंद वातावरणातून पुनः वास्तवात मोठ्या कष्टानं सारेजण आले. सगळीकडे आनंदीआनंद साजरा होत होता. फारा दिवसांचं महाराष्ट्राचं स्वप्न साकार झालं होतं. महाराष्ट्र राज्याची मोठ्या दिमाखानं राजेशाही स्थापना झाली तो हा भाग्यवान दिवस. त्या दिवसाचे भाग्यवान साक्षीदार मराठी मन बहरून आलं होतं. त्याच्या आनंदाला उधाण आलं होतं.

मुंबईला राजभवनच्या विस्तीर्ण आवारात हा सोहळा साजरा होत होता. रात्री बाराची वेळ. भारताचे थोर सुपुत्र पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते या राज्याची स्थापना होत होती. स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या गळ्यातून साकारलेली भूपाळी उपस्थितांचं स्वागत करीत होती. लताबाईंच्या आयुष्यातला हा फार मोलाचा प्रसंग. त्यांच्या सुरेल कंठातून उमटलेल्या भूपाळीनं नव्या महाराष्ट्र राज्याचा प्रभात-काल सुरू व्हावा ही कल्पना मोठी कौतुकाची. शुभ शकुनाची.

त्या दिवशी लताताई कमालीच्या भारावलेल्या दिसल्या. राज्यस्थापनेचा आनंद आणि त्याप्रीत्यर्थ त्यांना मिळालेला मान या खचितच अभिमानाच्या गोष्टी होत्या. या आनंदानं आणि अभिमानानं त्यांच्या मनात गर्दी केली नसेल तरच नवल. त्यांच्या सुरेल कंठाचं त्या दिवशी चीज झालं होतं.

लतातांईची गायकी काही न्यारीच. तिची तुलना करता येत नाही. स्वरसम्राट सायगल यांनीही आपल्या रसिल्या आवाजानं श्रोत्यांना अशीच मोहिनी घातली होती. लताताईही आज तेच करत आहेत. आचार्य अत्रे यांच्यासारखा सर्वगुणसंपन्न



'चित्रजीवनाची पंचवीस वर्षे
पूर्ण करीत आहेत'

रसिकदेखील "सकाळी उठून या स्वर–लतेच्या आवाजानं आपले कान पुनित करतो," असं आवर्जून सांगतो. पंडित जवाहरलाल नेहरूदेखील अनेकदा या श्रेष्ठ गायिकेच्या करुणरसप्रधान सुरांनी गहिवरून गेले. त्यांच्या डोळ्यांतून आसवं ओघळलीत. जगाच्या पाठीवर ज्या ज्या ठिकाणी आवडीनं गाणं ऐकलं जातं रसिकता जोपासली जाते तेथे तेथे या आगळ्या आवाजाचं कौतुक होतं आहे. जगाच्या पाठीवर कुठंही जा, लता मंगेशकर हे नाव ऐकू येईल. जगातील सर्व प्रमुख भाषांमधून त्या गायिल्या आहेत. म्हणून खऱ्या अर्थानं त्या जगप्रसिद्ध आहेत. हे यश केव्हाही डोळे दिपवणारं आहे.

लताताईंच्या लहानपणची गोष्ट. त्यांचे वडील, अभिनय व गानकुशल मा. दीनानाथ मंगेशकर त्यांना आपल्याजवळ घेऊन बसत, त्यांना गाणं शिकवीत बसत. त्या वेळी ते आपल्या या लाडक्या कन्येला झटकन सांगत, "बेटा लता, त्वरित गांधार लाव बघू!" आणि लताताई क्षणाचाही विलंब न लावता गांधार लावीत. त्यांना मोठे कौतुक वाटे, अभिमान वाटे, आनंद होई. लताताईंना ते जवळ घेत. प्रेमानं त्यांच्या पाठीवरून हात फिरवीत ते म्हणत–"ज्याला विनासायास गांधार लावता येतो तो पुढे फार मोठा गायक ठरतो, त्याची भरभराट होते. तू पण खूप मोठी होशील, आपल्या मंगेशकर घराण्याचं नाव गाजवशील!

मा. दीनानाथराव यांचं भाकित आज अक्षरशः खरं ठरलं आहे. प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या दिलदार वृत्तीच्या या थोर कलावंताच्या सुकन्येनं केवळ मंगेशकर घरा-

ण्याचाच नव्हे तर महाराष्ट्राचा लौकिक अखिल भारतात वाढवला, अवघ्या जगात भारताची शान वाढवली आहे.

सर्वश्री लताताई महाराष्ट्रात जन्मल्या म्हणून आम्हांला अभिमान वाटतो. हा दगडधोंड्याच्या पण कसदार मातीच्या, चवदार पाण्याच्या मुलखानं देशाला अनेक थोर माणसे दिली. लताताई त्यांपैकी एक. भाग्यवान आहेत त्या. वैभव त्यांच्या पायांशी लोळण घेत आहे. अमाप यश त्यांना मिळालं आहे. त्यांनी हे यश पचवलं आहे. म्हणून या वैभवातदेखील त्या सर्वसामान्य माणसाचं साधं जीवन जगू शकतात. त्यांच्या चालण्या-बोलण्यात डामडौल नाही. भरपूर कीर्ती, विपुल संपत्ती संपादूनदेखील त्या देव, देश आणि धर्म यांच्यांबद्दल जबरदस्त निष्ठा बाळगून आहेत. भारतीय संस्कृतीची महती, ईशोपासनेचे फायदे वगैरे गोष्टी, या वयाला व व्यवसायालाही न शोभणाऱ्या गोष्टी त्या बोलू लागल्या की मी स्तिमित होतो. त्यांना हे जमतं कसं याचं मला नवल वाटतं.

लताताई शिवभक्त आहेत. छत्रपती शिवाजीमहाराज आणि कैलासनाथ भोलाशंकर ही त्यांची दैवतं. अनेक उपास-तापास चालूच असतात. उत्तमोत्तम ग्रंथांचे वाचन, मनन आणि चिंतन यामुळे त्यांच्या विचारांना चांगलीच धार आली आहे. स्वभाव अत्यंत हळवा. हात सढळ. अनेकांना अनेक परींनी त्यांनी मदत केली आहे. कित्येक सामाजिक, सांस्कृतिक कार्य करणाऱ्या संस्था, शिक्षण संस्था, थोर विभूतींचे पुतळे यांना त्यांचं आर्थिक साहाय्य लाभलं आहे. कित्येकांनी त्यांच्या मदतीवर आपल्या चित्रसंस्था उभ्या केल्या. किती जणांनी त्यांच्या मदतीमुळेच आपलं परदेशांतील उच्च शिक्षण पूर्ण केलं. या सर्वांची जाहिरात करणं लताताईंच्या स्वभावाचा फायदा घेऊन त्या मदतीला न जागणारेही अनेक.

लता मंगेशकर या अशा आहेत. गेली कित्येक वर्षे मी त्यांना अगदी जवळून पाहत आहे. स्वरश्री लता मंगेशकरांनीच आपलं गीत गावं अशी धडपड निर्मात्यांपासून तो हे गीत पडद्यावर सादर करणाऱ्या कलावंतांपर्यंत सर्वांचीच सदैव असते. त्यांच्याकडून गीतरचनेचं सोनंच होणार अशी त्यांची खात्री असते. त्यांचा आवाज कानी पडूनदेखील त्याचा वीट येत नाही. त्या सुमधूर आवाजाचं हेच तर वैशिष्टच त्यांनी गेली २५ वर्षे सतत हे वैशिष्टच टिकवून धरलं आहे. या अवधीत चित्रसृष्टीत अनेक घडामोडी झाल्या. कित्येक संगीतकार, गीतकार आले, चमकले आणि कालाच्या उदरात गडप झाले. लताताई मात्र आहेत तेथेच आहेत.

लताताई येत्या वर्षी आपल्या चित्रजीवनाचे २५ वर्षे पूर्ण करीत आहेत. योगायोगानं त्यांच्या वडिलांच्या पुण्यतिथीचा रौप्यमहोत्सवही त्याच वेळी साजरा होत आहे. मंगेशकर घराण्याचं, महाराष्ट्राचं, भारताचं नाव उज्ज्वल करणाऱ्या या थोर गायिकेला उदंड आयुष्य लाभो हीच मंगेशापाशी प्रार्थना.

●

पुणे, दि. २४ सप्टेंबर

श्री. मधू लिमये यांनी

आज सायंकाळी खास मोटारीने

येथून मुंबईला प्रयाण केले.

याच गाडीत


'माणूस'च्या प्रतिनिधीने

श्री. मधू लिमये यांच्याशी

विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली.

या चर्चेचा आकर्षक वृत्तांत

पुढील अंकी....




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**